म. ग्रं. सं. ठाणे
विषय - चारित्र
सं. क्र. ८७३
१९५८

# सप्तऋषि

लेखिका

सौ. पद्मावती असईकर

REFBK-0009827

*   *   *   *   *   *   *


सप्तऋषि
सौ. पद्मावती असईकर
बी.ए.बी.टी.

# सप्त ऋषि

* * * * * * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.
अनुक्रम 23505
क्रमांक ... नों: दि:

लेखिका

सौ. पद्मावती असईकर

बी. ए., बी. टी.

REFBK-0009827

मूल्य ३ रुपये

## क्रम


| | | |
|---|---|---|
| १ | मातोश्री अहिल्यादेवी | १ |
| २ | मादाम क्यूरी | २२ |
| ३ | फ्लॉरेन्स नायटिंगेल | ६९ |
| ४ | सुभाषचंद्र बोस | ९३ |
| ५ | काऊंट लिओ टॉलस्टॉय | १०२ |
| ६ | भगवान् श्रीरमण महर्षि | ११४ |
| ७ | अब्राहम लिंकन | १३२ |



प्रकाशिका
सौ. पद्मावती असईकर
१६० हिंदू कॉलनी
दादर, मुंबई.

प्रथमावृत्ति
१९५८

मुद्रक
प्र. भा. काळे
प्रतिभा मुद्रणालय
टिळकरस्ता, पुणें २.

# अर्पण-पत्रिका

इंदूर नरेश श्रीमंत तुकोजीराव होळकर

आणि

श्रीमंत सौभाग्यवती शर्मिष्ठादेवी महाराणीसाहेब

यांचे चरणीं

कृतज्ञतापूर्वक

अर्पण

—सौ. पद्मावती असईकर

इंदूर गांवीं मज प्राप्त झालें
तें सर्व लेखांमधिं गुंफियेलें।
संधी सुवर्णाचि, उदार लेणें,
मानीतसें भाव मनांत घेणें॥

# सप्तऋषी

प्रिय आशूस,

या पुस्तकांत ऋषींप्रमाणेंच आपआपल्या निवडलेल्या क्षेत्रांत तपश्चर्या करून यश मिळविलेल्या व्यक्तींचीं सात चरित्रें लिहिलीं आहेत. सूर्य जोंपर्यंत प्रकाश देत राहील तोंपर्यंत आकाशांतील सप्तऋषींप्रमाणेंच त्या व्यक्तींच्या चरित्रांचें तेज या भूमंडळावर चमकत राहील व दुसऱ्यांच्या अंतकरणांस उजाळा देत राहील अशी आशा आहे.

— तुझी आई

★

थोर महात्मे होउनि गेले, चरित्र त्यांचें पहा जरा,
आपण त्यांच्यासमान व्हावें, हाच सांपडे बोध खरा।
जग हें त्यजितां भवसागरिंच्या वाळवंटिवर तरी जरा,
चार पाउलें उमटवुं अपुलीं ठेवुं खुणेचा मार्ग बरा॥

—हरिभाऊ आपटे

★

# दोन शब्द

सात–आठ वर्षांच्या वरील मुलांना काल्पनिक गोष्टींपेक्षां खऱ्या गोष्टी अधिक आवडतात. मुलांना गोष्टी ऐकण्याची जशी स्वाभाविक गोडी असते तशीच या वयांत गोष्टी वाचण्याचीहि गोडी उत्पन्न व्हावी या इच्छेनें भरपूर आकर्षक गोष्टींचीं पुस्तकें पुरविलीं जाणें जरुरीचें आहे म्हणून त्या तऱ्हेचीं पुस्तकें लिहिण्याचा हा प्रयत्न आहे.

शक्यतों निरनिराळ्या देशांतील कांहीं थोर लोकांचीं चरित्रें यांत गोष्टीरूपानें एकत्रित केलेलीं आहेत. गोष्टी आकर्षक व मनोरंजक वाटल्यास मुलें आपोआपच तीं वाचतील असें वाटतें. चिऊ–काऊच्या गोष्टी वाचण्याकडे मुलांचा स्वाभाविक कल असतो, हें लक्षांत घेऊन प्रथम पुढल्या गोष्टींकडे मुलांचें लक्ष स्वाभाविक लागावें म्हणून चिऊ–काऊच्या गोष्टींतून पुढें येणाऱ्या गोष्टींचा ध्वनि त्यांत उमटविण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयोग नवीन आहे. बालमनाला तें कितपत रुचतें तें पहावयाचें आहे.

आपल्या मुलांनीं कोणतीं पुस्तकें वाचावीं हें आईनें ठरवावयाचें असतें. लहानपणीं वाचनाच्या गोडीचें बीज रुजविण्याच्या दृष्टीनें व मोठेपणीं जीं देदीप्यमान चरित्रें मुलांनीं वाचावीं असें आईला वाटत असते तीं गोष्टींच्या रूपानें मुलांच्यापुढें ठेवून त्यांच्या बुद्धीच्या खजिन्यांत ही भर टाकून भवानी * करावी हा हेतु मनांत बाळगल्यास मुलांच्या आवडी-निवडीला व अभिरुचीला योग्य वळण लागेल अशी कल्पना आहे.

आपल्या स्वतःच्या मुलांवर विचारपूर्वक श्रम घेतले असतां त्याचा थोडाबहुत फायदा इतर मुलांना होत असेल तर तो त्यांना द्यावा ही माझी प्रामाणिक इच्छा आहे.

---

* मिळालेली पहिली वस्तु देवीला देण्याची पद्धत आहे. ही बुद्धीच्या भांडारांत पडलेली पहिली वस्तु आहे.

माझी मोठी मुलगी आश्लेषा, हिला तिच्या दहाव्या वाढदिवसाच्या दिवशीं हें छोटेसें पुस्तक, सप्रेम भेट म्हणून देत आहे. साधारण या वयाच्या मुलांनाहि वाढदिवसाच्या दिवशीं भेट देण्यास म्हणून हें पुस्तक उपयोगी पडावें अशी इच्छा आहे. आपण वाढदिवसाला फुलेंहि देतों. त्या निमित्तानें हीं चरित्ररूपी पुष्पें मी माझ्या मुलीस देत आहे.

गोष्ट सांगण्याच्या पद्धतीनें या गोष्टी लिहिल्या आहेत. त्यामुळें मुलांचें मन रमण्यास मदत होईल असें वाटतें. कांहीं ठिकाणीं चर्च, हॉस्पिटल, नर्स इत्यादि शब्द हेतुपुरस्सर तसेच लिहिले आहेत. योग्य वातावरण निर्माण करण्यास ते शब्द उपयोगी पडतील असें वाटतें. मोठेपणीं अशीं चरित्रें वाचण्याची जिज्ञासा उत्पन्न करण्यास या गोष्टींचा उपयोग होईल अशी उमेद आहे.

मुंबई
१७–७–१९५८

—सौ. पद्मावती असईकर
जी. ए., बी. टी.



मातोश्री अहिल्यादेवी

23404

# भाग १ ला

## गोष्ट १ ली

## माकडाच्या हातांत—

नर्मदा कांठच्या जंगलांत राहणारीं माकडं, उन्हाळ्यांत पाणी कमी झाल्यावर, नर्मदेंतील गोटे कधीं कधीं हाताळीत बसत. कुणाची चाहूल लागलीच तर झाडांवर उडया मारून सुरक्षितता पटकावीत. या प्रांतांत राहणाऱ्या एका माकडाला, दक्षिणेंत जाऊन हनुमानजींनीं जेथें दिग्विजय मिळविला त्या लंकेला जाण्याची इच्छा झाली. एके दिवशीं आपल्या भाईबंदांचा निरोप घेऊन तो निघाला. कांहीं दिवसांनीं तो रामेश्वराला येऊन पोहोंचला. त्याच्या ओंकारेश्वरासारखंच पवित्र ठिकाण त्याला तेथें आढळलं.

लोक वेगळे, त्यांचं खाणं वेगळ्या प्रकारचं नी उंच उंच नारळाचीं झाडं पाहून तर, मोठं आश्चर्य करीत तें माकड समुद्राच्या कांठावर बसलं. फिरतां फिरतां, एक शिंपला त्याला आढळला. तो हातांत घेऊन तें माकड न्याहाळूं लागलं. त्याला वाटलं हा समुद्रांतला ‘ गोटा ’च आहे.

शिंपल्यांतील मोती म्हणाला, “ देवा, काय हें माझ्या नशिबीं आलं ! यापेक्षां एखाद्या माणसाच्या हातीं पडलों असतों तर त्यानें मला योग्य स्थान मिळवून दिलं असतं ! ”

त्या मोत्याचं आयुष्य फुकट गेलं !

आशू, चांगलं काय नी वाईट काय हें जाणण्याची शक्ति आपण वाढवली नाहीं तर आपणहि माकडाप्रमाणं निर्बुद्ध होऊं.

## मातोश्री अहिल्यादेवी होळकर

आश्लेषा, हीं ‘काला’ नांवाचीं फुलं बघ. विशेषेंकरून आफ्रिकेंत हीं फुलं पाहण्यास सांपडतात. किती डौलदार दिसतात हीं! जणूं कांहीं चांदीच्या निरंजनांत ज्योत तेवत आहे. निसर्गहि या फुलांच्याद्वारें आपल्यांतील धार्मिक भावना जागा करीत आहे असं वाटतं.

मातोश्री अहिल्यादेवीचं चरित्र वाचून माणसांतील अशाच चांगल्या भावना जाग्या होतात. अहिल्यादेवींनीं हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं असलेल्या पवित्र क्षेत्रांतील देवळांत ज्योत तेवत ठेवण्याचा उपक्रम केला व हिंदुधर्माला त्या वेळीं संभाळलं.

दक्षिणेंत औरंगाबादेंत चौंडे खेडेगांवचे पाटील माणकोजी शिंदे नांवाचे होते. त्यांना इ. स. १७२५ त मुलगी झाली. तिचं नांव अहिल्याबाई. ती आठ वर्षांचीच असतांना तिचं लग्न खंडेराव होळकराबरोबर झालं. त्या वेळीं खंडेराव बारा वर्षांचा होता सुभेदार मल्हारराव होळकरांची अहिल्याबाई ही एकुलती एक सूनबाई लग्न झाल्यावर अहिल्याबाई इंदुरास राहण्यास गेली. तिला पांच भाऊ होते. पुढं त्या सर्वांना एक एक लाखाच्या जहागिऱ्या इंदुरांत देण्यांत आल्या

मध्यम वर्गांतील मराठयाच्या मुलीला त्या वेळीं जेवढं शिक्षण देण्याचा रिवाज होता, तेवढंच तिचं शिक्षण झालं होतं. त्या काळीं देवळांत जाऊन कथापुराण ऐकून, स्त्रियांच्या विचारांना योग्य वळण लागे. अहिल्याबाईचं लिहिणंवाचणं जरी जास्त झालं नव्हतं तरी तिच्यांत चांगल्या विचारांचं बीज लग्नापूर्वीच पेरलं होतं यांत शंका नाहीं.

काला—



निसर्गहि या फुलांच्याद्वारें आपल्यांतील धार्मिक भावना जागा करीत असतो.

हिंदुस्थानांत त्या वेळीं मुसलमानांचं राज्य वाढत होतं. दक्षिणेंत व उत्तरेंत मुसलमानांशीं लढून आपला भाग सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न कांहीं लहान लहान प्रांतांचे राजे करित होते. त्या वेळीं महाराष्ट्रांत मराठयांचं राज्य प्रस्थापित झालं होतं. पुण्याला त्यांची मुख्य गादी होती माधवराव पेशवे हे त्या गादीचे मालक होते. त्यांच्या पदरीं नांवाजलेले शूर मराठे लोक कांहीं कमी नव्हते. त्यांच्या मदतीनें उत्तरेंतहि मराठयांच्या राज्याचा विस्तार होत होता. विशेषत: महादजी शिंदे व मल्हारराव होळकरांनीं उत्तरेंत युद्ध करून बरंच शौर्य गाजवलं त्यांच्या या कामगिरीबद्दल माळवा प्रांतांतील कांहीं भाग सुभेदार मल्हाररावांना व ग्वाल्हेर संस्थान शिंद्यांना पेशव्यांकडून बहाल करण्यांत आलं.

मल्हाररावांची कीर्ति वाढत गेली व त्यांची संपत्तीहि वाढूं लागली. मल्हाररावांनीं आपल्या शौर्यावर तीस परगणे मिळवले. त्या वेळीं त्यांचं वार्षिक उत्पन्न सात लाख होतं. अशा कर्तबगार सासऱ्याच्या छत्राखालीं अहिल्याबाई होती.

हळूं हळूं अहिल्याबाई आपल्या गुणांनीं सासू-सासऱ्यांची आवडती झाली. तिच्या वागणुकीनं त्यांचं प्रेम तिनं संपादन केलं. खंडेराव मात्र दुर्वर्तनी होता. तरीसुद्धां अहिल्याबाईशीं तो वचकूनच वागे. मल्हाररावांच्या सहवासांत असतांना, त्यांचे युद्धांतील डाव-पेंच, धोरण व राज्यकारभाराविषयींची माहिती तिनं मिळवली होती. हिंदुस्थानांत ज्याची कीर्ति पसरली होती अशा सुभेदाराला व राजाला शोभणाऱ्या सुनेच्या पदाला ती पोहोंचली होती. त्या काळांत तिचे डोळे सूक्ष्मदृष्टीनं पहात होते, तिचं मन नीट विचार करीत होतं व तिचं अंत:करण कांहींतरी सांठवीत होतं.

माकडाच्या हातांत—

इ. स. १७४१ त खान नदीच्या काठीं मल्हाररावांनीं इंदूरला राजवाडा बांधला. तेथें सावकारांची व व्यापारी लोकांची वस्ती वाढूं लागली. मल्हाररावांना पेशव्यांकडून व आजूबाजूच्या राजांकडून व राणांकडून नजराणे येऊं लागले. त्यांच्या खजिन्यात सोनं व चांदी भरूं लागले. त्यांचं ऐश्वर्य वाढलं व ते इ. स. १७४८ पासून ' राजे ' या पदावर पोहोंचले.

मल्हाररावांना पेशव्यांच्या दरबारांत त्याचप्रमाणें दिल्लीच्या मोंगल दरबारांत मानाचं स्थान मिळालं. पेशव्यांशीं ते एकनिष्ठ राहिले. पेशव्यांची गादी ही आपल्या मालकाची गादी आहे या भावनेला जागून ते नेहमीं वागत.

अशा रीतीनं मल्हारराव आपल्या यशाच्या व सुखाच्या उच्च शिखरावर पोहोंचले होते. कुंभेरीचा किल्ला जाट लोकांच्या स्वाधीन होता. युद्धावांचून ते खंडणी देण्यास तयार होईनात. मराठ्यांनीं त्यांच्या किल्ल्याला वेढा दिला. अहिल्याबाई युद्धांत सासऱ्याला साहाय्य करण्यास त्यांच्याबरोबर गेली होती. खंडेरावहि बापाबरोबर नामधारी होता. त्याला घुटीचं व्यसन होतं. त्या नशेंत तो निशाणा-जवळ आला तोंच त्याच्या मस्तकांत गोळी शिरली व तो ठार झाला.

बिचाऱ्या अहिल्याबाईवर हा पहिलाच मोठा प्रसंग आला. त्या वेळीं अहिल्याबाईचं वय अवघं २१ वर्षांचं होतं नी तिला मालेराव व मुक्ताबाई अशीं दोन मुलं होतीं.

एकुलत्या एका मुलाच्या मृत्यूची दुःखवार्ता कानीं पडतांच मल्हारराव वेडाच झाला! आपल्या पतीबरोबर सती जाण्याचं अहिल्याबाईनं ठरवलं. आशू, त्या वेळीं पतीबरोबर हिंदु स्त्रिया सती

जात. आपल्या पतीच्या मागं जिवंत राहणं वाईट, अशी त्या वेळीं समजूत होती अहिल्याबाईनंहि त्या काळाला अनुसरून सती जाण्याचं ठरवून ती त्या तयारीला लागली.

मल्हाररावाला ही बातमी कळतांच तो तिच्याकडे धावतच आला. त्याला काय करावं तें सुचेना. अगदीं दीन मुद्रेनं तो तिला म्हणाला, " मुली, तूं हें काय आरंभिलं आहेस ? या म्हाताऱ्याची तुला कांहींच का कींव येत नाहीं ? मला दु:खांत लोटून माझा खंडू निघून गेला नी तूंहि मला सोडून गेलीस तर अशा या म्हातार-पणीं कुणाच्या आधारावर मी दिवस काढूं ? तूंहि निघून गेलीस, कीं माझा प्राण एक क्षणभरहि या जगांत रहाणार नाहीं. मग तुझ्या मुलांचं कसं होईल ? त्यांचा सांभाळ कोण करील ? मुली, आम्हांवर कोसळलेला दु:खाचा कहर कल्पनातीत आहे खरा, पण भावी परिस्थितीकडे लक्ष देऊन विवेकानं मन घट्ट केलं पाहिजे. माझ्या मागं माझा खंडू स्वराज्याच्या घटनेला आधारभूत होईल अशी मला मोठी आशा होती, पण ती दुर्दैवानं फोल झाली. तरीपण तूं ती सफल करून, होळकर घराण्याचं नांव अजरामर करशील अशी मला पूर्ण खात्री आहे. तेव्हां सती जाण्याचा विचार दूर सारून, या म्हाताऱ्यावर दया कर." याप्रमाणं मल्हाररावानं सुनेची करुणावाणीनं, अनेक प्रकारानं विनवणी केली तेव्हां अहिल्याबाईला सासऱ्याची विनवणी मान्य करणं भाग पडलं. परिस्थितीच्या फेऱ्यांत पडून जर अहिल्याबाई सती गेली असती तर त्या शिंपल्यांतील मोत्याप्रमाणं अहिल्याबाईच्या सद्गुणांचं तेज झांकलेलंच राहिलं असतं. तिच्या चारित्र्याचा प्रकाश पडला नसता नी या बहुमोल रत्नाला मुकावं लागलं असतं. पण सुदैवानं

तिच्या गुणाची किंमत जाणणाऱ्या मल्हाररावासारख्या रत्न-पारख्याच्या हातीं हें माणिक पडलं होतं नी म्हणूनच तिच्या चारित्र्याला, आश्लू, यापुढं वेगळी कलाटणी मिळाली.

× × ×

## सुभेदाराच्या तालमींत अहिल्याबाई

राज्यकारभार कसा चालवावा हें शिक्षण सुभेदाराच्या तालमींत अहिल्याबाई घेत होती. हिंदुस्थानांत मल्हाररावांचं महत्त्व वाढलं होतं. ते कधीं आघाडीवर सैन्य घेऊन जात, तर कधीं पुणें दरबारांत बसून नवीन मसलती पेशव्यांना सुचवीत, तर कधीं आपला स्वतःचा राज्यकारभार पाहत. निरनिराळ्या राज्यांत उपस्थित होणारे प्रश्न ते सोडवीत असत. मल्हाररावांच्या प्रत्येक बाबींवर अहिल्याबाईचं पूर्ण लक्ष असें. अशा रीतीनं राज्यकारभारांतील उत्तम शिक्षण तिला मल्हाररावांकडून मिळालं. या वेळेस तिच्या अंतःकरणांत दया, क्षमा व शांतीच्या सद्गुणांना अंकुर फुटलेला होता. हिंदु धर्मांतील मुख्य व महत्त्वाच्या तत्त्वांची पकड घेतलेल्या तिच्या मनाला, मल्हाररावांच्या शिक्षणाचं उत्तम खत मिळालं व त्याला शोभेसं राणपिदाहि पुढं मिळाल्यावर उत्तम फलांची लयलूट झाली !

मल्हारराव युद्धांत गुंतलेले असले, कीं घरचा कारभार अहिल्याबाईस करण्यास देत व योग्य ती व्यवस्था तिच्याकडून करवून घेत. आश्लेषा, हें मल्हाररावांनीं अहिल्याबाईस लिहिलेल्या पत्रांवरून समजून येईल त्यांतील आशय असा होता.

“( तारीख ३-१२-१७६२ ) मल्हारजी होळकरांचा अहिल्याबाईस अनेक आशीर्वाद. आम्ही सर्व खुशाल आहों. तुमचें तिकडे

कसें चाललें आहे ? आम्हांला श्रीमंतांनीं (पेशव्यांनीं) कळवलें आहे कीं, पिंपरखेडचे पाटील, कुसाजी पाटील शिंदे, यांच्या पुतण्याचें घर व शेत शंभुगीर गोसाव्यानें जप्त केलें आहे. श्रीमंतांची आज्ञा आहे कीं, त्यानें तें शेत व घर पाटलांच्या सुपूर्त करावें. पाटलांचे पुतणे सध्यां वाफगांवला आहेत. गोसावीनें पाटलांच्या माणसांना व नोकरांनाहि कैदेंत टाकलें असल्यास त्या सर्वांची ताबडतोब सुटका व्हावी. यासाठींच तुम्हांला हें पत्र धाडलें आहे. यावर ताबडतोब इलाज करण्याचे सर्व हक्क आपणांस दिले आहेत. कळावें अनेक आशीर्वाद."

"(तारीख ३–२–१७६५) मल्हारजी होळकरांचा अहिल्याबाईस अनेक आशीर्वाद. मी निघण्यापूर्वीं आपल्याला ग्वाल्हेरला जाण्याचें सांगून निघालों होतों. वाटेंत मथुरेला किंवा आग्र्याला थांबण्यांत वेळ दवडूं नका. मी आतां ऐकतों कीं, आपण कांहीं दिवस मथुरेला थांबणार आहांत. आमच्या हुकमाला न जुमानतां आचरण करण्याचें कारण काय ? हें बरोबर नाहीं. आपल्या इच्छेप्रमाणें वागण्याचें ठरवलें असेल तर आपल्याला यात्रेला जाण्याची पूर्ण मोकळीक देतों. हें पत्र मुद्दाम आपल्या नांवानें पाठवीत आहें. मथुरेला पाणी पिण्यासहि थांबायचें नाहीं असें निक्षून सांगतों. ताबडतोब चंबळ नदी ओलांडून ग्वाल्हेर गांठा. जर व्यवस्था मनाजोगी असेल तर ग्वाल्हेरला चार-पांच दिवस मुक्काम करा. तोफांचा योग्य बंदोबस्त करा. कारखान्यांत लहान व मोठ्या बंदुकांचीं काडतुसें बनविण्यास लावा. कांहीं झालें तरी ग्वाल्हेरला पोहोंचण्यापूर्वीं कोठेंहि वेळ काढूं नका. आम्ही वरचेवर कळवूं त्याप्रमाणें ताबडतोब व्यवस्था करण्याच्या तजविजींत असा.

ग्वाल्हेरला युद्धसामुग्री उत्तम व भरपूर हवी. एका महिन्याची तरतूद करून नंतर ग्वाल्हेर सोडावें. रस्त्यांत आपल्या सुरक्षिततेची व्यवस्था करून नंतर निघावें. कळावे हा आशीर्वाद."

"मल्हारजी होळकरांचा अहिल्याबाईस अनेक आशीर्वाद. ग्वाल्हेरच्या ऐवजीं सिरोंजेला सर्व व्यवस्था केली. ठीक झालें, इंदूर व सुलतानपूरच्या कारभाराकडे लक्ष पुरवावें. जनावरांना दाणा–घांसाचा भरपूर सांठा करावा. कळावें."

अशा रीतीनं लष्कराची हालचाल कोणत्या धोरणानं होत आहे, वसुली कशी झाली पाहिजे, कारखान्यांत माल कसा तयार करून घेतला पाहिजे, राज्यकारभार कोणत्या धोरणानं चालवला पाहिजे व न्याय देण्याची त्या वेळची पद्धत कशी होती वगैरे उपयुक्त शिक्षण अहिल्याबाईस मिळालं.

उत्तर हिंदुस्थानांत मराठ्यांच्या राज्याचा विस्तार करण्यांत मल्हारराव गुंतले असतां, इ. स. १७६६ त २० मे रोजीं अलमपूर येथें त्यांचा अंत झाला.

× × ×

## राणी अहिल्याबाई

अहिल्याबाई राज्यकारभार पाहूं लागली. कारण त्या वेळीं मालेराव २१ वर्षांचा होता; परंतु तो कारभार हातीं घेण्यास नालायक होता. मल्हाररावांच्या मृत्यूच्या वेळीं राघोबादादा माळव्यांत होते. त्यांनीं सुभेदारीचं काम मालेरावावर सोपवलं होतं. त्या वेळीं मल्हार-रावाबरोबर मालेराव होता.

आपली जबाबदारी ओळखून अहिल्याबाईनं—राणीपदावर चढलेल्या आईनं—बदलत्या काळांत मन स्थिर ठेवून मालेरावाला पत्र पाठवलं.

" (तारीख ४–६–१७६६) आम्ही सर्व खुशाल आहों. तुम्ही कसे आहांत तें कळवावें. तुमच्याकडून पत्र नसल्यामुळें तिकडील कांहींच बातमी नाहीं व त्यामुळें काळजी वाटत आहे. आम्हांला सविस्तर हकीगतचें पत्र येत गेलें पाहिजे. आतांपावेतों दोन-चार पत्रें पाठवूनही आपल्याकडून उत्तर नाहीं. गेल्या गोष्टींवर दुःख करीत बसण्यांत अर्थ नाहीं. आतां तुम्हीं आपल्या राज्यकारभाराकडे लक्ष पुरविलें पाहिजे व जेणेंकरून आपली इभ्रत वाढेल असेंच आचरण आपल्याकडून झालें पाहिजे. आपलें मन व बुद्धि राज्यकारभाराच्या बाबतींत चालवून आपली कर्तबगारी दाखविली पाहिजे. चिरकाल टिकणाऱ्या गोष्टींकडे लक्ष पुरविलें पाहिजे. आपल्या आजोबांच्या पावलांवर पाऊल टाकलें पाहिजे. त्यांनीं घातलेल्या पायावर जी भिंत चढवली आहे तीस डोळ्यासमोर ठेवून त्यांचें कार्य पूर्ण करण्यास लागा. त्यांनीं दाखवून दिलेली कामगिरी हातीं घ्या आणि त्यांच्याप्रमाणेंच कीर्ति संपादन करा. आपल्यांतील वाईट विचारांना व शंकाकुशंकांना सोडून द्याल अशी खात्री आहे. उदात्त विचार व मोठें ध्येय पुढें ठेवल्यानें मोठी कीर्ति संपादन कराल, याची खात्री आहे. गंगाधरपंत तात्यांच्या सांगण्याप्रमाणें वागावें."

× × ×

मांकडाच्या हातांत—

# मालेराव

अहिल्याबाईच्या पोटीं जन्म घेतलेला मालेराव दुष्टवृत्तीचा निघाला, हें अहिल्याबाईस एक मोठं शल्यच होतं. परमेश्वर अहिल्याबाईची कसोटीच घेत होता जणूं कांहीं ! पतीच्या निधनानंतर सासऱ्याचा मृत्यु, नी आतां मालेरावाशीं संबंध ठेवून राज्यकारभाराची मोठी जबाबदारी वाहून नेणं म्हणजे कांहीं लहानसहान गोष्ट नव्हती ! मोठेपणाबरोबरच जबाबदारी वाढली. अशा विकट स्थितींत मनाचा समतोल राखून विवेकाचं आचरण करण्यांतच तिचा मोठेपणा होता. ती आई होती म्हणून तिला कांहीं मुलाचे दुर्गुण दिसत नव्हते असं नव्हतं. कांहीं झालं तरी देहांत प्राण असेपर्यंत मुलाची मायाहि पणाला लावून प्रजेचं हित करण्याचं मोठं ध्येय ठेवून राणीपदाला शोभेसंच वर्तन तिनं केलं नी म्हणूनच सर्व प्रजेची ' मातोश्री ' या नांवाला ती पात्र झाली.

अहिल्याबाईला मालेरावाच्या दुर्वर्तनानं अधिक उद्वेग होत होता. कोणत्याहि बाजूनं तिच्या मनाला शांतता नव्हती. गादीवर येण्यापूर्वीं मालेरावाचं वागणं अविचाराचं. मूर्खपणाच्या लहरींतच त्याच्या हातून दुष्ट आचरण घडत असे. अहिल्याबाईच्या हातून एका जीवजंतूलाहि पीडा पोहोंचत नसे. ब्राह्मणांना, त्या वेळच्या समजुती-प्रमाणं ती देवाप्रमाणं मानी. मालेरावाचं तिच्या अगदीं उलट वर्तन होतं. " वस्त्रं व पागोटीं दान देतों, " असं सांगून तो ब्राह्मणांना बोलावी व त्यांत विषारी विंचू ठेवून ब्राह्मणांस दान देई. त्यांना विंचू चावला कीं ते थयथय नाचत व त्यांचा तो थयथयाट पाहिला कीं, मालेरावाला कृतकृत्य झाल्याचा आनंद वाटे.

मुलाच्या या दुष्ट वर्तनाच्या, अहिल्याबाईच्या सोज्ज्वळ मनाला वेदना लागत असत पण ती दैवाला हात लावून मनाचं सांत्वन करी राजवाड्यांत एक दासी होती. तिच्या ओळखीचा एक इसम होता. मालेरावाच्या मनांत त्या इसमाबद्दल संशय आला. तो मांत्रिक होता. आपला मुलगा आतां कांहीं क्रूर कृत्य करणार असा अहिल्याबाईस संशय आला. तिनं त्याच्यावर नजर ठेवली. परंतु एके दिवशीं मालेरावानं त्याला गांठलंच ! " मी सर्वस्वीं निरपराधी आहे, मला निष्कारण मारूं नका " अशी त्यानं विनवणी केली. शेवटीं, " मला जर फुकट मारलेंत तर मी समंध होऊन तुमच्या मानेवर बसेन " अशीहि त्यानं भीति घातली; परंतु मालेरावानं शेवटीं त्यास ठार मारलं.

नंतर चौकशी करतांना असं दिसून आलं कीं, तो इसम निरपराधी होता. मालेरावाला पश्चात्ताप झाला त्याच्या मेंदूला भ्रम पडला व तो आजारी पडला. " पिशाच्चा ! मला सोड, मी तुझा चुकून खून केला. मला असा छळूं नकोस. मी तुझी क्षमा मागतों " असं मालेराव वडबडूं लागला. अहिल्याबाईचा भुताखेतांवर विश्वास होता. तिनं मालेराव बरा व्हावा म्हणून त्या पिशाच्चाला नाहीं नाहीं त्या गोष्टी देण्याचं कबूल केलं; परंतु मल्हाररावाच्या मृत्यूनंतर आठ महिन्यानं इ. स. १७६७ त ५ एप्रिल रोजीं मालेरावाचाहि अंत झाला.

× ×

मल्हाररावांनीं वाढविलेल्या राज्यावर आपत्तींवर आपत्ति येऊं लागल्या. नवीन जन्मलेल्या या राज्याचा अंत, बाल्यावस्थेंतच होतो

माकडाच्या हातांत—

कीं काय अशी भीति उत्पन्न झाली होती. अशा स्थितींत राज्याचं पोषण करून वाढविण्याची मोठी कामगिरी अहिल्याबाईनं आपल्या बाणेदार व करारीपणावरच करून दाखविली. तिचं मन बळकट व धीरवान् नसतं तर आजूबाजूच्या स्वार्थसाधु राजांनीं होळकरांचं राज्य गिळंकृत केलेलं कदाचित् आज आढळलं असतं.

अहिल्याबाईची आतां फक्त मुक्ताबाईच काय ती राहिली होती. तिचं लग्न यशवंतराव फणसे यांच्याशीं झालं. मुक्ताबाईला नत्थाबा हा एकच मुलगा झाला.

इ. स. १७५० पासून मल्हाररावाच्या बरोबरच युद्धावर जाणारा तुकोजी होळकर याला पेशव्यांनीं सुभेदारी दिली. पेशव्यांना पूर्वीप्रमाणंच त्यांनीं मदत करावी असं ठरल्यावर त्याचा गादीवरचा हक्क शाबीत झाला. तुकोजीनं युद्धाचं काम हातीं घेतलं व अहिल्याबाई राज्यकारभार पाहूं लागली. तुकोजी अहिल्याबाईला आईच समजे व तो तिच्या अर्ध्या वचनांत रहात असे. त्यामुळें पुन्हां इंदूरची राज्यव्यवस्था सुरळीत चालूं लागली.

## सुव्यवस्था

मल्हाररावांच्या वेळेपासून गणोबा तात्या हा त्यांच्या माहितींतला होता. तो वारंवार राज्यकारभारांत सल्ला देई. त्यानं एकंदर चाळीस वर्षं काम केलं होतं. मालेरावाच्या मृत्यूनंतर गादीवर कोणीं बसावं हा प्रश्न जेव्हां उपस्थित झाला तेव्हां अहिल्याबाईला सांगून एखादा मुलगा दत्तक घ्यावा व त्याच्या वतीनं आपण राज्यकारभार करावा व योग्य संधि मिळतांच हात मारावा, अशा हेतूनं तो अहिल्याबाईकडे गेला व तसं सांगूं लागला. अहिल्याबाईनं गणोबा तात्याच्या मनांतील

हेतु ताडला व तिनं योग्य उत्तर देऊन त्याला गप्प बसवलं. अहिल्याबाई तशी भोळी नव्हती. तिचा करारीपणा व बाणेदारपणा वारंवार दृष्टीस पडतो.

राघोबा दौलतीसाठीं वाटेल तें करील असं जाणून गणोबानं राघोबास पत्र पाठवलं, "बाई दुःखांत आहे. दौलत बेवारस झाली आहे. अनायासें आलेल्या संधीचा लाभ घेण्यास लवकर निघून यावें." पत्र पोहोंचतांच राघोबा सैन्य घेऊन घारीसारखे धावत आले.

"ब्राह्मण हरामखोरीस आला," हें अहिल्याबाईनं ओळखलं. तिनं आपलं दुःख बाजूला सारलं व भोसले, गायकवाड व दाभाडे यांना पत्रं पाठविलीं.

"श्रीमंतांचे दौलतीचा पाया खोदून वीट आपल्या हातीं टाकून इमारत उभी केली. आमच्या दौलतीविषयीं पापबुद्धि धरली आहे. त्यापेक्षां दौलत जागवून आम्हांस हमराई करून सेवाचाकरी करून घ्यावी. आज आम्हांवर हा प्रसंग, उद्यां तुमच्यावर येईल. म्हणून मदत द्यावी."

मल्हारराव सर्वांच्या लोभांतले होते. त्यांच्या सुनेवर हा प्रसंग आलेला पाहून सर्व मदतीसाठीं धावत आले.

अहिल्याबाईनं पुणें दरबारीं माधवरावांसहि पत्र पाठवलं. त्यांच्याकडून जबाब आला — "तुमच्या दौलतीचा अभिलाष धरणारास योग्य शासन द्या."

उदेपूरला तुकोजी होळकर होता. त्यालाहि बोलावलं. अहिल्याबाईनं दरबारांत माधवरावांचं पत्र वाचल्यावर ती मोठ्यानं म्हणाली, "मेल्या ब्राह्मणानं खाल्लेल्या घरचे वासे मोजण्यास आरंभ केला आहे.

मी बायको माणूस, काय करणार, हें स्वप्नींहि आणूं नका. खांद्यावर वांसडा टाकून उभी राहीन, तेव्हां श्रीमंतांचे दौलतीस जड जाईल ! ही दौलत आमच्या वडिलांनीं अशीतशी मिळवली नाहीं ! आम्ही शिलेदार, वडिलांचे चाकरीप्रमाणं चाकरी घेतल्यास हजर आहोंत. ब्राह्मण म्हणतील दौलतीचा अभिलाष धरूं, तर ती गोष्ट कधींच शक्य नाहीं. ''

'' अहिल्याबाई वरून आव आणीत असली तरी लढाईला उभं राहण्याचं तिला कुठून धैर्य होणार ? तिला समजुतीच्या दोन गोष्टी सांगून हातांत कारभार घ्यावा'' असं गणोबास वाटलं. तो तिच्याकडे एकदा गेला, पण त्याला उत्तर मिळालं तें हेंच...... '' होळकरांच्या इभ्रतीला कमीपणा आणणारं आचरण मी कधींच करणार नाहीं. राघोबाला आमच्या कारभारांत लांडा व्यवहार करण्याचा काय अधिकार ! मालेरावाची आई व खंडेरावाची बायको मीच. तेव्हां साहजिकच दौलतीची मालकीण मी ! दत्तक घेणं न घेण्याचा अधिकार माझा ! त्यांत तुमची ढवळाढवळ कशाला ? काय वाटेल ते प्रसंग आले तरी मी कधींच नमणार नाहीं. ''

गंगोबा तात्याच्या हरामखोरीनं राघोबादादा सैन्यासह उज्जयिनीस येऊन पोहोंचले. या वेळीं महादजी शिंदे बरोबर होते. त्यांनीं राघोबाला स्पष्ट सांगितलं, '' सुभेदारांनीं आम्हांस फार ऋणांत ठेवलं आहे, तेव्हां त्यांच्या सुनेविरुद्ध आम्हीं तुम्हांस मुळींच साहाय्य करणार नाहीं ''

इतक्यांत अहिल्याबाईनं राघोबाला अगदीं मार्मिक निरोप पाठवला कीं, '' स्त्रीबरोबर युद्धाला उभे राहूं नका. नाहींपेक्षां उगाच नांवाला अक्षयचा डाग जडेल. युद्धांत मला अपयश आलें तर मी बायको

माणूस, मला कोणीहि हसणार नाहीं, पण तुमचा पराभव झाला तर सर्व जगभर तुमच्या अपकीर्तीचा डंका गाजेल! काय तो पूर्ण विचार करा व आल्या पावलानें मागें परतां. याउप्पर आपली इच्छा! मी तर लढाईची तयारी चालविली आहे."

अहिल्याबाईनं जारीनं युद्धाची तयारी चालविली व तिच्या लोकांनींहि मोठ्या उत्साहानं भाग घेतला. भोसले आले, इतर सरदार आले व तुकोजीहि तीरासारखा उदेपुराहून आला. त्यानं राघोवास निरोप पाठवला, "आपण मला पित्याप्रमाणें आहांत. तरीपण क्षिप्रा उतरतांच तुमची आमची तलवार चालेल."

राघोवा विचारात पडला. त्याचंहि मन डगमगूं लागलं व त्यानं निरोप पाठवला, "मालेरावबावा वारले म्हणून अहिल्याबाईच्या समाचाराला आलों आहें. तुम्ही हा काय निरोप पाठवितां?"

"समाचाराला यायचं तर बरोबर फौजफाटा कशाला? आमची दौलत ती आपलीच आहे" असा निरोप राघोवाला पाठविला.

राघोवा पालखींत बसून इंदुरास आले. तुकोजी त्यांना सामोरा गेला. ते महिनाभर इंदुरास राहून परत गेले.

× × ×

## सलोख्याचं धोरण

तुकोजी शूर, सरळ व सत्त्वशील होता. तो अहिल्याबाईच्या आज्ञेंत असे. राजमुद्रेवर "मल्हाररावजी सुत तुकोजी" असं लिहिण्यांत आलं. अहिल्यादेवीचा राज्यकारभार इ. स. १७६६ पासून सुरू झाला.

मल्हारराव शूर होते म्हणून आजूबाजूंचीं लहानमोठीं राज्यें गप्प होतीं. त्यांच्या शौर्यामुळं त्यांना कांहीं भाग रजपूत राजांकडून देण्यांत आले होते. परंतु तेथील लोकांना मनापासून जरी तें आवडलं नव्हतं तरी ते गप्प होते. परंतु मल्हाररावांच्या मृत्यूनंतर तेथें राहणाऱ्या चंद्रावतांनीं बंड उभारलं. शिवाय तांडदेव भिल्लांच्या लोकांनीं बंड करण्यास सुरुवात केली. त्या सर्वांचा बंदोबस्त करून राज्यांत शांतता राखण्याची पहिली जबाबदारी अहिल्याबाईवर आली. त्यांना घरं बांधण्यास तिनं पैसे दिले व त्यांना शेती करण्यास जमिनी दिल्या. त्यांच्यांतील तंटे मिटवले व कांहींना नोकऱ्या देऊन त्यांना विश्वासांत घेतलं. अशा धोरणानं वागून तिनं शत्रूंचाहि मन जिंकलं.

या वेळीं तुकोजी पेशव्यांबरोबर गुंतला होता. त्या वेळीं उदेपूरचा महाराणा चाल करून आला. शरीफभाईच्या हाताखालीं सैन्य देऊन पलसुद्याला जय मिळविला व तह करण्यांत आला. या युद्धांतील सैन्याची हालचाल अहिल्याबाईच्या सांगण्यानंच झाली होती. सामोपचारानें युद्ध टाळतां आलं तर ती प्रथम पाही व जर तें शक्य नसलं तरच युद्धाची तयारी ती करी.

चंद्रावतांच्या बरोबर मंदोसरलाहि मोठी लढाई झाली. अहिल्याबाईचं प्रत्येक हालचालीवर लक्ष असे. या युद्धांत होळकरांना जय मिळाला. यामुळें अहिल्याबाईच्या निपुणतेबद्दल तिची कीर्ति वाढली. पुण्याच्या दरबारांत नाना फडणिसांनीं तिची स्तुति केली.

राजकारण खेळण्यास लागणारे सर्व गुण व धोरण तिच्यांत होतें. तिनं सत्तावीस वर्षं राज्यकारभार केला. शांतता राखणं हें तिचं मुख्य धोरण होतं. तिच्यावर जर कोणी आपण होऊन चालून

आला तरच ती शस्त्रांनीं त्याचा प्रतिकार करी. ती क्षमाशील होती. बंडवाल्यांना पश्चात्ताप झालेला पाहून ती त्यांना क्षमा करी. न्यायाच्या वेळीं योग्य त्या कायद्यांत सुधारणा करून व वेळ पडल्यास दया दाखवून राज्यांत शांतता नांदवीत असे.

वसुलीकरितां लोकांना त्रास द्यायचा नाहीं. आपल्याला मदत करणाऱ्या सरदारांवर युद्धाचा वायफळ खर्च बसवायचा नाहीं व कोणावरहि अन्याय होतां कामा नये हें तिचं सांगणं असे. आपल्या सुखापेक्षां प्रथम प्रजेचं सुख पाहिलं पाहिजे व त्यांच्यावर यत्किंचितहि जुल्म होतां कामा नये असं तिचं म्हणणं असे.

सरदारांना जहागिऱ्या देऊन ती त्यांना संतुष्ट करी. त्यांच्या कामगिरीचा योग्य मोबदला त्यांना मिळे. या सरदारांच्या आश्रयाला ज्योतिषी, शास्त्री, पंडित, पुराणिक, वैद्य व कवि रहात. इतकी सुबत्ता त्या वेळीं होती. केवळ आपलाच खजिना भरावा अशी स्वार्थी दृष्टि अहिल्याबाईची कधींच नव्हती. ती निर्लोभी होती. तिच्या वेळीं संस्थानाचा व खाजगी खजिना मोठा होता. तो सर्व तिनं प्रजेच्या सुखाकरितां व हिंदुस्थानच्या कल्याणाकरितां खर्च केला.

× × ×

## न्याय

अहिल्याबाई स्वत: न्याय देई. त्या वेळीं अनेक प्रश्न उपस्थित होत. दत्तकाचा प्रश्न, वसुलीचा प्रश्न, कैद्यांचा प्रश्न. सर्वच प्रश्न ती योग्य रीतिनं सोडवी.

खरगोण गांवांत तापीदास व बनारस नांवाचे दोघे बंधु धनाढ्य सावकार होते, पण दोघेहि निपुत्रिक असे एकामागून एक वारले.

त्यांच्याजवळ दोन लाख रुपये रोख व दोन लाख रुपयांचं येणं, अशी संपात्ति होती. तापीदासाची बायको महेश्वरीं अहिल्याबाई-जवळ आली व म्हणाली, "माझ्या नवऱ्यानं व दिरानं मिळवलेली संपत्ति, मी आपल्या चरणीं सादर करतें; तिचा स्वीकार करावा." तेव्हां अहिल्याबाई म्हणाली, "बाई, तुझ्या नवऱ्याच्या व दिराच्या संपत्तीवर माझा कोणता हक्क आहे? ती तुझ्या पूर्ण मालकीची आहे. ती घेण्याचा मला कोणता अधिकार आहे? तुला जर ती नको असेल, तर तुझ्या नवऱ्याचं नांव राहील अशा दानधर्मांत किंवा लोकोपयोगी कार्याकडे खर्च कर."

तापीदासाच्या बायकोनं बाईच्या आज्ञेप्रमाणं एक घाट व देऊळ बांधलं.

एकदां एक नगरशेट मेला त्याच्या बायकोनं दत्तकाकरितां अर्ज केला; पण अधिकाऱ्यांनीं तिला दत्तकाची परवानगी न देतां सालिना पांचशें रुपयांच्या पोटगीवर ते तिची सर्व दौलत सरकार जमा करूं लागले. तेव्हां ती बाई इंदूरहून महेश्वरीं आली व अहिल्याबाईच्या पायां पडली.

अहिल्याबाईनं तिचं सर्व म्हणणं ऐकून घेतलं. या वेळीं अहिल्या-बाईजवळ कांहीं कारभारी बसले होते. तेहि म्हणूं लागले कीं, "मयत सावकाराची संपत्ति पुष्कळ आहे, तेव्हां दत्तकाची परवानगी देण्यापूर्वीं नजराणा काय देणार तो ठरवावा." त्यावर अहिल्याबाई म्हणाली, "बाईच्या मृत नवऱ्यानं निढळाच्या घामावर मिळवलेल्या संपत्तीवर दरबाराचा काय हक्क आहे? दत्तकाची परवानगी देणार आम्ही कोण? हिंदुधर्मशास्त्राप्रमाणं दत्तक घेण्याचा हक्क ज्याच्या त्याच्या खुषीवर अवलंबून आहे. त्याच्या परवानगी-

करितां नजराणा काय म्हणून ? कायद्याच्या जबरीनं प्रजेच्या माना मुरगळून मला अनीतीनं दौलत वाढवायची नाहीं. प्रजा आहे म्हणूनच आमचा दरबार आहे. त्या प्रजेचं रक्त शोषून होळकरांच्या कीर्तीला कलंक लावण्याची दुर्बुद्धि सुभेदारांच्या या सुनेला प्राणांतींहि आठवणार नाहीं. जा बाई, तुमची इच्छा असेल त्या मुलाला घ्या व आपल्या नवऱ्याच्या नांवानं धर्मशाळा किंवा अन्नछत्र घाला. तुमचा नजराणा घ्यायची आमची मुळींच इच्छा नाहीं."

× × ×

आशू, याला म्हणतात मनाचा दिलदारपणा ! आपल्या राणीपदास शोभेल असंच वर्तन तिनं ठेवलं. दुसऱ्यांना लुबाडून मालमत्ता करण्याची क्षुद्र मनोवृत्ति तिच्यांत नव्हती. अहिल्याबाईला आपलं वर्तन आदर्श राखतां येण्याचं कारण म्हणजे तिचा हिंदुधर्मावर मोठा विश्वास होता. तिच्या पापपुण्याच्या कल्पना जिवंत होत्या.

खाजगी खजिन्यांतील पैसा अहिल्याबाईनं दानधर्मांत खर्च केला. ती स्वत: शिवभक्त होती. हिंदुस्थानच्या उत्तर ते दक्षिण व पूर्व ते पश्चिम, या ठिकाणीं जेथें जेथें म्हणून क्षेत्रं आहेत त्या त्या ठिकाणीं अहिल्याबाईनं देवळं, घाट, धर्मशाळा, अन्नछत्र, विहिरी व कांहीं ठिकाणीं रस्ते बांधून यात्रेकरूंची व्यवस्था केली. देवळांची व्यवस्था नीट रहावी म्हणून ती पैसे पाठवी व देवळांत दिवे लावण्याचा खर्च देई. कांहीं ठिकाणीं धान्य पाठवी. अशी एक का दोन अनेक लोकोपयोगी कामं तिनं केलीं. सर्वांत मोठं जें अन्नदान, तें साधण्याचा प्रयत्न ती करी.

तिच्याकडे आलेल्या लोकांचा परामर्श ती चांगल्या प्रकारें घेई. एकदा कवि मोरोपंत व प्रसिद्ध लावण्या रचणारा अनंत फंदी यांना

बोलावून त्यांचा अहिल्याबाईनं चांगला सत्कार केला. कारागिरांना तिनं आश्रय दिला व त्यांच्या धंद्याला उत्तेजन दिलं.

अहिल्याबाईच्या लायब्ररींत जवळजवळ शंभर पुस्तकं होतीं. तिचं वाचन दांडगं होतं.

× × ×

## महेश्वर

अहिल्याबाई महेश्वरालाच राहून राज्यकारभार पाही. इ. स. १७३३ त मल्हाररावांनीं महेश्वरचा किल्ला घेऊन त्याची डागडुजी केली. तेथें राजवाडा बांधला व लोकांची वस्ती वाढवली. अहिल्याबाई इ. स. १७६७ पासून तेथें कायमची राहूं लागली. नर्मदा नदीचा घाट व सरकारी बंगला तिनं बांधला. हळूंहळूं नर्मदा नदीच्या कांठावर श्रीकाशी, विश्वेवर, श्रीराम, श्रीकृष्ण व श्रीविठ्ठल यांचीं मंदिरं बांधण्यांत आलीं.

किल्ल्याच्या खालच्या बाजूला विणकरी लोकांची पेठ वसली गेली. ते लोक सुंदर तलम महेश्वरी लुगडीं विणूं लागले. अद्याप त्यांचा माल पुणें—मुंबईला चांगला खपतो.

महेश्वरला सावकार व व्यापारी लोकहि येऊन राहूं लागले. आदितवार व मंगळवार पेठेंत या लोकांची वस्ती झाली. अशा रीतिनं विद्वान् लोकांना, कारागिरांना, शूर लोकांना, व्यापारी वर्गाला व गरीब लोकांनाहि महेश्वराला सुखासमाधानानं राहतां येऊं लागलं.

इतक्या वर्षांनीं जरी तिथें कोणी जाईल तरी अथांग वाहणारी नर्मदा नदी, तिच्या कांठावर बांधलेला घाट व मंदिरें अहिल्यादेवीच्या पवित्रतेची साक्ष पटवतील.

इ. स. १७९१ त मुक्ताबाई आपल्या पतीच्या निधनानंतर सती गेली. त्याचं दु:ख अहिल्याबाईला फार झालं.

पेशव्यामध्यें दुही होऊं लागली. मराठ्यांना आपआपसांत लढण्याची पाळी आली. इ. स. १७९५ त खर्ड्याची लढाई झाली. तुकोजीरावानं त्यांत शौर्य गाजवलं व शेवटपर्यंत पेशव्यांची इमानानं सेवा केली. जय मिळाला म्हणून सर्वांचेच आनंदांत कांहीं दिवस गेले.

तुकोजीचा धाकटा भाऊ संताजी, अहिल्याबाईजवळ रहात होता. देवपूजा-जपजाप्य चालू होतं. अहिल्याबाईला बरं वाटत नव्हतं. ती मनानंहि खचली होती. तिचं म्हणण्यासारखं कोण राहिलं होतं? एकापाठीमागून एक दु:ख गिळून कर्तव्य बजावणाऱ्या अहिल्यादेवीचा श्रावण वद्य चतुर्दशीस, इ. स. १७९५ त ६ ऑगस्ट रोजीं वयाच्या सत्तराव्या वर्षीं महेश्वर येथें अंत झाला. मरतांना समाधानानं तिनं प्राण सोडला. संताजीनं अहिल्याबाईचा अखेरचा विधि केला.

अहिल्यादेवीची छत्री महेश्वराला बांधलेली आहे.

सर जॉन माल्कम या इंग्रज गृहस्थालाहि अहिल्याबाईची कारकीर्द फार नमुनेदार वाटली म्हणून तिची सर्व माहिती गोळा करून तिच्याबद्दल चांगलेच उद्गार त्यानं काढलेले आढळतात.

महादजी शिंदे बाईला वचकून असे. तिचं कुणाशींच वैर नव्हतं. पेशव्यांच्या दरबारांत तिला मानानं वागवीत. निजाम व टिपू सुलतान तिला आदरणीय मानीत व मुसलमानांनाहि ती देवतेप्रमाणें पूज्य वाटत होती. अशा रीतीनं सर्व जगालाच आदर्श वाटणाऱ्या अहिल्यादेवीचं चरित्र, आशू, मी तुझ्यापुढें ठेवलं आहे.

◆ ◆ ◆

## गोष्ट २ री

# हरियेल व सुतार पक्षी

आशू, नर्मदा नदीच्या कांठावर एक मोठं जुनं पिंपळाचं झाड होतं. तें दिसायला सुरेख होतं. नवीन हिरवींगार पानं आल्यावर तर त्याला मोठं ऐश्वर्य प्राप्त झाल्यासारखं वाटे नी म्हणूनच अनेक पक्षी त्यावर आपलीं घरटीं बनवून रहात. तेवढं जरी भाग्यांत नसलं तरी कांहीं पक्षी त्यावर सहल करण्यास तरी आल्याशिवाय रहात नसत.

एके काळीं व्यास मुनींचं त्याच झाडाखालीं रहाणं झालं होतं. चांगल्या संगतीनं चांगल्या विचारांचाच अंगीकार आजूबाजूच्या सजीव-निर्जीव प्राण्यांकडून होतं असावा असं दिसलं.

कित्येक वर्षांपूर्वींचं झाड तें! एका मोठ्या व्यक्तीची सेवा करण्यांत तें झाड आनंद मानीत होतं. त्या झाडाच्या दाट छायेखालीं ध्यानस्थ बसल्यावर नदीच्या प्रवाहाला चाटून येणारी थंडगार वाऱ्याची झुळूक लागतांच मुनींचं मन प्रसन्न झाल्याशिवाय राहिलं असेल काय? कुणाच्या गांवींहि त्या झाडाची कामगिरी नसेल!

आपल्याला विसरून जाऊन आपल्याशीं संबंध येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, पशूला अगर पक्ष्याला आनंद देण्यांत, त्यांच्या उपयोगीं पडण्यांत व त्यांना आश्रय देण्यांत त्या झाडाचा जन्म गेला होता. त्या मुनींच्या सहवासाचा तर तो परिणाम नसेल!

त्या पिंपळाच्या झाडावर पोपट, पारवे व प्रवासी पक्षी असे अनेक पक्षी बसत, कूजन करीत, कावकाव करीत, किलबिल करीत व टोंक्–टोंक् करीत.

आशू, एकदा कीं नाहीं, एक हरियेल व सुतार पक्षी त्या झाडाच्या डहाळीवर बसले होते.

“ नमस्ते ! आज ब-याच दिवसांनीं दिसलास ! कुठं गेला होतास ? ” सुतार पक्षी म्हणाला.

“ अलीकडे मी दुसऱ्याच एका झाडावर रहात होतों,” हरियेल बोलला. “ या झाडाचीं पानें उन्हाळ्यांत गळून जातात म्हणून त्या दिवसांत मी दुसरीकडे रहाण्यास जात असतों. जिथं हिरवीं पानं दिसतात तिथं मी बसतों. यासाठींच मी कधीं जमिनीवर पायहि ठेवीत नाहीं, नी कधीं उतरलोंच तर एखादी झाडाची काडी पायांत अडकवून उतरतों. ”

“ किती अभागी तूं ! अशामुळं तुला ‘ तुझं ’ झाड म्हणून दाखवायला एकहि झाड रहात नसेल. मग त्याबद्दल तुला प्रेम तरी कुठून उत्पन्न होणार ! नी आपलेपणा अगर स्वाभिमान तरी कुठून येणार ! मी बघ, या झाडाच्या ढोलींत घरटं बांधून, उन्हाळा असो वा पावसाळा असो, बाराहि महिने येथेंच राहतों. मला हें झाड फार प्रिय आहे नी म्हणूनच कोणत्याहि परिस्थितींत मी त्याला सोडत नाहीं. ”

“ पण तुला हें येवढं कां आवडतं ? जेथें सुख मिळतं नी सोय होते तेथें जाऊन आनंद मिळवला म्हणजे झालं ! ” हरियेलनं म्हटलं.

“ त्यामुळेंच तूं असा अविचारी राहिलास. स्वाभिमान कशाशीं खातात तेंहि तुला माहीत नाहीं. अगदीं कोरडा रे कोरडा ! मला या झाडासारखा दुसऱ्यांना आनंद देण्याचा धडा शिकायचा आहे.

**मादाम क्यूरी**

तें सुख, स्वत:ला आनंद मिळवीत असतां होणाऱ्या सुखापेक्षा अनंतपटीनं अधिक आहे."

"तें कसं?" हरियेलनं विचारलं.

"कसा रे तूं अगदीं खुळा राहिलास? अरे, हें झाड चांगलं हिरवं-गार झालं म्हणजे शेंकडों पक्षी त्यावर वसून आनंदांत नाचत असतात नी उन्हाळ्यांत त्याला सोडून गेल्यावर त्याला किती दु:ख होईल, याचा कुणी विचार केला आहे का? त्याची थोरवी याच्यांतच आहे कीं वेइमान झालेल्या जीवांनाही पुन्हां तो तितकाच आनंद वसंतऋतूंत देतो. किती क्षमाशील आहे तें! मी मात्र याच्याशीं इमानानं वागतों म्हणून तें मला पोटाशीं धरून उन्हाळ्यांतही थंडावा देतें. आंत ढोलींत राहिलं म्हणजे प्रेमाचा जास्त ओलावा मिळतो. अशा स्थितींत त्याला सोडून गेलों नाहीं म्हणून पुन्हां पालवी फुटल्यावरचा आनंद आम्ही वांटून घेतों; नी मग पहा त्या आनंदाचं स्वरूप किती सुखदायक असतं तें!"

"खरंच आहे रे! मी कितीहि हिरवळींत राहिलों तरी पूर्ण समाधान मिळाल्यासारखं मला कधींच वाटत नाहीं. आज माझे डोळे उघडले. तुझे किती आभार मानूं?" असं म्हणून तो हरियेल पक्षी 'फर् र् र्' असा पंखांचा आवाज करीत उडून गेला.

× × ×

## मादाम क्यूरी

अग आशू, हें पहा किती सुंदर फूल मी तुझ्यासाठीं आणलं आहे! सर्व फुलांना भूषण असणारं हें कमलाचं फूल घे. देवालाहि अत्यंत प्रिय वाटणारं हें फूल आहे. सर्व चरित्रांत उत्तम असलेलं

कमळ—



कमळाच्या फुलांतले आकर्षक गुण मादाम क्युरीच्या चरित्रांत सांपडतील.

हें मादाम क्यूरीचं चरित्र तुला सांगायचा मीं विचार केला आहे. कमळाच्या फुलांतले आकर्षक गुण तुला या चरित्रांत सांपडतील. ही बाई फ्रान्स देशांत रहात होती व म्हणून कांहीं नांवं फ्रेंच लोक उच्चारतात त्याप्रमाणंच मी तशींच देत आहें. लग्न झालेल्या मुलीच्या नांवाच्या पाठीमागं जसं आपण सौभाग्यवती हा शब्द लावतों तसंच फ्रेंच लोक 'मादाम' हा शब्द लावतात व कुमारिकांना 'मॅडमॉइझेल' नी पुरुषांना 'मॉसिअर' लावतात.

रविवारचा सुट्टीचा दिवस होता. वॉरसॉमधील एका मुलांच्या शाळेच्या आवारांत, सायन्सचे प्रोफेसर मॉसिअर स्क्लॉडावस्की आपल्या बायको-मुलांना घेऊन एका बंगल्यांत रहात असत. तळ-मजल्याच्या एका खोलींत चार मुलं खेळत होतीं. 'ख्रिस्मसला,' त्यांना नवे खेळ मिळाले होते. तीं सर्व मुलं लुटुपुटीची लढाई खेळत होतीं. पांच ते नऊ वर्षांचीं मुलं होतीं. जोसेफ, ब्रोन्या, हेला नी छोटी मन्या, आपआपली युद्धांतील कामगिरी बजावण्यांत रमून गेलीं होतीं. मन्याचं काम ब्रोन्याला ठोकळे आणून देण्याचं होतं.

'मन्या, मन्या!' सर्वांत वडील बहीण झोशिया हांक मारूं लागली. "झालं तरी काय तुला? आई म्हणते तूं आतां पुष्कळ खेळलीस. चल आतां."

"पण मी ब्रोन्याला मदत करीत आहें." आपल्या झग्यांत गोळा केलेले सर्व ठोकळे जमिनीवर सोडत मन्या म्हणाली आणि मुकाटयानं झोशियाचं बोट पकडून तिच्याबरोबर ती गेली.

"मन्या! मन्यूस्या! मारी! मान्या!" आईच्या लाडक्या हांका मन्याच्या कानावर आल्या.

अशक्त व बारीक झालेल्या हातांनीं आईनं मन्याच्या झग्याच्या सुटलेल्या रिबिनी बांधून तिच्या केसांवरून हात फिरविला आणि " माझी मन्या ती ! किती तुझे केस विसकटले नी किती लाल झाली आहेस !" असं म्हणत आईनं मन्याचे कुरळे केस सारखे केले.

मन्याचं आपल्या आईवर फार प्रेम होतं. सबंध जगांत आपल्या आईसारखी सुंदर, चांगली व शहाणी बाई सांपडणार नाहीं, अशी मन्याची प्रांजल समजूत होती. आईहून कोणीहि थोर नाहीं हें तिचं ठाम मत होतं.

मन्याची आई आपल्या आईवडिलांची सर्वांत मोठी मुलगी होती. ती अत्यंत समजूतदार व हुशार बाई होती. वॉरसॉमधील एका नामांकित शाळेंत तिचं शिक्षण झालं होतं. पुढं ती प्रोफेसर झाली. तिचं लग्न इ. स. १८६० त प्रोफेसर स्क्लॉडावस्कीबरोबर झालं. तीं दोघं पोलंडमध्यें रहात.

प्रोफेसरसाहेब त्यांच्या घराण्यांतील पहिले प्रोफेसर होत. ते गणित व विज्ञान हे दोन विषय मुलांना शाळेंत शिकवीत.

लग्न झाल्यावरहि मन्याची आई मुलींच्या शाळेवर हेड मिस्ट्रेसचं काम करीत असे. तिला चार मुली व एक मुलगा झाला. तिच्या सर्वांत धाकट्या मुलीचा—मारीचा—लाडक्या मन्याचा जन्म— इ. स. १८६७ मध्यें नोव्हेंबरच्या सात तारखेला झाला. तोंपर्यंत तिनं शाळेचं काम केलं.

× × ×

" मन्या, झोंप लागली का ? "

पाय पोटाशीं घेऊन, आपल्या आईच्या पायांना अधिक बिलगण्याचा प्रयत्न करणारी मारी म्हणाली, " नाहीं, आई, मी जागी आहें. "

तिची आई छोटया मन्याच्या केसांवरून हलक्या हातानं बोटं फिरवूं लागली व अत्यंत प्रेमळ दृष्टीनं मन्याकडे पाहूं लागली. मन्याला या दृष्टींतच सर्व गोडी भरल्यासारखी वाटे. मन्याला समजूं लागलं तसं आईनं कधीं तिचा पापा घेतल्याचं तिला आठवलं नाहीं. त्यामुळं मन्याला मात्र कांहीं तरी चुकल्यासारखं वाटे; नी म्हणूनच तिला, आईला बिलगण्यांत मात्र फार सुख होई व त्यामुळंच त्या स्थितींत आईच्या पायाला बिलगून ती पडली होती. आईचा प्रेमळ शब्द, आईचं गोड हास्य व फार तर आईची प्रेमळ दृष्टि येवढंच तिला मिळूं शके.

मन्या झाल्यापासून तिच्या आईला क्षयाची व्यथा जडली होती. अशा रोगाचा फैलाव श्वासोच्छ्वासांतून अगर रोगी माणसाच्या थुंकींतून होत असतो. यासाठींच आई नेहमीं काळजी घेई व म्हणून तिनं मुलांचा पापा घेण्याचं सोडलं होतं व मुलांनीं आपल्या जवळसुद्धां जास्त वेळ घालवूं नये, यासाठीं ती नेहमीं दक्षता बाळगी.

आपल्या दुःखापासून आपल्या मुलांना दुःख होऊं नये म्हणून आई नेहमीं वरून आनंदी राही. घरांत हिंडून थोडसं काम करून ती आपलं मन रमवून घेई. ती खोकूं लागली, कीं मन्याच्या वडिलांचं तोंड उतरून जाई. रात्रीं झोंपतांना रोज मुलं प्रार्थना करीत व त्या वेळीं " देवा, आमच्या आईला बरं कर " असं म्हणत.

आईला बिलगून राहिलेले छोटेसे गुलजार हात दूर करून आई कित्येकदा म्हणे, " मन्यूस्या, मला जाऊं दे, काम आहे मला."

" मग मी इथं राहूं का ? मी वाचीत इथंच बसतें. "

" मला वाटतं त्यापेक्षां तूं बाहेर बागेंत जा. किती सुंदर हवा पडली आहे आज. " असं मन्याला सांगतांना आईच्या मनांत निराशा उत्पन्न झाल्याशिवाय रहात नसे, पण ती आपल्या भावना दाबून ठेवीत असे.

मन्या चार वर्षांचीच होती. ब्रोन्या त्या वेळीं शाळेंतून आली कीं मन्याबरोबर " शाळा शाळा " खेळे. खेळत खेळतच तिला अक्षरओळख झाली.

एकदा आई-वडिलांच्या समोर ब्रोन्याचं वाचन चाललं होतं. मधेंच ती अडखळली. मन्यानं तें पुस्तक घेतलं व थोरल्या वहि-णीला कठीण वाटणारे शब्द, त्या चार वर्षांच्या मन्यानं अगदीं सहज वाचून दाखवले. आई-वडिलांना फार आश्चर्य वाटलं. तीं दोघं गप्प बसलीं. ब्रोन्याला वाटलं, आतां वडील आपल्यावर रागावणार, या भीतीनं तीहि स्तब्ध उभी राहिली. हें सर्व पाहून मन्या गांगरून गेली व ती रडतच म्हणाली, " मला क्षमा करा. मीं मुद्दाम केलं नाहीं..... ...माझी चूक नाहीं.........ब्रोन्याचीहि चुकी नाहीं.........पण तें इतकं सोपं होतं."

आपल्याला वाचतां येऊं लागलं म्हणून आई व बाबा आपल्याला क्षमा करणं शक्य नाहीं, असं त्या वेळीं त्या भोळ्या मनाला वाटलं.

तेव्हांपासून मन्याची आई, तिच्या हातीं पुस्तक लवकर पडूं नये म्हणून काळजी घेई. तसं कधीं तिला आढळून आलंच तर "मन्या, तुझ्या ठोकळ्यांबरोबर खेळ जा बघूं ! बाहुल्या घेऊन खेळ नाहीं तर ! एखादं गाणं म्हण अगर बागेंत जा " असंच नेहमीं तिला सांगे.

सर्वांत वडील बहीण झोशिया मन्याला आईप्रमाणं संभाळी. तिला गोष्टी छान येत होत्या. मन्याला तिच्या गोष्टी ऐकायला फारच आवडत असे.

## पोलंड

इ. स. १८७२ हें वर्ष पोलंडमधील लोकांना फार वाईट गेलं. युद्धानंतर पोलंडचे तीन भाग पडले. एक भाग जर्मनीकडे, दुसरा ऑस्ट्रियाकडे व तिसरा रशियाकडे गेला होता. तेथील लोकांवर बरेच निर्बंध घालण्यांत आले होते. त्यांनीं काय बोलावं नी काय लिहावं त्यावर नियंत्रण घातलं गेलं होतं. पोलंडमधील लोकांवर पोलिसांची देखरेख असे. शिवाय शाळांमधूनाहि पोलिश भाषा शिकवली जात नसे. या जुलमाला स्वाभिमानी विद्वान् आणि शास्त्रज्ञ कंटाळून गेले. त्यांनीं जर या जुलमाच्या विरुद्ध आपले विचार मांडले तर त्यांना कैदेंत डांबावं लागे व त्यांची मालमत्ता सरकार घेऊन टाकी. अशा कैदी लोकांना सैबेरियाच्या बर्फावरून अनवाणी चालत जाण्याची कडक शिक्षा दिली जाई. रशियन राजाकडून पोलिश लोकांचा देशाभिमान तुडवून–चेंगरून टाकण्याचा प्रयत्न पोलंडमध्यें जोरानं सुरू झाला होता.

× × ×

मन्या झाल्यावर तिची आई मुलांचे जोडे स्वतः जोडून–शिवून तयार करी व आपला वेळ घरांतच घालवी. त्या घरांत अभ्यास करण्याची एक स्वतंत्र खोली असे. मध्यावर एक मोठं टेबल ठेवलेलं असे नी त्याभोंवतीं खुर्च्या मांडलेल्या असत. त्यांच्यावर बसून मुलं

अभ्यास करीत. मन्याचं मन तिथं रमे. तिचं मन वेधण्यासारखीं कांहीं चित्रंहि भिंतीवर टांगलेलीं होतीं खरी, पण क्वचितच त्यांच्याकडे तिचं लक्ष जाई. सर्वांत तिला तेथलं घड्याळ व उष्णता दाखविणारं यंत्र आवडे. तिथं तिच्या वडिलांना सायन्स शिकविण्यास लागणारीं उपकरणं ठेवलेलं एक काचेचं कपाट होतं. तिथंच तिचं मन कांहींतरी शोधत आहे, असं कित्येकदा वाटे. कारण आपल्या लहान टांचा उंचावून तेथल्या साहित्याकडे मन लावून पहात असतांना ती दिसे. एकदा तिनं वडिलांना विचारलंहि, "हें काय आहे ?"

"फिजिक्स्. ॲपॅरेटस्" वडील म्हणाले. मोठं चमत्कारिक नांव वाटलं तिला. चालीवर ते शब्द गुणगुणतच ती बराच वेळ राहिली. याच उपकरणांशीं मन्याची गांठ पडायची होती.

× × ×

## विद्यार्थिदशा

( मॅडमॉइझेल सिकॉर्स्कीची खासगी शाळा. )

"मारिया स्क्लॉडावस्की."

"हजर !"

"ऑगस्टस्‌ची माहिती सांग." बाई म्हणाल्या.

"इ. स. १७६४ त ऑगस्टस् पोलंडचा राजा झाला तो हुशार होता व त्याचे विचारहि सुधारलेले होते. विद्वान् व कलावान् लोकांचा तो मित्र होता. आपल्या राज्याची भरभराट व्हावी म्हणून त्यानं बराच प्रयत्न केला. पण दुर्दैवानं तो धाडसी नव्हता."

मारियानं मोठ्या धीटपणानं उत्तर दिलं. पांढरी कॉलर असलेला, निळ्या रंगाचा झगा घातलेली दहा वर्षांची मारी–मन्या होती ती! नेहमीं हवेंत उडणारे तिचे कुरळे केस आज कुठल्या कुठं लपून गेले होते. केस अगदीं घट्ट बांधून टाकले होते. त्या वेळीं कुरळे केस हवेंत उडवत ठेवणं म्हणजे त्या शाळेच्या शिस्तीला धरून नव्हतं. दुसऱ्या सर्व मुलींसारखी ती एक साधी मुलगी दिसत होती.

मारीला, तुपासिया बाई इतिहास व गणित शिकवत असे. ती मोठी निग्रही व कडक बाई होती. ती मारीचं कौतुक करी. कारण ती वर्गांतील इतर मुलींच्यापेक्षां दोन वर्षांनीं लहान असूनहि, जर्मन, फ्रेंच इत्यादि भाषा विषयांत व इतिहासांत तिचा पहिला नंबर असे. मारीचे रशियन उच्चार, ती परकी भाषा असूनहि, चांगले होते.

चाणाक्ष मारीचं उत्तर ऐकून वर्गांत शांतता पसरली गेली. तें उत्तरच तसं मन हलवून सोडणारं होतं. त्या चिमुकल्या डोळ्यांत स्वाभिमानाची चमक दिसूं लागली. त्या पोलिश मुलांच्या भावना दाबल्या जात होत्या.

तास सुटल्याची घंटा झाली. पुस्तकं गोळा करण्यांत आलीं. ‘ डेस्कं ’ उघडलीं गेलीं––तीं झांकली गेलीं––खुर्च्यांचा आवाज झाला व वर्गांतून बाई गेल्या.

दहा मिनिटांच्या सुट्टीनंतर पुन्हां घंटा झाली मुलींचा शिवणाचा तास होता. त्या शिवण उघडून बटनं लावीत होत्या व बाई तुपासिया गोष्टीच्या पुस्तकांतून मुलींना गोष्टी वाचून दाखवीत होत्या. रशियन इन्स्पेक्टरसाहेबाला घेऊन मोठ्या सिकोर्स्का बाई वर्गांत आल्या. मुली उभ्या राहिल्या. इन्स्पेक्टरसाहेब खुर्चीवर

बसल्यावर मुलींनीं आपलं शिवण गुंडाळून ठेवून त्या बसल्या व प्रश्नांचीं उत्तर देण्यास घाबरत घाबरतच तयार झाल्या.

"एखाद्या मुलीला इकडे बोलवा" असं इन्स्पेक्टरसाहेब तुपासिया बाईला म्हणाले.

तिसऱ्या रांगेंत मारी बसली होती. खिडकीच्या बाहेर बघत मारी मनांत म्हणाली, "देवा, दुसऱ्या कुणावर तरी पाळी येऊं दे. माझ्यावर नको.........नको आहे मला !"

ती मनांत जाणून होती कीं, नेहमींच्या रिवाजाला अनुसरून बाई आपलंच नांव घेतील. तिचं सर्वसाधारण ज्ञान इतरांपेक्षां जास्त होतं व तिला रशियन भाषा चांगली येत असे. बाईनं मारीचंच नांव घेतलं व मारी घाबरत घाबरत इन्स्पेक्टरसाहेबापुढं येऊन उभी राहिली.

"तुझी प्रार्थना म्हण" साहेब म्हणाले.

पोलिश मुलांकडून मुद्दाम आपली प्रार्थना रशियन भाषेंत म्हणून घेण्याचा त्या वेळच्या सरकारचा कटाक्ष असे. मारीला हें अपमानास्पद वाटलं, पण करणार काय ? तिनं पोपटासारखे ते शब्द म्हणून दाखविले.

"आपल्या पवित्र रशियामध्यें दुसऱ्या कॅथरीनपासून झारचीं—रशियन राजांचीं—नांवं सांग."

"दुसरी कॅथरीन. पहिला पॉल, पहिला अलेक्झांडर, पहिला निकोलस, दुसरा अलेक्झांडर" मारीनं उत्तर दिलं.

इन्स्पेक्टरसाहेबांचं समाधान झालं. मुलीचे रशियन उच्चार ऐकून व तिची स्मरणशक्ति चांगली आहे हें पाहून त्याला अचंबा वाटला.

" राजघराण्यांतील प्रत्येक व्यक्तीचीं, त्यांच्या पदव्यांसह नांवं सांग " हा साहेबांचा दुसरा प्रश्न होता.

मानी मारी आपल्या भावना छपवीत होती. तिच्या आविर्भावांत फरक होत होता. तरीसुद्धां तिनं सर्वांचीं नांवं व पदव्या भराभर सांगितल्या.

" आपल्यावर कुणाची सत्ता आहे ? " हा साहेबांचा तिसरा प्रश्न होता.

दोन्ही बाईंनाहि हा प्रश्न ऐकून फार अवघड वाटलं. स्वदेशाभिमानी जीवांचा कोंडमारा होत होता नी म्हणूनच आशू, मारीच्या तोंडून लवकर शब्द बाहेर पडले नाहींत.

" आपला राजा कोण आहे ? " असं दरडावीतच साहेबानं विचारलं

" राजा दुसरा अलेक्झांडर, सर्व रशियाचा झार. " हें उत्तर देतांना मारीला वेदना होत होत्या असं दिसलं. तिचा चेहरा पडला.

त्या वर्गाची चांचणी संपली व साहेब मोठ्या बाईबरोबर दुसऱ्या वर्गांत गेले.

बाई तुपासियानं मान वर केली व ती म्हणाली, " मारिया, इकडे ये. "

मारी बाईच्याजवळ गेली. तिला जवळ घेऊन बाईनं कांहीं न बोलतां मारियाच्या कपाळाचा पापा घेतला तोंच त्या स्वाभिमानी पोलिश मुलीला रडूं कोसळलं.

आशू, त्या सुतारपक्ष्याप्रमाणंच पडत्या काळांतहि आपल्या देशावर प्रेम करणारी मारी शहाणी व कृतज्ञ होती.

× × ×

... ग्रंथालय, ठाणे. स्थलप्रत.
अ. क्र. 23605 दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

" आज आमच्या शाळेंत इन्स्पेक्टर आले होते. त्यांनीं मन्याला कांहीं प्रश्न विचारले. मन्यानं कीं नाहीं सर्व प्रश्नांचीं फार छान उत्तरं दिलीं पण मग ती रडली " असं हेलानं आपल्या आत्याला सांगितलं. हेलाला यांत कांहीं विशेष वाटलं नाहीं, परंतु आत्याचं बोट धरून चालणारी मन्या अद्याप कांहींतरी विचारांत होती. इन्स्पेक्टरचं आगमन व स्क्लॉडावस्की कुटुंबावर येणारीं संकटं, यांचा कांहींतरी जवळचा संबंध आहे अशी अटकळ, गेल्या चार वर्षांच्या अनुभवानं मन्यानं बांधली होती. कुटुंबावर एकापाठी-मागून एक संकटं येत गेलीं.

आईचा आजार वाढत होता. वडिलांचा पगार कमी करण्यांत आला व त्याला शाळेच्या आवारांतील बंगला सोडून जावं लागलं. त्यांना पैसे पुरेनात, म्हणून घरांतच आठदहा विद्यार्थी ठेवून उत्पन्नांत भर टाकावी लागली. वडिलांना शिकवण्या कराव्या लागल्या. घर हें ' घर ' आहे असं वाटेना. वडिलांच्याजवळ जी शिल्लक होती, ती मेहुण्याला धंद्यासाठीं दिली असतां, तेहि पैसे तो गमावून बसला. इ. स. १८७६ च्या जानेवारींत झोशिया व ब्रोन्या यांना ' टायफॉईड ' झाला. त्यांतच मन्याला, आईप्रमाणं संभाळणारी झोशिया वारली.

मन्यावर हा पहिलाच प्रसंग होता. ब्रोन्या उशींत डोकं खुपसून रडूं लागली. अशक्त झालेली आई या खिडकींतून त्या खिडकींत जाऊन, खोलींतल्या खोलींतच चुळबुळ करून मोठया जड अंतः-करणानं, झोशियाला नेणाऱ्या पेटीचा निरोप घेत होती.

या संकटांचा परिणाम मन्यावर फार चमत्कारिक झाला.

मारीची प्रकृति निकोप व्हावी म्हणून तिची आत्या हेलाला व मारीला नेहमीं शुद्ध हवेंत फिरण्यास घेऊन जाई. ती लहानपणीं आईच्या बरोबर ज्या चर्चमध्यें प्रार्थनेस येई त्याच चर्चमध्यें एकदा ती आत्याबरोबर गेली होती. गुडघे टेकून, डोळे झांकून मारी प्रार्थना करूं लागली. तिचे हात कांपत होते. आज आपली आई चर्चमध्यें येऊं शकत नाहीं व झोशियाहि नाहीं हें आठवून मन्या गहिंवरली. देवाला तिची कींव कशी आली नाहीं असं तिला वाटलं. ती आपल्या सर्व भावना एकत्र करून म्हणाली, " देवा, मला हवं तर घेऊन जा, पण माझं जिच्यावर अत्यंत प्रेम आहे अशा माझ्या आवडत्या आईला आयुष्य व आरोग्य दे. "

प्रार्थना झा यावर आत्याबरोबर ती घरीं गेली.

× × ×

आपल्या प्रार्थनेचा कांहीं उपयोग होईल असं आतां मारीला वाटेनासं झालं. एके काळीं सुंदर दिसणारी आपली आई आतां खंगत चालली हें तिला दिसून आलं.

इ. स. १८७८ च्या ९ मे या दिवशीं तिनं डॉक्टरना बोलावून घेतलं व त्यांना तिनं आपली काळजी व्यक्त केली. " माझी छोटी मन्युस्या तर दहाच वर्षांची आहे. ....... " तिच्याजवळ त्या वेळीं प्रोफेसरसाहेब व सर्व मुलं बसलीं होतीं. प्रत्येकाशीं ती कांहींतरी बोलली. शेवटीं प्रत्येकाकडे तिनं पाहिलं. जणूं कांहीं ती हें सांगत होती, " तुम्हांला सर्वांना सोडून मला जावं लागत आहे. मला क्षमा करा." शेवटीं ती मोठ्यानं येवढंच म्हणाली, " माझं तुमच्यावर प्रेम आहे. " नी मग तिला शांतपणें मरण आलं.

त्यांनंतर मारी चर्चमध्यें गेली असतां तिचं मन बंड करी. " आईला व बहिणीला नेणारा देव निष्ठुर आहे. त्यानं आपला आनंद लुटून नेला " अशी मारीची प्रांजल समजूत होऊं लागली.

× × ×

## हायस्कूलमध्यें असतांना

आशू, राहिलेल्या या चार मुलांना आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर व आपले श्रम खर्च करून प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यायचं होतं. क्षयी आईचीं हीं चार मुलं होतीं खरी, परंतु प्रत्येक रक्ताचा थेंब, चांगल्या कामीं लावून त्या मुलांना पुढं असामान्य लोकांत स्थान पटकावयाचं होतं.

प्रोफेसरसाहेबांच्या मुली मोठ्या होऊं लागल्या, तशा दिसण्यांतहि चांगल्या दिसूं लागल्या. त्या वेळीं मारी "सरकारी शाळेंत" शिकत होती. त्या शाळेच्या शेवटल्या परीक्षेंत ब्रोन्याला सुवर्ण-पदक मिळून तिला पूर्ण यश मिळालं होतं. पण तिला पुढचं शिक्षण घेतां आलं नाहीं, कारण तिला यापुढं घरची व्यवस्था पहावी लागली.

जोसेफचंहि शाळेचं शिक्षण पूर्ण होऊन त्यालाहि सुवर्णपदक मिळालं. त्याला डॉक्टरचं शिक्षण घ्यायचं होतं. त्याच्या कॉलेजच्या गमती ऐकून मुलींना त्याचा हेवा वाटूं लागला.

एकदा, सकाळची न्याहारी झाल्यावर शाळेची वेळ झाली म्हणून मारी व हेला स्वयंपाकघरांत गेल्या. पाव, लोणी, एक सफरचंद व मटनाचे तयार केलेले दोन गोळे घेऊन त्यांनीं ते

आपल्या कापडाच्या पिशवींत घातले. ती पिशवी खांद्यावर टाकून व हातांत शाळेचीं पुस्तकं घेऊन त्या शाळेंत गेल्या. सकाळीं साडेआठ वाजतां त्यांनीं घर सोडलं. ती वेळ म्हणजे सर्वांचीच गडबडीची होती. कुणी शाळेंत तर कुणी कॉलेजमध्यें जात होते. घरींहि शाळेचंच वातावरण सदैव मारीला लाभलं नी म्हणूनच मारी, जग ही शाळाच आहे व त्यांत शिक्षक नी विद्यार्थी भरलेले आहेत, या समजुतीवर वाढूं लागली. शिक्षण घेणं हें एकच ध्येय तिच्यापुढं होतं.

मारी लगबगीनं शाळेंत चालली. "मन्युस्या धावूं नकोस. काझिया येतेच आहे" काझियाची आई ओरडून सांगत होती.

"सुप्रभात मां" मारी म्हणाली.

आपल्या मुलीच्या जिवलग मैत्रिणीकडे पहात काझियाची आई म्हणाली, "आज शाळा सुटल्यावर चहाला इकडेच ये. तुला आवडणारे 'चॉकोलेट' मी करून ठेवीन."

"अगदीं आलंच पाहिजे" काझिया भराभर जिना उतरत म्हणाली. "मारी, आपल्याला उशीर झाला. लवकर चल."

मारीला आई नसल्यामुळं काझियाची आई तिच्याशीं प्रेमानें वागे. त्या वेळीं मारीचं वय चौदा वर्षांचं होतं.

एकदा झार दुसरा अलेक्झांडर एकाएकी वारला म्हणून शाळेला सुट्टी पडली. काझिया व मारी हातांत हात मिळवून वर्गांत नाचूं लागल्या. एका रशियन बाईनं तें पाहिलं. आधींच बाईचा मारीच्या कुरळ्या केसांवर कटाक्ष असे. तिची ती करडी नजर पडतांच नाचणं बंद पडलं. मारीला स्वाभाविकच पोलिश शिक्षक आवडत.

एके दिवशीं ' कुनिक्का ' नांवाची मुलगी वर्गांत रडत असतांना मारीला व काझियाला दिसली. अद्याप घंटा झाली नव्हती. "कुनिक्का, काय झालं तुला ?"

कुनिक्का डेस्कवर डोकं ठेवून रडतच स्फुंदत स्फुंदत बोलत होती— " माझा भाऊ ······ तो एका कटांत सांपडला ······ गेले तीन दिवस त्याचा पत्ता नव्हता ······ उद्यां त्याला फांशीं देणार आहेत, " असं म्हणून कुनिक्का जास्तच रडूं लागली.

कुनिक्काचं सांत्वन कसं करावं हेंच त्या दोघींना समजेना. इतक्यांत वर्गातील बाईचा आवाज कानीं पडला, "चला वघूं वर्गात !"

भूगोलाचा तास होता तो, पण मारीच्या डोळ्यापुढं तो मुलगा — फांशीची जागा — दोर — फांशीला चढविणारे लोक, अशा अनेक गोष्टी तिच्या डोळ्यासमोरून सरकल्या.

त्या रात्रीं हेला, ब्रोन्या, काझिया व मारी, कुनिक्काच्या घरीं जाऊन, कुनिक्काबरोबर बसून त्यांनीं रात्रभर तिला सोबत केली मधून मधून अश्रु ढाळीत, तिच्या दुःखाच्या वांटेकरी त्या झाल्या ! सकाळ झाली व ज्या वेळीं तो फांशीं जाणार होता त्या वेळीं कुनिक्काबरोबर गुडघे टेकून भयभीत आविर्भावानें सर्वांनीं प्रार्थना केली.

× × ×

मारीचं हायस्कूलचं शिक्षण पूर्ण झालं. एक – दोन – तीन सुवर्णपदकं मारीला मिळालीं. नोकरीला लागण्यापूर्वीं एक वर्ष तिनं विश्रांति घेतली. फावल्या वेळीं तिनं सायन्सचीं पुस्तकं चोरून वाचलीं.

मारीला आपले वडील व वडील बहीण ब्रोन्या आदर्श वाटत असत. आपल्या वडिलांना सर्व तऱ्हेचं ज्ञान आहे या दृष्टीनं ती त्यांच्याकडे पाही.

दर शनिवारीं संध्याकाळीं एकत्र बसून प्रोफेसरसाहेब मुलांना कांहीं महत्त्वाचा भाग वाचून दाखवीत. त्यांच्याकडून चांगल्या कविता पाठ करून घेत. स्वतंत्र विचार करण्यास लावणाऱ्या या वातावरणांत आपल्या वडिलांनीं ठेवल्याबद्दल ती वारंवार कृतज्ञता व्यक्त करी.

कधीं कधीं निराश होऊन प्रोफेसरसाहेब मुलांना म्हणत, "मी कसे ते पैसे गमावून बसलों? तुम्हांला उत्तमांतलं उत्तम शिक्षण मला द्यायचं होतं. तुम्हांला परदेशीं पाठवून प्रवास करण्याची संधि आणून द्यायची होती. माझ्या सर्व इच्छा हवेंत विरून गेल्या. माझ्याजवळ आतां पैसे नाहींत नी म्हणून तुम्हांला मदत करतां येत नाहीं. थोड्या दिवसांनीं मलाच तुमच्यावर अवलंबून रहावं लागेल. तुमचं मग कसं होणार ?" उसासा टाकून प्रोफेसरसाहेब आपल्या मुलांकडे पाहूं लागले.

जवळच असलेल्या दिव्याच्या खालीं बसून एका वनस्पतीचं निरीक्षण चाललं होतं. निग्रही वृत्तीचीं चार तल्लख डोकीं एकत्र आलीं होतीं. चेहऱ्यावर हास्य आणून तीं चौघं बापाकडे पाहूं लागलीं. त्यांच्या डोळ्यांतील चमक हेंच सुचवीत होती, "आम्हीं तरुण आहों, निश्चयी आहों आम्हांला यश मिळेल. काळजी करूं नका."

मारी सतरा वर्षांची असतानाच बापाला मदत म्हणून गणित व फ्रेंच विषयांच्या शिकवण्या करूं लागली. बापाप्रमाणें ती धर्माच्या

बाबतींत स्वतंत्र विचार करी. तसंच आपल्या देशाची भरभराट होऊन तो पुढं यावा यासाठीं आपण काय केलं पाहिजे याचा ती विचार करी. गरीब लोकांत शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे असं वाटून, ती एका न्हाव्याच्या दुकानांतील अशिक्षित लोकांना फावल्या वेळांत शिकवण्यास जाई. मारी आतां गणिताचे अगर सायन्सचे प्रश्न न सोडवतां सामाजिक सुधारणेचे प्रश्न सोडवूं लागली. तिला आपल्या देशाची सेवा करायची आवड उत्पन्न झाली. ती अनेक सभांना हजर राहूं लागली. मारीची वडील वहीण ब्रोन्याही मारी प्रमाणंच आपलं ध्येय आंखूं लागली.

सर्वांत लहान असणाऱ्या मारीला कुटुंबाला स्वास्थ्य लाभावं व आपल्या भावंडांच्या आयुष्याला योग्य वळण लागावं त्याची जबाबदारी वाटूं लागली. स्वत:चं ध्येय बाजूंस सारून ब्रोन्यानं कुटुंबासाठीं मोठा स्वार्थ त्याग केला व तिनं आपल्याला आईप्रमाणं संभाळलं या उपकाराच्या जाणीवेनं मारी दबून गेली होती.

एकदां ब्रोन्या पैसे मोजत होती.

" ब्रोन्या, माझ्या मनांत एक कल्पना आली आहे नी मी ती बाबांनाही सांगितली. "

" कोणती ग ? " ब्रोन्यानं उत्सुकतेनं विचारलं.

मारीजवळ आली नी पाहूं लागली. " पाहूं या तुझ्याजवळ शिल्लक असलेल्या पैशांनीं तुला किती महिने पॅरिसमध्यें काढतां येतील ? "

" माझ्या जाण्याचा प्रवास खर्च व तेथें राहण्यास एक वर्ष पुरतील येंवढेच पैसे आहेत. पण तुला माहीतच आहे कीं अभ्यास पूर्ण होण्यास पांच वर्ष लागतात.

" पण ब्रोन्या, अशा शिकवण्या करून आपल्याला हवी तेवढी शिल्लक जमणं कधींही शक्य होणार नाहीं. "

" मग तूं काय सुचवतेस ? "

" आपण प्रत्येकजण वेगळे जमवून पॅरीसला जाऊं म्हटलं तर तें कधींहि जमणार नाहीं. एकमेकांच्या मदतीनं शिक्षण पुरं करूं म्हटलं तरच तें होण्यासारखं आहे. या योजनेनं तुला या उन्हाळ्यात निघतां येईल. " ब्रोन्याकडून एकदम कांहीं उत्तर न निघाल्यामुळं मारी पुन्हा स्पष्ट करूं लागली. " हें पहा, तुझ्या जमविलेल्या पैशानं तुला सुरवात करतां येईल. नंतर तोंपर्यंत माझेहि कांहीं पैसे जमतील शिवाय बाबाहि पैशाची थोडी भर घालून तुझं शिक्षण पुरं होई-पर्यंत आम्ही तुला पैसे पाठवीत राहूं. तूं परत आल्यावर मला तूं मदत करशील. हो कीं नाहीं ? "

" पण आतांच्या तुझ्या मिळकतीवर तें कसं जमायचं ? "

" नी म्हणूनच एखाद्या श्रीमंत कुटुंबांत ' गव्हर्नेस 'ची नोकरी मिळाल्यास ती करण्याचं मी ठरवलं आहे. " मारी म्हणाली.

ब्रोन्याचे डोळे कृतज्ञतेनें पाणावले. " मन्या ! माझी मन्युस्या ती ! " असं म्हणून ब्रोन्यानं मारीला घट्ट मिठी मारली. आशेच्या किरणांनीं ब्रोन्याच्या पुढच्या मार्गावर उजेड पडला नी तिला फार आनंद झाला.

" पण मारी, तूं प्रथम जा. तूं माझ्याहून हुशार आहेस. तुला यश लवकर येईल. मीच कां आधीं जावं !" ब्रोन्यानं तोंड सुचविली.

" ब्रोन्या, नाहीं. तूंच आधीं जा. तूं माझ्यापेक्षां वडील आहेस नी माझ्यापुढं तुझ्यापेक्षां जास्त आयुष्य आहे. बाबांनाहि तसंच वाटतं " मारी म्हणाली.

## गव्हर्नेस

ठरल्याप्रमाणं ब्रोन्या पॅरिसला गेला व मारी एका श्रीमंत वकिलाच्या घरीं त्याच्या मुलांना संभाळण्यास व शिकवण्यास इ. स. १८८५ त राहिली. तिच्या मनाप्रमाणं पगार मिळाला. मारी बहिणीच्या शिक्षणासाठीं पैसे जमवूं लागली. प्रोफेसरसाहेबांना पेन्शन झाली. तिला एका खेडयांत जाऊन रहावं लागलं. तिनं वडिलांना पत्र पाठवलं. —

प्रिय बाबा,

माझं आतां इथं सर्व बस्तान ठीक बसूं लागलं आहे. मला दोन मुलींना शिकवावं लागतं. त्यांपैकीं अठरा वर्षांची मोठी मुलगी ' ब्रोंका ' फार गोड स्वभावाची आहे. दुसऱ्या मुलीचं वय दहा आहे. ती जरा लाडांत वाढलेली असल्यामुळं तिला वळण लावण्याची जरुरी आहे. माझ्या या नवीन बाईचे तीन मुलगे वॉरसॉमध्यें शिकत आहेत. त्यापैकीं सर्वांत वडील मुलगा कॉलेज-मध्यें आहे. सर्वांत धाकटी मुलगी सहा महिन्यांची आहे.

येथील सर्व मंडळी माझ्याशीं प्रेमानं वागतात. त्यांतून मला ब्रोंका-सारखी मुलगी मिळाली म्हणून बरं वाटतं.

बाबा, माझी तुम्ही काळजी करूं नका. मी आनंदांत आहे. तुमच्या तब्येतीस जपत असावें. तुमच्या पत्राची मी वाट पहात आहें. माझा सप्रेम नमस्कार.

तुमची आवडती,
मारी.

मारीला घरांत येणाऱ्या पाहुण्यांचीहि व्यवस्था पहावी लागे. अशा श्रीमंत लोकांच्या गप्पा वेगळ्या स्वरूपाच्या असत. या भागांत नाचाला महत्त्व दिलेलं दिसे. शेजाऱ्यांच्या गोष्टी, रात्रीचा नाच व चहा-पार्टी हेच बोलण्याचे विषय या श्रीमंती घोळक्यांत निघत. मारीला हें सर्व नवं होतं.

सुट्टीच्या दिवशीं मारी फिरण्यास गेली असतां तिला खेडयांतलीं मुलं व कारखान्यांतील मजुरांचीं मुलं रस्त्यांत दिसत. तिच्या मनांत कल्पना येऊन गेली, "या मुलांना जमवून जर आपण त्यांना लिहावाचायला शिकवलं तर किती बरं होईल! त्यांना आपण आपली 'पोलिश' भाषा शिकवूं व पोलंड देशाचा इतिहास समजावून देऊं."

एकदां तिनं आपल्या मालकिणीला ही कल्पना सांगितली. मारीच्या फावल्या वेळीं तिनं हा उद्योग चालविल्यास कांहीं हरकत नाहीं असं तिनंहि सांगितलं. मारीची विद्यार्थिनी 'ब्रोंक्या'हिलाहि ही कल्पना अत्यंत आवडली व तिनं मारीला मदत करण्याचं ठरवलं.

मारीच्या खोलींत येण्यास पाठीमागचा जिना असल्यामुळें तिचे हे छोटे विद्यार्थी त्या जिन्यानं येत असल्यामुळें मारीच्या या नवीन योजनेचा त्रास मालकाला झाला नाहीं. रोज दोन तास मारी व ब्रोंक्या या मुलांना शिकवूं लागल्या. एकंदर दहा मुलं तेथें शिकत. त्यांना मारी स्वत: पुस्तकं आणून देई व स्वच्छ राहण्यास शिकवी.

येवढं करून रात्रीं मारी आपलं स्वत:चं वाचनही वाढवीत होती. तिला या आपल्या नवीन कामापासून अधिक आनंद मिळे.

आपल्याला कधीं तरी फ्रान्सला जाण्यास मिळेल व आपली इच्छा पूर्ण करून घेतां येईल या आशेवर मारीनं गणित व सायन्सचा अभ्यास सुरूं ठेवला होता.

मारी आतां वयांत आल्यानं चांगली दिसूं लागली होती. विशेषत: नाच करतांना ती आकर्षक वाटे. याच सुमारास वॉरसाहून ब्रोंकाचा सर्वांत मोठा भाऊ "कॅसिमीर,' सुट्टीसाठीं म्हणून घरीं आला होता. त्याची व मारीची नवी ओळख झाली. त्यांची मैत्री वाढली व कॅसिमीरनं मारीशीं लग्न करण्याचं ठरवलं.

ज्या वेळेस कॅसिमीरनं आपल्या आईवडिलांना आपला बेत कळवला, त्या वेळीं त्यांनीं आकाशपाताळ एक केलं! "दुसऱ्यांच्या घरीं राहून काम करणाऱ्या गरीब मुलीशीं आपल्या मुलानं लग्न करणं म्हणजे आपल्या श्रीमंतीला न शोभण्यासारखं आहे" असं त्यांचं म्हणणं होतं.

स्वाभिमानी मारीला याबद्दल मोठा अपमान वाटला व 'कॅसिमीर' नेभळ्या वृत्तीचा आहे असं तिला अनुभवानं दिसून आल्यावर त्या दिवसापासून या लग्नाच्या बाबतींतला विचार तिनं एकदम सोडून दिला. सर्व अपमान तिनं सहन केला व तसंच आपलं काम सुरूं ठेवलं. आपल्या वहिणीला व वडिलांना काळजींत टाकणं तिला गैर वाटलं. एवढा पगार दुसरीकडे मिळणं कठीण झालं असतं, हें जाणून होती ती! मधून मधून तिला निराशा उत्पन्न होई. "आपलं ध्येय आपल्याला कधीं तरी गांठतां येईल का?" असं तिला वाटे.

× × ×

मारीनं नोकरी तीन वर्षं केली. एकदां ब्रोन्याचं पत्र आलं. ब्रोन्या आतां काम करून पॅरिसमध्यें पैसे मिळवत होती. तिला परीक्षेंत यश आलं. आतां मारीनं यापुढं आपल्याला पैसे पाठवूं नयेत असं ब्रोन्यानं मारीला कळवलं होतं. शिवाय पॅरिसमध्यें राहणारा पोलिश डॉक्टर कॅसिमिर ल्डुस्कीशीं तिचं लग्न होणार होतं.

यामुळें मारीवरची बरीच जबाबदारी कमी झाली. म्हणून तिनं नोकरी सोडून वॉरसॉला वडिलांकडे जाण्याचं ठरवलं व तिथं तिला दुसरी नोकरी मिळाली.

इ. स. १८९० त ब्रोन्याचं मारीला पुन्हां पत्र आलं. त्यांत तिनं मारीला पॅरिसला येण्याविषयीं लिहिलं होतं. तिच्याकडे प्रवास-खर्चापुरते पैसे जमले असले तर तिनं तावडतोब निघावं असं त्या पत्रांत होतं. मारीच्या राहण्याची व जेवणाची सोय आपल्याच घरीं होईल असं ब्रोन्यानं सुचवलं होतं.

हें पत्र वाचून मारीला आनंद व्हायला हवा होता. पण हें पत्र तिला अशा वेळीं मिळालं कीं, त्या वेळेला मारीची पॅरिसला जाण्याची व आपल्या म्हाताऱ्या वडिलांना सोडून जाण्याची मनाची तयारी होईना. तिच मन त्या वेळीं खचलं होतं. पॅरिसला जाण्याची संधि मिळण्याएवढें आपण सुदैवी नाहीं असंच तिचं ठाम मत झालं होतं. ब्रोन्यानं आपल्यासाठीं कांहीं न करतां जोसेफच्या पुढील शिक्षणासाठीं पैशाची मदत करावी असं तिनं ब्रोन्याला कळवलं.

मारी वडिलांबरोबर वॉरसॉला राहूं लागली. तिनं पूर्वीप्रमाणं तेथील आयुष्य घालविण्यास सुरवात केली. ती ' लॅबोरेटरी 'त

जाऊन सायन्सचे प्रयोग करूं लागली व ती चोरून सायन्सचाहि अभ्यास करी. ती बापाच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यांत, हेलाला शाळेंत नोकरी मिळवून देण्यांत व भावाचं लग्न जुळवण्यांत गर्क झाली होती.

मारीची तब्येतहि बरी नव्हती. प्रोफेसर साहेबांना हें सर्व कळतांच त्यांनीं ब्रोन्याला पत्र पाठवलं, " या स्थितींत मी मारीला जाऊं देणार नाहीं. तिच्यासाठीं व माझ्यासाठीं वर्षभर पुरतील एवढे पैसे आपल्याकडे आहेत. आपण मारीला नोकरीहि करूं देणार नाहीं " असं ते म्हणत. मारीहि त्यांची फार आवडती मुलगी होती.

## पॅरिसकडे

मारीचं वय चोवीस होतं. एकदम मारीच्या मनांत पॅरिसला जाण्याचं आलं. लगेच तिनं तयारी केली. प्रवास थर्डक्लासनं करायचा ठरवला. एवढंच नाहीं तर जर्मनींतल्या चवथ्या वर्गांत, उघडया डब्यांत बसून तिनं प्रवास केला. सामान बेताचंच बरोबर घेतलं. पुस्तकं, पांघरूण व तीन दिवस पुरेल एवढं खाणं घेऊन ती निघाली.

गाडी सुटण्याची वेळ झाली. मारी प्रोफेसर साहेबांना म्हणाली, " मी जास्त दिवस दूर रहाणार नाहीं. दोन किंवा तीन वर्षंच मला लागतील. माझी परीक्षा होतांच मी परत येईन. मग पुन्हां तुम्हांला कधीं सोडणार नाहीं. बरोबर आहे ना ? "

"बरोबर आहे. माझी मन्युस्या ती ! " वडिलांचा गळा दाटला व मारीला जवळ घेऊन ते पुढं म्हणाले, " लवकर ये परत. चांगला अभ्यास कर. तुला चांगलं यश मिळो ! "

गाडी सुटली. जर्मनींत चवथ्या वर्गाच्या डब्यांत मारी जवळच पायथ्याशीं सामान ठेवून आपल्या आरामखुर्चीवर गुरफटून बसली होती. तिचं ध्येय गांठायला ती चालली होती.

## सॉरबोन युनिव्हर्सिटी

मारी पॅरिसला पोहोंचली. स्वातंत्र्याचा स्वाद मनमुराद लुटतां येणाऱ्या स्वतंत्र देशाची हवा लागतांच मोकळ्या मनानं ती श्वास घेऊं लागली. तिचा आनंदही नव्या स्वरूपाचा होता.

मारी प्रथम ब्रोन्याकडे रहात होती. जगप्रसिद्ध पहिल्या प्रतीच्या सायन्सच्या सॉरबोन युनिव्हर्सिटींत मारीनं इ. स. १८९३ त नोव्हेंबरच्या तीन तारखेला आपलं नांव नोंदविलं.

मारी शक्यतों आपला वेळ कॉलेजमध्यें व लॅबोरेटरींत प्रयोग करण्यांत घालवी. संध्याकाळीं घरीं परत आल्यावरही ती अभ्यास करी. मारीच्या कपड्यावरून तिची गरिबी दिसून येत असे. आपल्या कामांत व अभ्यासांत गर्क असणाऱ्या या नवीन पोलीश मुलीबद्दल मुलांमधें कुतूहल उत्पन्न झालं शिवाय मुलांना तिचं नांवही उच्चारण्यास अवघड वाटे. ती कुणाशींही जास्त बोलत नसे. फक्त दाढी वाढविलेल्या व गंभीर दिसणाऱ्या सायन्सच्या शिक्षकांशीं चर्चा करतांना ती कधींतरी आढळे. त्या शिक्षकांप्रमाणं तिला व्हायचं होतं.

शाळेच्या जवळ असलेली एक छोटी स्वतंत्र खोली घेऊन ती एकटी त्यांत राहूं लागली. मारीनं खऱ्या, खडतर विद्यार्थिनीचं जीवन स्वीकारलं. भाडं स्वस्त पडावं म्हणून अगदी स्वस्त भाड्याची खोली तिनं पत्करली होती. महिन्याला दोन रुपये पडत. आशू, कल्पना कर ती खोली कोणत्या स्वरूपाची असली पाहिजे.

उतरत्या छपराखालीं असलेल्या झरोक्यांतून जेवढा उजेड आंत येई, तेवढयांतच तिला वाचावं लागे. तेथें नळाचं पाणी नव्हतं, विजेचे दिवे नव्हते नी थंडींत खोली फार थंड वाटे. सुरवातीला तिला स्वयंपाकही करतां येत नसे.

तिच्या खोलींत, एक टेबल, एक खुर्ची, घरून आणलेली दुमडली जाणारी खाट, स्टोव्ह, एक दिवा व स्वयंपाकाची थोडी-बहुत भांडीं, येवढंच त्या खोलींत तिनं लावून ठेवलं होतं.

लायब्ररीचे दरवाजे रात्रीं दहाला बंद होईपर्यंत मारी तेथें बसून वाची व नंतर खोलीवर येऊन रात्रीचे दोन वाजेपर्यंत आपल्या दिव्याच्याजवळ बसून ती आणखी वाचन करी. मग अगदा थकून जाऊन ती झोंपे.

तिचे ब्लाऊज ती स्वतः शिवी. जुने कपडे शिवून जपून वापरी. तिचं खाण्याकडे विशेष लक्ष नसे. कधीं 'सुपां'वर अगर मांसाच्या तुकडयावर तर कधीं पाव-लोण्यावर नी फार तर दोन अंडीं अगर फळं खाऊन ती आपला गुजारा करी. त्यामुळें ती फार फिकी दिसे. तिच्या अंगांत भरपूर रक्त नसल्याचीं चिन्हं दिसूं लागलीं. त्या शरीराला उष्णता तरी कोठून येणार ? आणि तेथल्या थंडींत तर तिचे हात पाय गार पडत असत. शिवाय तिची खोली तर तसली ! फारच थंडी वाजली तर पांघरूणावर ट्रंकेंतील सर्व कपडे ती घेई नी अगदीं त्यांनींही थंडी भागली नाहीं तर खुर्चीच्या दाबानं तरी उष्णता येईल या आशेनं ती अंगावर खुर्ची घेई. या उपासमारीनं तिला पुढं चक्कर येऊं लागली व कधीं कधीं तर ती बेशुद्धही होई. तिचे डोळे ओढल्यासारखे दिसत.

इं. स. १८९३ त सायन्सची व इ. स. १८९४ त गणिताची पदवी मारीनं मिळवली. तिच्या श्रमाचं चीज झालं. तिला आतां फ्रेंच भाषा चांगली येऊं लागली. सुट्टीमधें मारी पोलंडला गेली पण जाण्यापूर्वी तिनं आपली जागा धुऊन काढली व तिनं सामान आवरलं. सुट्टीनंतर पुन: तिला पॅरिसला काम करण्यासाठीं जायचं होतं. पुढील शिक्षणासाठीं तिला स्कॉलर्शिप मिळाली.

मारीचं वय तेव्हां सव्वीस होतं. आपल्या गरीब स्थितीबद्दल तिला लाज वाटली नाहीं, तर उलट परक्या देशांत आपण अत्यंत काटकसरीनं राहून अभ्यास करूं शकतों याबद्दल तिला अभिमान वाटत असे. एका मोठ्या सायंटिस्टची हुशारी व नम्रता याची योग्य सांगड तिच्या ठिकाणीं झाली होती.

## पियेर क्यूरी

आपल्या काल्पनिक सुखांत गढून गेलेली मारी, नी दारिद्र्यानं गांजून गेलेली सव्वीस वर्षांची तरुण मारी, कामाचा बोजा दूर करण्यांत गुंतून गेली होती. तिला दुसऱ्या गोष्टींकडे लक्ष द्यायला फुरसत तरी कुठं होती ! लॅबोरेटरींत, लायब्ररींत व कॉलेजमधें अनेक तरुण मंडळींशीं तिची गांठ पडे व त्यांच्याशीं तिचे अनेक प्रकारचे संबंध येत असत.

' सॉरबोन'ला पियेर क्यूरी नांवाचा फ्रेंच सायंटिस्ट बऱ्याच वेळां कांहीं कामानिमित्त जात असे. " अलौकिक बुद्धिमत्ता असलेल्या स्त्रिया फार विरळा, " अशा मताचा तो होता. त्याला, आपल्याला साजेशाच मुलीबरोबर लग्न करायचं होतं. सुदैवानं, ' सॉरबोनमधें ' त्याची व मारीची गांठ पडली. त्यांचं दोघांचंही मन 'सायन्स' या

विषयांत रमत असे. हळूहळू त्यांची मैत्री वाढली. मारीला आपल्या कामांत प्रियेर योग्य तें मार्गदर्शन करील असं वाटून ती वारंवार त्याचं मत घेई. तिचे प्रोफेसरही, तिला कुठं अडलंच तर सांगत कीं, "हा प्रश्न तुला पियेर क्यूरी चांगला समजावून देईल." शाळेत जरी पियेर सायन्सचा उत्तम शिक्षक मानला जाई, तरी त्याची खरी योग्यता त्याहूनही अधिक होती. या सर्व गोष्टींमुळं मारीला पियेरबद्दल फार आदर वाटूं लागला नी दिवसेंदिवस त्यांचं जाणं-येणंही वाढलं.

पियेरमधें वेगळीच आकर्षकता होती. त्यानं वाढवलेली दाढी त्याला शोभून दिसे. दिसण्यांत गंभीर, नी त्याच्या दृष्टीवरून पियेर शांत स्वभावाचा व खोल विचार करणारा आहे असं ताबडतोब कुणालाही वाटे.

एका बाईशीं, सायन्ससारख्या आपल्या आवडत्या विषयावर चर्चा करतांना त्याला फार आवडे; शिवाय ती एकटी एका लहान खोलींत, अत्यंत काटकसरीनं रहात आहे हें पाहून तर त्याला मारीबद्दल मोठा अभिमान वाटे.

मारीची परीक्षा होऊन ती पहिली आली हें तर पियेरला मोठं भूषणावह वाटलं. आतां ती पोलंडला जाण्यास निघाली. पियेरनं विचारलं, " तूं पोलंडला जाऊन काय करणार ? "

" मी एखाद्या शाळेंत शिकवीन व दुसऱ्याच्या उपयोगी पडतां आल्यास पाहीन. आपला देश सोडून राहणं पोलिश स्वाभिमानाला धरून नाहीं ! " असलं तडफदार उत्तर ऐकून पियेरला तिचं कौतुक वाटलं.

आपल्याला, तिला पुन्हां भेटतां यावं असं त्याला मनांतून तर वाटत होतं !

× × ×

## पियेर कुटुंब

पियेरचा जन्म इ. स. १८५९ त झाला. त्याचे वडील डॉक्टर होते. त्याचा भाऊ जॅकीस यालाहि सायन्स हा विषय फार आवडे. दोन्हीहि भावांनीं प्रयोग करून नवीन शोध लावले. पियेरची हुशारी व शोधकवृत्ति पाहून डॉक्टरनं पियेरला घरींच शिक्षण दिलं होतं. वयाच्या अठराव्या वर्षीं पियेर एम्. ए. होऊन लॅबोरेटरींत त्याला नोकरीहि मिळाली. शिक्षक म्हणून पगार बेताचा होता. त्या मानानं कांहीं शोध लावून मोठं नांव पियेरनं मिळवलं होतं.

मारी पोलंडला जाण्यापूर्वी तिची व आपल्या 'स्किओ'ला राहणाऱ्या आईवडिलांची भेट करून द्यावी, या उद्देशानं पियेरनं मारीला आमंत्रण दिलं. त्याप्रमाणं मारी एकदां पियेरच्या आईवडिलांना भेटण्यास गेली. आपल्या वॉरसॉच्या घराप्रमाणंच प्रेमळ वातावरण तिला तेथं आढळलं.

मारीला तिच्या खोलीवर पोहोंचविण्यास जातांना पियेर रस्त्यांत म्हणाला, "पण तूं ऑक्टोबरमध्यें परत येणार ना ? पोलंडमध्यें राहून तुला सायन्सचा पुढचा अभ्यास करतां येणार नाहीं नी आतां कोणत्याही परिस्थितींत तुला सायन्स सोडतां येणार नाहीं."

पियेरचा काय हेतु आहे तो मारीनं ओळखला व ती म्हणाली, "हो, बरोबर आहे तुझं म्हणणं. मला परत यायला आवडेल." पियेरचं व मारीचं एकच ध्येय होतं.

एकदां पियेरच्या घरीं ब्रोन्याहि गेली होती. पियेरची आई तिला म्हणाली, “ पियेरच्या हुशारीची बरोबरी करायला मारीशिवाय दुसरं कुणीहि नाहीं. माझ्या पियेरला सुखी करणं तिच्या हातांत आहे. ”

× × ×

अगदीं अनुरूप जोडा होता ! शेवटीं इ. स. १८९५ त जुलै महिन्याच्या सव्वीस तारखेला पियेरशीं मारीचं लग्न झालं. लग्नाला मारीचे वडील हजर होते. त्या प्रसंगाला धरूनच वडिलांनीं पियेरला सांगितलं, “ माझ्या मुलीजवळ प्रेम करण्यास योग्य अंत:करण आहे. ती झाल्यापासून मला एकहि दिवस दु:ख दिल्याचं आठवत नाहीं. ” मोठ्या अभिमानानं काढलेले उद्गार होते ते ! अशी गोड मुलगी त्यांनीं पियेरच्या स्वाधीन केली.

लग्न झाल्यानंतर पहिलं वर्ष मोठ्या आनंदांत गेलं ! त्यासाठीं मारी ब्रोन्याकडे स्वयंपाक करण्यास शिकली. त्यांनीं नवं बिऱ्हाड साधं थाटलं होतं. दोन्ही ‘ सायंटिस्ट ’ ना अत्यंत उपयोगी पडणारं एक टेबल व दोन खुर्च्या नी त्यावर एक दिवा, हें सामान त्यांच्या दिवाणखान्यांत होतं.

दोघे बरोबर बसून वाचीत, बरोबर बसून प्रयोग करीत, बरोबर मिळून बाजारांत जात नी फावल्या वेळीं दोघं मिळून आपल्या सायकलीवर बसून बाहेर पडत. मारीला पुढील ‘ फेलोशिप ’च्या परक्षिेला बसायचं होतं. दोघेहि रात्रीचे २—३ वाजेपर्यंत जागून वाचीत बसत.



मारी आपल्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत पास झाली. त्या दिवशीं पियेरबरोबर ती सायकलीवरून आनंदांत दिवस घालविण्यासाठीं बाहेर पडली.

दुसऱ्या वर्षीं तिची तब्येत बरी राहीना, तरी तिचं प्रयोग करण्याचं काम तसंच चालू असे. याच वर्षीं तिच्या सासूबाई कॅन्सर-च्या विकारानं वारल्या. तेव्हांपासून तिचे सासरे तिच्याकडे राहण्यास आले. वयाच्या तिसाव्या वर्षीं तिला मुलगी झाली. तिचं नांव आयरिन् ठेवण्यांत आलं. मुलीला संभाळण्यास एक बाई ठेवून तिनं आपला अभ्यास पुरा केला. तिच्यावर आणखी आईची जबाबदारी येऊन पडली. त्यामुळें तिची प्रकृति खालवली.

इ. स. १८९७ च्या शेवटीं तिनं नव्या दोन पदव्या घेतल्या व डॉक्टरच्या पदवीसाठीं अभ्यास करूं लागली. याच सुमारास

ब्रोन्या पोलंडला जाणार होती. दोघं नवराबायको मिळून तेथें क्षयरोगी लोकांसाठीं हॉस्पिटल उघडणार होते. ब्रोन्या जाणार म्हणून मारीला वाईट वाटलं. तेव्हांपासून तिला फार एकटं वाटे.

× × ×

## रेडियमचा शोध

इ. स. १८९२ ते १९०२ पर्यंत एका मामुली लॅबोरेटरींत बसून पियेर व मारी एक महत्त्वाचा शोध लावण्यांत गुंतलीं होतीं. कधीं कधीं तर हीं दोघं, रात्रींचींहि त्या खोलींत कशाची तरी वाट पहात व निरीक्षण करीत बसत. आपल्या प्रयोगांत व्यत्यय येऊं नये म्हणून पियेरनं चांगल्या पगाराच्या नोकऱ्याहि स्वीकारल्या नाहींत. त्याच्या ऐवजीं खर्च भागण्यासाठीं मारीनं एका मुलींच्या शाळेंत नोकरी पत्करली होती. त्या दोघांच्या जीवनांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांची छोटी व साध्या छपराची लॅबोरेटरी होती.

एके रात्रीं त्यांच्या नव्या प्रयोगाचा निकाल लागायचा होता. त्यासाठीं त्यांच्या पैशांतील बचतहि खर्चीं घातली होती. त्यांना एकाएकी मनाला आल्हाद देणारा फिक्या जांभळ्या रंगाचा प्रकाश दिसला. आपण याला काय नांव द्यावं हेंहि त्यांनीं ठरवून टाकलं. जणूं कांहीं स्वतःच्या मुलाचचं नांव ठेवायचं होतं ! त्या दोघांनीं या मौल्यवान् पदार्थाला जन्म दिला होता. अज्ञात असलेल्या या पदार्थाला उजेडांत आणलं. 'कॅन्सर'सारख्या भयंकर रोगावर रेडियमचा इलाज केल्यास बऱ्याच लोकांचे जीव वांचूं शकतात हेंहि त्यांनीं प्रयोगानं सिद्ध केलं. हे प्रयोग करीत असतां मारीचीं बोटं कित्येकदां भाजलीं. त्या दोघांच्या श्रमांचा उपयोग लोकांच्या

कल्याणासाठीं झाला. मग आशू, हेही दोघं साधुसंताप्रमाणेंच झालें असं म्हणणं योग्य ठरेल नाहीं ?

इ. स. १९०२ मध्यें मारीचे वडील आजारी पडले. त्यासाठींच मारी वॉरसॉला गेली, परंतु त्यापूर्वींच तिचे वडील वारले. मारी फार थकलेली दिसे. तिनं थोडे दिवस तेथें काढले. परत आल्यावर पियेर संधिवातानं आजारी पडला. त्या वेळीं मारीच्या मनांत अनेक अनेक वाईट विचार येऊन जात. "आपल्या दोघांपैकीं एक जरी दुसऱ्याला सोडून गेला तरी जगणं अशक्य होईल," असे आपले विचार तिनं पियेरला बोलून दाखविले. दोघांनीं चालविलेल्या कामांत खंड पडला तर ! हे विचार ऐकून पियेर म्हणाला, "सायंटिस्टला त्यानं हातीं घेतलेलं काम सोडण्याचा मुळींच अधिकार नाहीं. कोणत्याहि परिस्थितींत आपण काम सोडतां कामा नये." पियेरनं मारीला निराश होऊं दिलं नाहीं.

×

× 23605 ×

## मारीची व पियेरची प्रसिद्धी !

इ. स. १९०२ मध्यें पियेरच्या व मारीच्या या नव्या शोधासाठीं त्या दोघांना फ्रान्समधील सायन्स विद्यापीठातर्फे वीस हजार फ्रँक्स मिळाले. दोघांचा मोठा सन्मान करण्यांत आला. त्या समारंभाला ब्रोन्या मुद्दाम हजर राहिली व मारीच्या सर्व विद्यार्थिनी आल्या होत्या. मारीनं तिच्या विषयावर भाषण केलं, त्या वेळीं त्या विद्यार्थिनींच्या भावना आदरानं नाचत होत्या. मारीला डॉक्टर ही पदवी मिळाली. या महत्त्वाच्या शोधाची नी क्यूरींची प्रसिद्धी जगभर

पसरली. इंग्लंड, जर्मनी, ऑस्ट्रिया, डेन्मार्क व अमेरिका येथून त्यांना आभिनंदनपर पत्रं येऊं लागलीं.

या दोघांना फ्रान्समध्यें रेडियम तयार करण्याचा उद्योग सुरू करायचा होता. त्यासाठीं सायंटिस्ट लोकांची जरुरी होती. मोठ्या प्रमाणांत उद्योग करण्यास फ्रेंच सरकारचा पाठिंबा मिळवायचा होता नी हें झाल्यावर दुसऱ्या देशांत त्याचा फैलाव करायचा होता. केवढं मोठं कार्य त्या दोघांपुढं होतं !

त्यांना या रेडियमवर भाषणं करण्यास दूरदूरच्या देशांतून आमंत्रणं येऊं लागलीं. इ. स. १९०३ मध्यें लंडनला पियेर व मारी या दोघांना जावं लागलं. अत्यंत साध्या पोशाखांत हिंडणाऱ्या रेडियमच्या आईवडिलांना पाहून लोकांना एकदम या मोठ्या व्यक्तीं-बद्दल आदर वाटल्याशिवाय राहिला नाहीं. मारीला पहातांच तिचे जळून गेलेले हात लोकांच्या दृष्टींतून चुकत नसत. लंडनमधील एका मोठ्या संस्थेमार्फत त्यांना पदक मिळालं. लंडनहून परत आल्यावर पियेरला व मारीला जगांतील अनेक सायंटिस्ट लोकांशीं पत्रव्यवहार करावा लागे.

इ. स. १९०३ मध्यें स्वीडनच्या सायन्सच्या विद्यापीठातर्फे सोन्याचं पदक मारीला मिळालं. ‘ नोबेल प्राईझ ’ किंवा सायन्स विषयांतील हा बहुमान मिळविलेली ‘ मादाम क्यूरी ’ ही पहिलीच स्त्री होय.

मारीला स्वीडनहून सात हजार सोन्याचे फ्रँक्स मिळाले. आशू, पण मारीनं त्या पैशाचा सदुपयोग करण्यांत जी बुद्धि खर्चली ती लक्षांत घेण्यासारखी आहे. त्यांतच तिच्या मनाचा थोरपणा आढळतो.

पोलंडमधील तिच्या वहिणीनं व मेहुण्यानं चालविलेल्या हॉस्पिटलला तिनं मोठी देणगी पाठवली. सायन्सच्या सोसायटयानाहि तिनं देणग्या दिल्या. आपल्या दिराला व भावंडांना तिनं पैसे दिले. पोलिश विद्यार्थ्यांना व तिच्या लहानपणच्या मैत्रिणीला व आपल्याबरोबर लॅबोरेटरींत काम करणाऱ्या लोकांना व आपल्या शाळेंतल्या एका गरीब विद्यार्थिनीला असे कांहीं पैसे दिले. एवढंच नाहीं तर पोलंडमध्यें असतांना, लहानपणीं आपल्याला फ्रेंच शिकवणाऱ्या एका गरीब बाईलाहि तिनं पैसे पाठविले. ती आतां म्हातारी झाली होती, पण तिला मरण्यापूर्वीं एकदां तिची जन्मभूमि पहायची तिची इच्छा, मारीनं पैसे देऊन पुरी केली

मारी कधींहि या मदतीचा उल्लेख करीत नसे. तिच्या मदतीची जेथें जरूरी असे तिथें नेहमीं गुप्तपणें मारी मदत करी.

मारीच्या प्रसिद्धीबरोबर तिचं काम फारच वाढलं नी त्यामुळं "नको ही प्रसिद्धी !" असं त्या सालसवृत्तीच्या मारीला वाटूं लागलं. कांहीं लोक तर तिचं नांव आपल्या घोडीलाहि देऊं लागले.

कोणतं म्हणून काम तिनं करायचं ठेवलं होतं ? गृहिणी म्हणून, आई म्हणून, शिक्षक म्हणून नी सायंटिस्ट म्हणून अशीं सर्व कामं ती उचलीत होती. जगांत मिळणाऱ्या प्रसिद्धीसाठीं हिंडण्यास वेळ कुठं होता ? "सायन्सच्या प्रदेशांत पाय टाकला म्हणजे पदार्थांत लक्ष घातलं पाहिजे. व्यक्तींना महत्त्व देऊन चालत नाहीं" असं तिचं सांगणं असायचं.

.स. १९०४ मध्ये मारीला ईव्ह नांवाची दुसरी मुलगी झाली. त्या वेळीं पियेरला मोठी नोकरी मिळाली म्हणून आपली

जुनी जागा व लॅबोरेटरी सोडून दुसरीकडे त्यांना जावं लागलं. पियेरचे व मारीचे दिवस समाधानानं जाऊं लागले. एके दिवशीं पियेर मारीला म्हणाला, “ मारी, तुझ्याबरोबर घालविलेलं माझं आयुष्य फार आनंदांत गेलं. ”

× × ×

## एप्रिल एकोणीस इ. स. १९०६

गुरुवारचा दिवस होता तो ! पहाटेपासून पाऊस पडत होता. त्या दिवशीं पियेरला, मित्राबरोबर जेवायला जायचं होतं नी तेथून तो छापखान्यांत जाऊन नंतर कॉलेजांत जाणार होता. घर सोडतांना खालूनच मारीला हांक मारून त्यानं विचारलं, “मारी, आज तूं लॅबोरेटरींत जाणार आहेस काय ? ”

मुलींना कपडे घालण्यांत गुंतली असतां वरूनच मारीनं उत्तर दिलं, “ कदाचित् आज मला वेळ मिळणार नाहीं.”

मारीचं उत्तर ऐकलं असेल नसेल तोंच पियेर घाईंत छत्री उघडून चालूं लागला.

दुपारचे अडीच वाजले होते. पियेर जेवण आटोपून दरवाजांत जीन पेरिनचा निरोप घेऊन पियेर पावसांत छत्री उघडून छापखान्याच्या रस्त्याला लागला. तेथें पोहोंचल्यावर छापखाना बंद असल्याचं त्याला आढळून आलं म्हणून तो कॉलेजच्या रस्त्याला लागला होता. सीन नदीच्या जवळून जाणाऱ्या पॅरिसमधील रस्त्यावर नेहमीं लोकांची व गाड्यांची गर्दी असते. त्यांतून पाऊसाहि जोरांत पडत होता. एरव्हीं आपला रस्ता काढणंही कठिण असतं ! पियेर

एका घोड्याच्या गाडीच्या मागून चालला होता. रस्त्याच्या वळणावर आल्यावर आडव्या रस्त्यानं ट्रॅम जोरांत चालली होती म्हणून पियेरच्या पुढील गाडी थांबली. तो गाडीच्या डाव्या बाजूला रस्ता काढूं लागला, पण पियेर हा कोणत्या विचारांत गढला होता कुणास ठाऊक ! त्यानं मागं न पाहतां पाय टाकला तोंच मागून दोन घोडयांची गाडी जोरानं चालली होती. गाडीवानाला घोडे आवरणं कठीण झालं. तोंच पियेर गाडीखालीं आला. रस्त्यावरील लोक गाडीवानाला " थांबव, थांबव थांबव गाडी ! " म्हणून ओरडूं लागल. पण गाडीवानाच्या आटोक्याबाहेर तें काम होतं. सहा टन वजनाच्या गाडीनं त्या सायंटिस्टच्या मेंदूचा चुराडा केला होता.

स्ट्रेचरवर घालून पोलिसांनीं पियेरला पोलीस स्टेशनवर नेलं. खिशांतील कागदपत्रावरून पियेर क्यूरींचं नांव पोलिसांना सांपडलं. डॉक्टरांना बोलावलं पण डोक्याचीं हाडं चेंगरलीं गेल्यामुळं कांहीं उपयोग झाला नाहीं. पियेरच्या डोक्याला पट्टी लावली. लोकांची गर्दी तेथें जमली. त्यांत लॅबोरेटरींत पियेरच्या हाताखालीं काम करणारा गृहस्थ रडत उभा होता. गाडीवानाचे डोळेही रडून लाल झाले होते.

ही भयंकर बातमी मारीला आतां कशी सांगावी हा मोठा प्रश्नच होता. प्रो. जीन पेरिन व प्रो. पॉल ॲपेल मारीच्या घरीं आले. भीतभीतच ते घरांत गेले, पण अद्याप मारी घरीं परत आली नव्हती. पियेरच्या वडिलांनीं दरवाजा उघडला. पण हीं दोघंहि गप्प बसलेलीं पाहून डॉक्टरनं विचारलं, " माझ्या मुलाला अपघात झाला काय ? " क्षणभर डोळ्यांच्या पापण्याहि त्यांनीं हलवल्या नाहींत, पण त्या सुरकुतलेल्या गालांवर अश्रु ओघळूं लागले. अगदीं

निराश होऊन ते म्हणाले, " अशा या वेळीं पियेर कोणत्या तंद्रींत होता कुणास ठाऊक ! "

संध्याकाळचे सहा वाजले. मारी घरीं आली. तिला खुर्चीवर बसवून प्रोफेसरांनीं घडलेली हकीगत हळूंहळूं तिच्या कानावर घातली. ती अगदीं दगडासारखी बसली होती. कांहीं वेळानं तिचे ओंठ हालले व त्यांतून " पियेर मेला ? मेला ? अगदीं खरंच मेला का ? " असे शब्द निघाले. तिची स्थिति अगदीं केविलवाणी झाली. तिच्यांतला प्राण निघून गेल्यासारखीच ती दिसली.

मारीनं पियेरला घरीं आणण्यास सांगितलं. शेजाऱ्याकडं मुलींना पाठवलं व वॉरसॉला तार पाठवली. नंतर बागेंत जाऊन, हातांत डोकं खुपसून बांकावर ती एकटीच बसली नी आपल्या पियेरची वाट पहात बसली.

रात्रीं आठ वाजतां पियेरला मोटरींतून आणलं. मारी चटकन मोटरींत गेली व तिनं पियेरचा शांत चेहरा पाहून घेतला. पियेरला जेथें पुरण्यांत आलं त्याच्याजवळ आपल्या स्वतःच्या पेटीसाठीं जागा ठेवण्यांत आली.

× × ×

मारीला हें दुःख विसरण्यास फार काल लागला. ती त्या दिवसापासून आपल्या डायरींतल्या पियेरशीं बोलून आपलं दुःख हलकं करी. मारीला तिचा सहकारी दुरावला नी जग एका मोठ्या माणसाला गमावून बसलं.

मारीकडे ब्रोन्या, जोसेफ व जॅक्वीस धावून आले. पियेरच्या अपघातानंतर मारीला व तिच्या मुलींना पेन्शन देण्याचं फ्रेंच

सरकारनं ठरवलं पण मारीनं ती घेतली नाहीं. " मला पेन्शन नको. मी तरुण आहे व माझे हातपाय धड आहेत तोंपर्यंत काम करून मी माझ्या दोन्ही मुलींचा गुजारा करण्यास समर्थ आहे " असं तिनं कळवलं.

पियेरचं राहिलेलं सर्व काम मारीला पुरं करायचं होतं. पियेरची मानाची जागा मारीला देण्यांत आली. मारी इ. स. १९०६ मध्यें मेच्या पांच तारखेला कामावर रुजूं झाली. तिला दहा हजार फ्रँक्स वर्षाला पगार मिळूं लागला.

जूनच्या दहा तारखेला जॅकीस व जोफेस आपल्या घरीं गेले. लवकरच तिच्या ब्रोन्यालाहि जावं लागणार होतं. जाण्याच्या आदल्या दिवशीं ब्रोन्याच्या गळ्याला मिठी मारून मारी मनसोक्त रडली. आतांपर्यंत कोणाच्याहि समोर तिनं अश्रु गाळले नव्हते. मारी त्या दिवशीं मात्र रडून रडून दमून गेली. ब्रोन्यानं तिला अगदीं लहान मुलासारखं बिछान्यांत झोंपवलं.

दुसरा दिवस उजाडला व ब्रोन्याला जड अंतःकरणानं मारीला सोडून जावं लागलं.

× × ×

मारीला त्या घरांत रहावेना. ती दुसरीकडे राहण्यास गेली. मारीचा सासरा मारीजवळच रहात असे. मारीचा रोजचा व्यवसाय सुरू झाला.

नोव्हेंबरच्या पांच तारखेला प्रथमच प्रियेरच्या ऐवजीं सोरबॉनला मारीला शिकविण्यास जायचं होतं. त्या खोलींत विद्यार्थ्यांची गर्दी उडून गेली होती. मारी काय बोलणार याची सर्वांना उत्सुकता

लागून राहिली. दीड वाजला व दरवाजा उघडून मारी टेबलाजवळ येऊन उभी राहिली. विद्यार्थ्यांनीं टाळ्या वाजवून तिचं स्वागत केलं. तिनं निर्विकार चेहेरा करून मान वांकवली व आपल्या भाषणास सुरवात केली. पियेरनं जें शेवटलं वाक्य म्हटलं होतं, अगदीं तेंच वाक्य उच्चारून तिनं सुरवात केली. मुलांना आश्चर्य वाटलं. परंतु मारीचे डोळे भरून आले व अश्रु तिच्या गालावर पडले. पुढचं तिचं भाषण तिनं अगदीं एका सुरांत संपवलं व चटकन ती आलेल्या दरवाजांतून बाहेर पडली.

× × ×

## एकाकी जीवन

कॉलेजमधें प्रोफेसर होऊन जगांतील कोणत्याहि कॉलेजांत जो विषय त्या वेळीं शिकवला जात नव्हता तो विषय मारी पॅरिसच्या कॉलेजांत शिकवत होती. हळूहळूं तिचे विद्यार्थी वाढूं लागले. ती तेथल्या लॅबोरेटरींत काम करी.

घरीं मारीच्या दोन्ही मुली सासऱ्याजवळ व एका गव्हर्नेस-बरोबर रहात. मारी रोज आगगाडीनं कॉलेजला जाई. सासऱ्याची मुलींवर देखरेख असे. आयरीनचा तर तो मित्र होता. इ. स. १९०९ मधें सासरा आजारी पडला. म्हातारपणचं दुखणं लांबलं. पण मारी कॉलेजांतून आल्यावर सासऱ्याजवळ बसून गोष्टी सांगत बसे. इ. स. १९१० मधें डॉक्टर क्यूरी वारला.

मारी मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष पुरवूं लागली. सकाळीं एखादा तास त्यांना शिकविण्यांत ती घालवी. आयरीनचा गणित विषय

चांगला होता व ईव्हचा संगीताकडे कल आहे हें जाणून, त्या त्या विषयांत त्यांची प्रगति करण्याचं तिनं ठरवलं.

मुलींना ती व्यायामशाळेंत पाठवी. त्यांना बगीचांत काम करायला लावी. शिवाय शिवणकाम, हस्तव्यवसाय, पोहणं, घोड्यावर बसणं, या सर्वांत तिनं त्यांना हुशार केलं होतं. येवढंच नाहीं तर ती त्यांना स्वयंपाक करण्यासही लावी त्या दोन्ही मुली सायकलीवर चांगल्या वसूं लागल्या. मारी मुलींना कधीं शिक्षा करीत नसे. फार झालं तर अबोला धरणं ही तिच्या दृष्टीनं मोठी शिक्षा होती. सुट्टीच्या दिवसांत बाहेरगांवीं जाऊन उघड्या हवेवर फिरणं अगर डोंगर चढणं यांत त्या तिघी दिवस घालवीत. अशा रीतीनं, मारीनं आपल्या मुलींना धीट, स्वावलंबी व कणखर बनवलं.

आयरीनला इतर प्रोफेसरांच्या मुलांबरोबर आपल्या कॉलेजांतील प्रोफेसरांकडून शिक्षण घेण्याची व सायन्सची उपकरणं वापरण्याची तिनं संधि आणून दिली. त्यामुळें आयरीनला पुढं आईप्रमाणंच "नोबेल प्राईझ" मिळवतां आलं. ती मोठी झाल्यावर आई-प्रमाणंच लॅबोरेटरींत काम करी.

मारीचं शिकवण्याचं काम सुरू होतं तसंच तिचं नवीन विषयावर लिहिण्याचं काम सुरू होतं. रेडियम तयार करण्यासाठीं व निर-निराळे प्रयोग करण्यासाठीं पॅरिसमध्यें क्यूरींच्या नांवानं एक मोठी सुंदर लॅबोरेटरी बांधण्यांत आली. तिच्या खोल्या कशा असाव्यात, खिडक्या किती मोठ्या असाव्यात व त्याला बगीच्या केवढा असावा यावर मारीच्या सूचना घेऊन त्याप्रमाणं इमारत बांधली गेली. त्याच पद्धतीवर पोलंडमध्येंही मोठी इमारत बांधण्यांत आली. या दोन जगप्रसिद्ध इमारती अद्याप पियेरच्या व मारीच्या बुद्धिमत्तेची व

अंगमेहनतीची साक्ष पटवीत आहेत. इ. स. १९१४ पर्यंत मारीनं मोठंच काम केलं.

## इ. स. १९१४ मधील महायुद्ध

महायुद्ध सुरू झालं. मारीच्याबरोबर काम करणारे प्रोफेसर लोक सर्वच युद्धावर गेले. मारीवर सायन्स विद्यापीठाची बरीच जबाबदारी पडली. तिला तिचा बहुमोल रेडियम सुरक्षित ठेवायचा होता. तिनं आपल्याकडे जेवढं सोनं व पैसे होते ते सर्व युद्धासाठीं सरकारांत जमा केलं. मारीनं या वेळांतही मोठी कामगिरी बजावली.

कांहीं स्त्रिया एकत्र झाल्या व त्यांनीं युद्धांत जखमी झालेल्या शिपायांना न्यायला-आणायला उपयोगीं पडतील अशा मोटरींची व्यवस्था केली होती. त्यांत जखमी लोकांना तपासण्यासाठीं असलेली उपकरणं असत. मारी एका हॉस्पिटलमधून दुसऱ्या हॉस्पिटलमधें जाऊन डॉक्टर लोकांना मदत देई. काळोख केलेल्या खोलींत बसून एकेका वेळेला पन्नास ते शंभर जखमी लोकांना ती तपासी. विशेषत: त्यांचीं हाडं कुठं मोडलीं असल्यास त्या यंत्रांनीं बरोबर जागा समजे. ती गाडी चालवी. एकदां तर गाडी वाईट रस्त्यावरून चालली असतां ती उलटली. मारीला थोडंसं लागलंहि. परंतु स्वत:ला लागण्यापेक्षां त्या वेळीं तिच्या यंत्रसामग्रीला अपाय झाला असतां तर तिला जास्त वाईट वाटलं असतं.

हें युद्ध थांबलं नी पोलंडला स्वातंत्र्य मिळालं ही गोष्ट मारीच्या मनासारखी झाली. युद्धांत मारीनं बजावलेल्या कामगिरीबद्दल तिचा बहुमान करायचा सरकारनं ठरवलं.

× × ×

मारीचं वय ५० होतं, पण त्या वेळीं तिच्याजवळ शिलकत पेस नव्हते. फक्त तिच्या पगारावर ती चरितार्थ चालवी. पुनः मारीनं लॅबोरेटरींत काम करण्याचं ठरवलं.

इ. स. १९१८ त आयरीनचं लग्न झालं तेव्हांपासून ईव्ह आपल्या आईजवळ असे. सुट्टी झाल्यावर दोन्ही मुली आईबरोबर खेड्यांत राहण्यास जात. कधीं कधीं आईला बर्फावरील खेळ खेळ-ण्यास त्या लावीत. त्यांनी तिला पोहण्यासहि शिकवलं. मारी त्या वयांतहि चांगली पोहण्यास शिकली. ती तेथल्या साध्या लोकांत जाऊन बसे व त्यांच्याशीं गप्पा मारी. हे दिवस मारीचे फार आनंदांत गेले.

× × ×

## मारी अमेरिकेंत

इ. स. १९२० मधें मिसेस मेलोने ही अमेरिकन बाई मारीला भेटण्यास आली. मारीची कीर्ति ऐकून ती मुद्दाम तिला भेटण्यास आली. बोलतां बोलतां जेव्हां तिला आढळून आलं कीं मारीजवळ फक्त एक ग्रॅम रेडियम शिल्लक आहे तेव्हां तिला मोठं आश्चर्य वाटलं. या साध्या व सालस मारीबद्दल तिला प्रेम व आदर उत्पन्न झाला. मिसेस मेलोने तेव्हांपासून मारीची एक मैत्रीण झाली.

अमेरिकेंत गेल्यावर मिसेस मेलोनेनं "मादाम क्यूरी रेडियम" फंड उभारला. सर्व स्त्रियांनीं त्यांत भाग घेतला. एका वर्षानेंच अमेरिकेतर्फे मारीचा गौरव करण्यासाठीं तिला आमंत्रण देण्यांत आलं.

मारी दोन्ही मुलींना घेऊन अमेरिकेस गेली. मारीला पाहण्यासाठीं लोकांची गर्दी उडाली. कांहीं नाहीं तरी मारीच्या झग्याला तरी स्पर्श करावा असं कांहींना तिला पाहून वाटलं. अमेरिकेंतील ' व्हाईट हाऊस 'मध्यें अमेरिकेच्या प्रेसिडेंटच्या हातांनीं ती रक्कम मारीला देण्यांत आली. केवढा मोठा मान नी केवढा मोठा गौरव करण्यांत आला ! मारीचं अंतःकरण कृतज्ञतेनं भरून आलं. त्या पैशानं तिनं आपल्या लॅबोरेटरीला रेडियम विकत घेण्याचं ठरवलं.

निरनिराळ्या शिक्षणसंस्थांतर्फे तिला मोठमोठया पदव्याहि देण्यांत आल्या. तिला तेथें डॉक्टर ही पदवी मिळाली.

तेथें असतांना एका गृहस्थानें तिच्या नाजूक हाताला धरून जोरांत हस्तांदोलन केलं, पण त्या दिवसापासून तिचा हात तिला कपड्यांत लपेटून छातीजवळ अडकवून ठेवावा लागला. मारी जूनच्या २८ तारखेला निरोप घेऊन पॅरिसला येण्यास निघाली.

युरोपमध्यें इटली, इंग्लंड, हॉलंड येथेंहि तिचा सन्मान झाला. इ. स. १९२५ त मारी वॉरसॉला गेली. तेथें रेडियमचं विद्यापीठ व कॅन्सर रोगावर इलाज करण्यासाठीं मोठं हॉस्पिटल बांधण्यांत येणार होतं. त्या इमारतीच्या कोनशिलासमारंभास मारी हजर झाली. ब्रोन्यानं पोलंडमध्यें त्यासाठीं पैसे जमविले. मारीनं अमेरिकेंत आणखी एक वेळ जाऊन आणखी रक्कम जमवून आणली. या पैशावरच पुढं ती मोठी इमारत उभारली गेली.

फ्रान्समध्यें आणखी अनेक मोठया संस्थांतर्फे तिचा मोठा सन्मान व्हायचा होता. समारंभास ब्रोन्या, हेला व जोसेफ आपल्या

मन्यूस्याचं कौतुक पाहण्यास हजर झाले. त्या वेळीं त्यांचीं मनं हेंच बोलत असतील, " धन्य झाली आमची मन्यूस्या. "

डॉक्टर मादाम क्यूरीला त्या समारंभांत चाळीस हजार फ्रँक्स वार्षिक पेन्शन मिळण्याचं ठरलं. त्या वेळीं तिचं वय ५५ होतं. त्या समारंभांत तिनं पियेरचेच शब्द उच्चारले, " सायन्सच्या प्रदेशांत पाऊल टाकलं कीं, विषयाकडे लक्ष दिलं पाहिजे. व्यक्तीला जास्त महत्त्व देतां कामा नये. " यांत तिची नम्रता व्यक्त होत होती.

## मृत्यु

मारीचं वय ६५ होतं, तरी तिचं लॅबोरेटरींतलं काम व रात्रीचं २-३ वाजेपर्यंत वाचन चाले. अगदीं थकून ती झोपी जाई.

तिच्या डोळ्यांना पुढं कमी दिसूं लागलं. इ. स. १९३० त दोनदां तिच्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया झाली. मारी फार थकत चालली. तिला विश्रांतीची अत्यंत जरूरी होती. एके दिवशीं तिच्या लॅबोरेटरींत, काम करीत असतांनाच दुपारीं साडेतीन वाजतां काम सोडून ताप आल्यामुळं मारीला घरीं परत यावं लागलं. निघतांना तिनं आपल्या एका विद्यार्थ्याला सांगितलं, " या बागेंतल्या फुलांना मरूं देऊं नकोस. त्यांची नीट काळजी घे. "

घरीं आल्यावर डॉक्टरनं तिची छाती तपासून पाहिली. तिचीं फुप्फुसं नीट काम देईनात. तिच्या आईचाच आजार तिला झाला होता. लगेच डोंगरावर असलेल्या क्षयरोगाच्या हॉस्पिटलमध्यें तिला नेण्यांत आलं. ईव्हनं तिची शेवटपर्यंत शुश्रूषा केली. इ. स. १९३४त

जुलैच्या ४ तारखेला सकाळीं मादाम क्यूरीचा अंत झाला. त्या वेळीं ती ६७ वर्षांची होती.

मारीच्या इच्छेप्रमाणं मारीला, पेटींत घालून स्किआला नेण्यांत आलं. मारी तिच्या पियेरच्या जवळच आतां कायमची राहणार होती. जगांतील सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या बजावणाऱ्या मारीला आतां तरी पूर्ण विश्रांति मिळेल !

आशू, मारीसारखी आई आपल्याला मिळाली असती तर बरं झालं असतं असं नाहीं का तुला आतां वाटत !

◆ ◆ ◆

## गोष्ट ३ री

# दोन उंदीर

एके वर्षी पाऊस चांगला पडून पीक-पाणी चांगलं आलं होतं. साताऱ्याला एका शेतांत तर ज्वारीचीं कणसं घोंसदार दिसत होतीं. त्या शेताच्या बांधावर एका कोपऱ्यांतील बिळांत एक उंदीर रहात होता. त्याला श्रीमंत व्हायचं होतं. पैसा असला म्हणजे सर्व कांहीं मिळतं असं त्याला वाटूं लागलं. त्यानं शेतांतील धान्य भरलं व पैसा गोळा केला.

त्याच्या शेजारीं राहणाऱ्या बाकीच्या उंदरांनीं त्याच्यासारखं डोकं वापरलं नसल्यामुळं त्यांच्याकडून धान्य सांठविण्याचं काम तितकंसं झालं नाहीं. त्यांत एक गरीब उंदीर होता. तो नेहमीं दुसऱ्यांच्या उपयोगी पडे. शिवाय श्रीमंत उंदराच्या जवळच रहात असल्यामुळें कधीं त्याची गांठ पडलीच तर प्रथम नम्रतेनं त्याला तो मुजरा ठोकी.

एकदां पाऊस इतका पडला कीं सर्वांच्या बिळांत पाणी घुसलं. सर्व उंदरांवर मोठी आपत्ति आली. श्रीमंत उंदराचं सर्व लक्ष त्या बिळांतील धान्याच्या पोत्यांवर होतं. तर गरीब उंदराची आजू-बाजूच्या बिळांतील उंदरांचीं पिलं वांचविण्याची धडपड चालली होती.

कांहीं दिवसांनीं दुष्काळ पडला, त्या वेळीं बरेच उंदीर विचारांत पडले. अशा वेळीं श्रीमंत उंदीर आपल्या गाडींतून एकटाच फिरण्यास जाई. त्यानं कधींहि गांवच्या उंदरांची चौकशी केली नाहीं किंवा त्यांच्या सुख-दुःखाची तो चौकशीहि करीत नसे. त्याच्याकडे त्या वेळीं धान्याची रास होती.

फ्लॉरेन्स नायटिंगेल

गरीब उंदराजवळ एक छोटा रांजण भरून ज्वारी होती. त्या वेळीं शेत रिकामं होतं. आणखी धान्य मिळण्याचीहि आशा नव्हती. वारंवार तो दुसऱ्या उंदरांची चौकशी करी व त्यांच्या सभांना हजर राही. कांहीं दिवस असे तसेच गेले. त्या गरीब उंदरानं आपल्याकडील रांजणभर धान्य इतरांना वांटून दिलं. त्या श्रीमंत उंदराकडे गेलं असतां त्यानं मूठभर धान्य देऊन त्यांची बोळवण केली. सभेंत सर्वांनीं मिळून दौरा काढून लांबलांबच्या शेतांतील धान्य गोळा करून आणून सर्वांनीं वांटून घेण्याचं ठरवलं. त्यामुळें आजारी असलेल्या उंदरांचीहि सोय झाली. त्या दौऱ्यांत तो गरीब उंदीर भाग घेई व कांहीं दिवस त्या सर्वांचे जरा कठीण स्थितींत गेले. परंतु रात्र झाल्यावर उजेड येतोच !

त्या दुष्काळाचे दिवस ते गांवकरी उंदीर विसरले नव्हते. श्रीमंत उंदराचं सुख पैशावर होतं व गरीब उंदराचं सुख आपल्या बांधवांचं प्रेम संपादन करण्यांत होतं.

एकदां तो श्रीमंत उंदीर अर्धांगवायूनं आजारी पडला. त्याला अंथरुणांत पडून रहावं लागलं. त्यानं नोकरमाणसं ठेवलीं, डॉक्टरला बोलावलं, अनेक उपचार केले, नर्सेस ठेवल्या—सर्व व्यवस्था त्याची झाली. तो त्या नोकरांना फार त्रास देई व त्यांना आपल्याजवळून हलूं देईना. रागांत निजल्या-निजल्या, कांहीं जरी शक्य नसलं तरी एका पायानं त्यांना लाथा मारी व मोठमोठ्यानं ओरडून सर्वांना त्रास देई. दुसऱ्याचा विचार करण्यास तो कधींच शिकला नव्हता.

त्या त्याच्या वागणुकीनं नोकरमाणसं त्याला कंटाळलीं. तीं सर्व मनांत हेंच म्हणत, “ केव्हां एकदां हा मरेल ! ” सर्वांचा शाप

त्यानं घेतला. शेजारचे उंदीरहि त्याला पाहण्यास येईनात. दुष्काळ पडला होता व ज्या वेळीं त्याच्याकडे भरपूर धान्य होतं त्या वेळेस तो असाच एकटा गाडींत बसून फिरे. तें त्याला आवडे, पण आतां त्याला लोकांनीं आपल्याला पाहण्यास यावं असं मात्र वाटे. पण त्या गरीब उंदराशिवाय दुसरं कुणीहि त्याच्याकडे त्या वेळीं येईनात.

रात्र झाली. जवळील झाडावर बसून एक घुबड 'घू-घू' करीत होतं. तो उंदीर एकटाच तळमळत होता. त्याला थंडी वाजत होती, परंतु त्याला पांघरूण घालण्यासहि त्याच्याजवळ कुणी नव्हतं.

आशू, दुसऱ्यांना पैसे देऊन जेव्हां आपण मदत करतों तेव्हां त्याची मोज करतां येते व वजनहि करण्याची शक्यता असते. पण दुसऱ्यांच्या उपयोगीं पडण्यासाठीं जेव्हां मनुष्य स्वतः अंग-मेहनत करतो तेव्हां त्याची मोज मात्र होत नाहीं. तीं कृत्य वजनांतहि टाकतां येत नाहींत. त्यापासून सुख मिळण्यास उशीर लागतो खरा; परंतु सुख मिळण्याचा तो खात्रीचा मार्ग आहे. त्यामुळें दुसऱ्यांचे आशीर्वाद मिळतात. त्या गरीब उंदरावर गांवकरी उंदरांचं प्रेम होतं. त्याचं काम करण्यास सर्व स्वखुषीनं तयार होते. त्यासाठीं त्याला पैसा द्यावा लागत नव्हता. मग सांग बघूं आशू, पैशानं त्या श्रीमंत उंदराला सुख मिळालं का ?

× × ×

## फ्लॉरेन्स नायटिंगेल

आश्लेषा, हीं इंग्लंडच्या बागेंतील सुंदर डेझीचीं फुलं आहेत. दिसायला जरी लहान असलीं तरी त्यांच्यांत भरपूर आकर्षकता

भरली आहे. त्यांच्या शुभ्रपणांतच सौंदर्य भरलं आहे. तसंच फ्लॉरेन्स नायटिंगेलनीं केलेल्या एकाच मोठ्या कामगिरीमुळें आज ती सर्वांच्या माहितीची झाली आहे. तिच्या प्रसिद्धीमुळें, मे महिन्याच्या १२ तारखेला सर्व ठिकाणीं तिची जयंती साजरी केली जाते.

वुइल्यम नायटिंगेल नांवाचा एक श्रीमंत गृहस्थ लंडनला रहात होता. त्याचीं तीन घरं होतीं. वुइल्यमला वाचनाचीहि गोडी होती. शिवाय त्याला प्रवास करण्याची आवड असे. त्याच्याकडे नेहमीं त्याच्या व त्याच्या बायकोच्या नात्यांतील मंडळी घरीं येऊन रहात. त्यांची उत्तम व्यवस्था ठेवली जाई. त्यांच्या कुटुंबांतील बरेच लोक ८०–९० वर्षांपर्यंत जगलेले आढळतात. त्या घरांत ऐश्वर्याला तोटा नव्हता.

वुइल्यम व मिसेस नायटिंगेल–फ्लॉरेन्सची आई–इटलींत राहण्यासहि मधून मधून जात असत. त्यांच्या दोन्ही मुलींचा जन्म इटलींतलाच. त्यांची मोठी मुलगी 'पार्थे' हिचा जन्म नेपल्समधला. फ्लॉरेन्सचा जन्म इ. स. १८२० त, मे महिन्याच्या बारा तारखेला 'फ्लॉरेन्स' या गांवीं झाला. त्या गांवीं विशेषेंकरून मे महिन्यांत, बगीचांत सुंदर फुलं फुलत, म्हणून तिचं नांव फ्लॉरेन्स ठेवण्यांत आलं होतं. युरोपमध्यें नायटिंगेल नांवाचा गाणारा पक्षी आहे. फ्लॉरेन्स नायटिंगेल हें तिचं नांव तिला साजेसंच होतं. तिला नेहमीं फुलं व पक्षी फार आवडत. "ली हर्स्ट"मधील त्यांच्या घरापुढील बगीचांत फुलं उगवलीं म्हणजे त्यांत फिरण्यांत तिला मोठा आनंद मिळे.

डेझी—



आश्लेषा, हीं इंग्लंडच्या बागेतील सुंदर डेझीचीं फुलं आहेत. दिसायला जरी लहान असलीं तरी त्यांच्यांत भरपूर आकर्षकता आहे. तसंच फ्लॉरेन्स नायटिंगेलनीं केलेल्या एकाच मोठ्या कामगिरीमुळें आज ती सर्वांच्या माहितीची झाली आहे.

एडल्वाईज—



—हें एडल्वाइज फूल. स्वित्झर्लंडमध्यें खडकाळ भागांत हीं फुलं सांपडतात. फारच प्रयास पडतो हीं हातीं यायला! रंगानं पांढरीं असतात तीं! सृष्टीला जसं फुलांनीं सौंदर्य येतं तसं वर्तनांतलं सौंदर्य थोर लोकांच्या गुणांनीं येतं. आशु, सुभाषचंद्र बोस ह्यांची पान ९५ वरील गोष्ट वाच.

## बालपण

ती लहान असतांना बाहुल्यांशीं खेळतांना ती आपल्या बाहुल्यांना फार चांगली संभाळे. आपल्या वडील वहिणीच्या बाहुलीचे हातपाय निघालेच तर ती त्याला चांगली पट्टी लावून जुळवून ठेवी.

ती पांच वर्षांची होती तेव्हां तिनं एक डुक्कर, एक गाढव, एक तट्टू व एक कुत्रा अशीं जनावरं पाळलीं होतीं. तिला कुत्रे व घोडे फार आवडत.

हॅम्पशायरला फ्लॉरेन्स रहात असतां तिची आई इतर स्त्रियांनीं चालविलेल्या सार्वजनिक कार्यांत भाग घेई ती त्यासाठीं स्वतः खर्च करी. इतर स्त्रियांवर तिचं चांगलं वजन होतं. शिवाय लहान संस्थांची व्यवस्था नीट लावून देण्याची कला तिच्यांत होती. फ्लॉरेन्समध्यें आईचा हा गुण उतरला होता. तिच्यापुढं आईचं उत्तम उदाहरण होतं.

फ्लॉरेन्स लहान असतांना पाठीमागें असलेल्या झाडींत फिरण्यास जाण्यास तिला आवडे. ती तेथें जाऊन खारींना खायला घाली. खारींनाहि तिची भीति वाटेनाशी झाली. त्या तिच्याजवळ येऊन निर्भयतेनं दाणा खात. तिला घोड्यावर बसायला आवडे. तिचा 'पेगी' नांवाचा घोडा होता. तो तर तिच्या खिशांतून सफरचंद अगर पाव काढून खाई. आजारी असलेल्या प्राण्यांना औषधपाणी घालून ती त्यांना बरी करी. ती त्या प्राण्यांची मैत्रीण होती. तिच्या दयेमुळें तिनं त्यांचा विश्वास संपादन केला होता. कधीं कधीं आपल्याला आणलेल्या खाण्यांतून खाणं ठेवून आईच्या

तोंडांत आणून ती घाली. ती तेथेंच दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याचे पहिले धडे आपल्या आईकडून घेत होती.

फ्लॉरेन्सच्या घराच्या पाठीमागें एका झोंपडींत 'रॉजर' नांवाचा धनगर आपल्या मेंढ्यांना व 'कॅप' नांवाच्या कुत्र्याला घेऊन रहात होता. त्याला बायको अगर मुलं नव्हतीं. जवळच्या चर्चमधील एक पाद्री—भटजी—फ्लॉरेन्सबरोबर घोड्यावर रपेट मारण्यास जाई.

रोज रॉजरच्या मेंढ्या तिला सकाळच्या भेटत, पण त्या दिवशीं त्या मेंढ्या इकडे-तिकडे पसरलेल्या तिला आढळल्या. परंतु त्या दिवशीं कॅप मात्र तेथें नव्हता व रॉजरहि जरा दुर्मुखलेला दिसत होता. फ्लॉरेन्सनं थांबून रॉजरला विचारलं, "रॉजर, आज कॅप दिसत नाहीं. कुठं आहे तो ?"

"कॅपचा मला आतां कांहीं उपयोग होणार नाहीं. मग त्याला उगाच खायला घालीत कशाला बसूं ? आज रात्रीं मला, त्याला मारून टाकावं लागेल." रॉजर म्हणाला.

"काय ? तूं त्याला मारणार ? किती दुष्ट आहेस ! त्यानं केलं तरी काय ?" फ्लॉरेन्सनं विचारलं.

"काल एका मुलानं त्याला मोठा दगड मारला व त्याचा पाय मोडून टाकला. आतां तो माझ्या कामाचा राहिला नाहीं." रॉजरचे डोळे भरून आले, पण त्यानं तोंड लपविण्याचा प्रयत्न केला. थोडया वेळानं तो म्हणाला, "बिचारा माझा कॅप ! त्याला अगदीं माणसासारखं सर्व समजतं. त्याच्यासारखा कुत्रा कुठं मिळायचा नाहीं."

" पण खरंच का त्याचा पाय मोडला ? " तो पाद्री म्हणाला.

" तुला जर त्याला बरं करतां आलं तर रॉजरला किती आनंद होईल ! चल आपण त्याला पाहून येऊं या. " फ्लॉरेन्स त्या पाद्र्याला सुचवूं लागली.

तीं दोघं रॉजरच्या झोपडीकडे गेली. आंतून कॅपचं भुंकणं जोरानं चाललं होतं. शेजाऱ्याकडून किल्ली घेऊन फ्लॉरेन्सनं दरवाजा उघडला. टेबलाच्या खालीं कॅपचे डोळे चमकले. तो रागानं पहात होता; पण फ्लॉरेन्सनं जेव्हां त्याला हांक मारली तेव्हां तो शेंपूट हालवूं लागला, नी सरकत सरकत तिच्या पायाजवळ येऊन बसला. तिनं त्याच्या अंगावरून हात फिरविला व तिनं त्याचा इजा झालेला पाय हातांत घेतला. त्या पाद्र्यानंहि तो पाय हातांत घेतला. जरी कॅपला त्या हालचालीपासून त्रास होत होता तरी तो जिभेनं ते हात चाटीत होता.

" त्याचं हाड कांहीं मोडलं नाहीं, त्याला फक्त विश्रांतीची जरुरी आहे " असं तो पाद्री म्हणाला.

" पण त्याला आराम वाटेल असं कांहीं तरी केलं पाहिजे. काय करतां येईल ? "

" त्याचा पाय शेकला पाहिजे. "

तें ऐकतांच फ्लॉरेन्सनं शेजाऱ्यांच्या मदतीनं पाणी उकळलं व कपडा त्या पाण्यांत बुडवून कॅपचा पाय शेकण्यास सुरवात केली.

कॅपला बरं वाटत होतं असं दिसलं. तो शेपूट हालवत होता. थोड्या वेळानं फ्लॉरेन्स परतली.

रस्त्यांत तिला रॉजर भेटला. " रॉजर, कॅपला आतां मारायचं नाहीं हं ! बिचारा कॅप ! त्याचा पाय मोडलेला नाहीं " फ्लॉरेन्सनं रॉजरला बजावलं.

" अद्याप कॅपला आपलं काम पूर्वीसारखं करता येईल " पाद्री म्हणाला.

रॉजरनं त्या दोघांचे आभार मानले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्याबरोबर ती कॅपला पहायला आली. " कॅप पूर्वीसारखा झाला. तूं नसतीस तर मी माझ्या शहाण्या कॅपला मुकलों असतों. किती तुझे माझ्यावर उपकार झाले ! " रॉजरनं कृतज्ञता व्यक्त केली.

फ्लॉरेन्सला संभाळायला व तिच्यावर देखरेख ठेवण्यासाठीं एक ' गव्हर्नेस ' ठेवण्यांत आली. तिच्या शिक्षणाकडे वुइल्यम प्रत्यक्ष लक्ष पुरवी. तो त्या दोघी बहिणींना इतिहास, भूगोल, ग्रिक, लॅटिन व व्याकरण शिकवी. फ्लॉरेन्स कधीं कधीं पहांटे चार वाजतां उठून अभ्यास करी. तिचं वाचन बरंच झालं. तिला कविताहि वाचण्यास आवडत. तिला संगीताचाहि फार शौक होता. तिनं त्याचाहि अभ्यास केला. अशा रीतिनं सतराअठरा वर्षांच्या फ्लॉरेन्सला उत्तमांतलं उत्तम शिक्षण मिळालं होतं व निरनिराळ्या देशांत प्रवास करून शिक्षणांत भर घालण्याचीहि उत्तम संधि मिळाली होती. ती राजकारणावर चर्चा करूं लागली. भाषेवर तिचं विशेष प्रभुत्व होतं. तिची लेखनाची शैलीहि चटकदार असे. मोठमोठ्या लोकांत वावरण्यास मिळालं व उत्तमांतलं उत्तम आयुष्य तिला घालवतां आलं. फ्रान्स, स्वित्झर्लंड, रोम, ईजिप्त, इटली व जर्मनींत तिला फिरण्यास मिळालं व चांगल्या लोकांच्या ओळखी झाल्या नी

त्यांची मैत्री वाढली. तिची आई तिला चांगले कपडे करून देई व नाच करण्यास घेऊन जाई.

श्रीमंत घराण्यांतील कोणत्याहि मुलाचा संसार करण्यास आपली मुलगी आतां योग्य झाली असं आईला वाटलं. अंऽहं ! पण फ्लॉरेन्सचं मन त्या चैनी वातावरणांत रमेना. सुंदर सोनेरी पिंजऱ्यांत धडपडणाऱ्या पक्ष्याप्रमाणं फ्लॉरेन्सचं मन झगडत राहिलं. तिच्या घरांतील इतर कोणत्याहि व्यक्तीचे विचार तिच्या विचारांशीं जुळेनात. तिच्या आईला व बहिणीला समजेनासं झालं. एकदां तिची आई म्हणालीहि, "मी बदक म्हणून घेतलेलं हें पिल्लूं हंसाचंच निघालं."

आशू, त्या श्रीमंत उंदराप्रमाणं फ्लॉरेन्स मूर्ख नव्हती. पैशांत सुख आहे असं तिला वाटलं नाहीं. तिला कसली तरी तळमळ लागून राहिली होती. ज्या कामांत तिचं मन गुंतेल असं काम करण्यास तिच्या आई-वडिलांची परवानगी नव्हती; कारण तसलं काम करणं श्रीमंत घराण्यांतल्या मुलीला कमीपणा आणणारं आहे असे त्या वेळचे विचार होते. फ्लॉरेन्सला आपला मार्ग काढावा लागला.

एकदां एका अमेरिकन मुलीबरोबर फिरण्यास गेली असतां, आपल्या घराच्या खिडक्या पाहून ती म्हणाली, "या घरांत पलंग टाकून रोग्यांची व्यवस्था करण्यास व हॉस्पिटलसाठीं त्याचा उपयोग करण्यास मला अधिक आवडेल. आपल्याला हवं आहे तेंच काम करण्यास ज्यांना मिळतं ते सुदैवी म्हणायचे !"

फ्लॉरेन्सला आनंद कशानं मिळाला असतां तर आजारी माणसांची शुश्रूषा करण्यानं ! "त्या वेळेलाच एकमेकांच्या खऱ्या



२३७०४ वि: चरित्र
... नों: दि: ९.१.९८

भावना कळल्या जातात" असं ती म्हणे. हेंच तिचं ध्येय तिला गांठायचं होतं. ईश्वरानं याच हेतूनं आपल्याला जन्म दिला आहे असा तिचा पूर्ण भरंवसा होता.

आशू, अशा स्वतंत्र विचाराच्या फ्लॉरेन्सनं लग्न करायचं नाकारलं व आपलं मन रमेल असं काम हातीं घ्यायचं ठरवलं.

× × ×

## ध्येय गांठण्याच्या मार्गावर

इ. स. १८४७ त ती वडिलांबरोबर रोमला गेली. त्या वेळेला मिस्टर व मिसेस ब्रेसब्रिज तिला भेटले. शिवाय मिस्टर व मिसेस सिड्ने हर्बर्ट यांच्याशीं तिची ओळख झाली. पुढं त्यांची मैत्री वाढली. फ्लॉरेन्सबद्दल त्या सर्वांची मतं फार चांगलीं झालीं व तिला कोणत्या विषयाची आवड आहे हें त्यांनीं पूर्ण जाणलं होतं.

तेथून परत येतांना फ्लॉरेन्स जर्मनींत गेली. तेथें कैसरस्वर्थला असललं हॉस्पिटल व तेथें नर्स होण्यासाठीं कोणता अभ्यासक्रम आहे व त्यांचे कोणते नियम आहेत तें तिनं पाहून घेतलं.

या वेळेला पुष्कळ 'चर्चेस्' पाहून तिनं भिंतीवर लिहिलेल्या थोर व्यक्तींच्या तोंडचीं चागलीं वचनं उतरवून घेतलीं व त्यांचा अभ्यास केला. या गोष्टीचा तिच्या मनावर फार परिणाम झाला.

तसंच निरनिराळ्या ठिकाणच्या शाळांना व अनाथालयांना भेटी दिल्या. तिनं एका गरीब व अनाथ मुलीच्या शिक्षणाचा खर्च देण्याचं ठरवलं. तेथल्या मुख्य शिक्षकिणीची व तिची चांगली ओळख झाली. तिच्याकडून संस्था कशा चालल्या जातात व त्यांचे नियम कोणते असतात याचाहि अभ्यास तिनं केला होता

सिड्ने हर्बर्टकडे नवीन कल्पना नेहमीं तिला मिळत. खेडयांत हॉस्पिटलं कशीं असावींत यावरहि त्याच्याकडे पूर्ण माहिती तिला मिळे. बाहेरचे देश पाहून ती म्हणे, " इंग्लंडमध्यें चैनीचं प्रमाण फार वाढलं तसं दारिद्र्याचीं मुळं खोलपर्यंत गेलीं आहेत. आपण चैनींत राहण्यापेक्षां देशांतील दारिद्र्य दूर करणं हें आपलं कर्तव्य आहे. "

## कैसरस्वर्थ

इ. स १८५१ च्या जुलैमध्यें फ्लॉरेन्सची आई व बहीण हवापालट करण्यासाठीं रोमला गेल्या असतां तेवढ्या मुदतींत फ्लॉरेन्स कैसरस्वर्थला जाऊन तिनं नर्सिंगचा अभ्यास पूर्ण केला. ऑक्टोबरला ती पुन्हां आपल्या आईबरोबर लंडनला आली. " आतां मला जगण्यांत सुख काय आहे तें कळलं " असं फ्लॉरेन्स म्हणे. फ्लॉरेन्सनं आतां स्वतःच्या जबाबदारीवर जगायचं ठरवलं. फ्लॉरेन्सनं दुसऱ्यांच्या उपयोगीं पडण्याचा नवीन उद्योग स्त्रियांना दाखवून दिला. या कामांत केवढं महत्त्व असतं तें तिनं आपल्या आचरणानं सिद्ध केलं.

तिनं पॅरिसमध्यें इ. स. १८५३ ते ५४ पर्यंतच्या काळांत हॉस्पिटलमध्यें काम केलं. तेथें बायका-मुलांसाठीं वेगळं हॉस्पिटल होतं. ती तेथें एक खोली घेऊन राहिली होती. तेथील सिस्टर्स-बरोबर ती गरीब व अनाथ मुलांनाहि पाहण्यास जाई.

हॉस्पिटलची व्यवस्था, नर्सेसच्या कामाची आंखणी व व्यवस्था, यांचा ती अभ्यास करी. आंकडेवार माहिती गोळा करण्याचा उद्योग तिनं लावून घेतला होता.

फ्लॉरेन्स रोग्यांची शुश्रूषा मन लावून करी. तिचं बोलणंहि मृदु होतं. त्यामुळें बरं झाल्यावर तिला कुणी ' आई ' अगर प्रिय मैत्रीण म्हणून समजून तिला पत्र पाठवीत.

फ्लॉरेन्सला आतां वडिलांनीं वर्षाचे वेगळे पैसे देण्याचं ठरवलं होतं. पण अद्याप तिनं ही नोकरी म्हणून करावी याला आई-वडिलांची पूर्ण संमति नव्हती.

इ. स. १८५४ मध्यें सुट्टी घेऊन ती लंडनला गेली. त्या वेळीं तेथें कॉलऱ्याची सांथ आली होती. फ्लॉरेन्सनं सांथ कमी होईपर्यंत रोग्यांची शुश्रूषा केली. " किंग्ज कॉलेज हॉस्पिटल 'मध्यें नार्सिंगचा अभ्यास शिकविण्याची नवी सोय झाली. त्यावर धर्माचं बंधन नव्हतं. कुणीहि तो धंदा शिकावा असं होतं. त्यावर सुपरिंटेंडंट म्हणून इ. स. १८५४ मध्यें फ्लॉरेन्सची नेमणूक झाली. तिच्या हाताखालीं तयार झालेल्या नर्सेस शेतकऱ्यांच्या मुली होत्या.

## क्रिमियन युद्ध १८५४–५६

क्रिमिआ येथें फ्रेंच व इंग्लिश लोक रशियनांच्या विरुद्ध लढत होते. फार मोठया प्रमाणांत युद्ध झालं. रशियनांना तोंड देऊन जय मिळवायचा म्हणजे साधी गोष्ट नव्हती. त्यासाठीं अनेक लोकांना बळी जायला लागलं. आपल्या देशासाठीं बरेच शिपाई युद्धांत पडले व अनेक शिपाई जखमी झाले. कित्येकांचे पाय, तर कित्येकांचे हात, ऑपरेशन करून काढावे लागले. जखमी लोकांची संख्या वाढत गेली. त्यांची व्यवस्था करणं सरकारला जरुरिचं झालं.

तुर्कस्तानांत जिथं शिपाई रहात, तिथं त्यांना प्रथम ठेवण्यांत

आलं. परंतु शेंकडों जखमी शिपाई घेऊन बोटी भरून येऊं लागल्या. त्यांना कुठं ठेवावं हा प्रश्न होता व त्यांच्या शुश्रुषेसाठीं डॉक्टर्स नी नर्सेसची अत्यंत जरुरी भासूं लागली. सर्व लोकांच्या तोंडीं त्या वेळीं हाच विषय होता. वर्तमानपत्रांतून लोकांच्या गैरसोयीवर बरेच लेख लिहिण्यांत आले. सरकारला तांबडतोब व्यवस्था लावणं अत्यंत जरूरचिं झालं.

युद्धमंडळावर सिडने हर्बर्ट चिटणीस म्हणून काम करीत होता. त्यानीं अकरा ऑक्टोबरला फ्लॉरेन्सकडे, तिच्या हॉस्पिटल-मधील चांगल्या लायक नर्सेसची मागणी केली. फ्लॉरेन्सला स्वत:लाच जावंसं वाटूं लागलं. साध्या हॉस्पिटलपेक्षां लष्करी हॉस्पिटलामध्यें काम करणं जास्त जबाबदारीचं व फार श्रमाचं होतं. "ईश्वरानचं आपल्याला संधी आणून दिली आहे," असं फ्लॉरेन्स मनांत समजूं लागली.



फ्लॉरेन्स नायटिंगेल

सिडने हर्बर्टला फ्लॉरेन्ससारखी व्यवस्था करण्यास व देखरेख ठेवण्यास योग्य बाई मिळाली म्हणून बरं झालं. त्याला नर्सेसना युद्धाची ही कामगिरी बजावण्याच्या कामगिरीवर पाठविण्याची नवीन योजना काढायची होती. तिचं ज्ञान, तिचा स्वभाव, तिच्यांतील काम

करण्याची धमक व धाडस वाखाणण्यासारखीच होती. तेव्हां तिच्या हाताखालीं कांहीं नर्सेसना देऊन युद्धाच्या क्षेत्रांत पाठवावी असं सिडने हर्बर्टला वाटलं. त्याप्रमाणं तिला त्यानं विचारलंहि. इंग्लिश सरकारतर्फे ही मागणी होती. तिच्याबरोबर मिस्टर व मिसेस ब्रेसब्रिज हीं दोघेही जायचीं होतीं. न्यूकॅसलचा ड्यूक त्या युद्ध-मंडळाचा सेक्रेटरी होता. त्याचं फ्लॉरेन्सला पत्र आलं. त्यांत तिनं तुर्कस्तानांतील स्कुटरी गांवी असलेल्या हॉस्पिटलमध्यें सर्व नर्सेस-वरील मुख्य म्हणून काम करावं व तिला कोणत्या कचेरीशी पत्रव्यवहार करून माहिती मिळवावी लागेल तें सर्व त्या पत्रांत लिहिलेलं होतं. देशाच्या कामासाठीं फ्लॉरेन्स ता. २१ ऑक्टोबरला वीस नर्सेस बरोबर घेऊन निघाली.

जाण्यापूर्वी सिड्ने हर्बर्टनं त्या सर्व नर्सेसना बोलावून निरोप देतांना उत्साहवर्धक भाषण केलं. फ्लॉरेन्स अगदीं गंभीर व शांतवृत्तीची होती. निघण्यापूर्वी तिला कित्येकांनीं पत्रं पाठविलीं होतीं. तीं पत्र तिनं शेवटपर्यंत जपून ठेवलीं होतीं.

## इंग्लंड सोडलं

फ्लॉरेन्सला जातांना पॅरिस व मार्सेल्सला जावं लागलं. तिच्या-बरोबर फ्रेंच व इंग्लिश नर्सेस होत्या. ही मंडळी देशाची उत्तम कामगिरी बजावण्यासाठीं चालली आहेत या भावनेनं लोकांनीं त्यांना फार मानानं वागवलं. कांहीं कोळणींनीं त्यांचं सामान वाहून नेलं परंतु त्याबद्दल त्यांच्याकडून पैसे घेतले नाहींत. ज्या हॉटेलांत तीं राहिलीं तेथें त्यांच्या राहण्याची व जेवणाची उत्तम सोय करण्यांत आली. त्यांच्याकडून पैसे घेतले नाहींत. त्यांच्या खोल्या साफ

करणाऱ्या बायांनीं अगर त्यांना वाढणारे वाढपी यांनींहि त्यांच्या-कडून पैसे घेण्याचं नाकारलं. येवढंच नाहीं तर रेल्वेमधून पाठविलेल्या अधिक सामानाबद्दलहि पैसे घेण्यांत आले नाहींत. तारीख २७ ऑक्टोबरला फ्लॉरेन्सनं मार्सेल्स सोडलं. धक्क्यावर बऱ्याच फ्रेंच व इंग्लिश लोकांनीं त्या सर्वांना मोठ्या प्रेमानं व कृतज्ञतेनं निरोप दिला.

## स्कुटरी हॉस्पिटल

स्कुटरीच्या हॉस्पिटलमध्यें पोहोंचल्यावर फ्लॉरेन्सनं आपलं काम नीट व व्यवस्थित बजावलं. इंग्लंडमध्यें "नायटिंगेल फंड" उभारण्यांत आला. ते पैसे फ्लॉरेन्सकडे पाठविण्यांत आले. कांहीं लोक फ्लॉरेन्सकडे देणग्या पाठवूं लागले. तिचे वडील फ्लॉरेन्सला वर्षाला पांचशें पौंड पाठवीत असत. ते सर्व पैसे फ्लॉरेन्स जखमी शिपायांची व्यवस्था राखण्यांत खर्च करी. हॉस्पिटलमध्यें स्वच्छता राखण्यासाठीं जमिनी घासून धुण्यापासून त्या सर्वांनीं कामं केलीं. फ्लॉरेन्सला तेथील चार हॉस्पिटलांवर देखरेख करावी लागे. त्यासाठीं तिला कधीं चालत जावं लागे.

स्कुटरी हॉस्पिटलमध्यें चारशें जखमी शिपाई येणार होते. त्या सर्वांची तिला व्यवस्था लावायची होती. कित्येक शिपाई गैर-व्यवस्थेमुळं रस्त्यांतच मरत. त्यांच्याजवळ कांहींहि नसे. त्यांतून कॉलऱ्यापासून आजार सुरू झाला म्हणजे तर मृत्युसंख्या वाढे नी अशा स्थितींत जगलेले शिपाई हॉस्पिटलांत येत. कित्येकदां तेथें 'टायफॉईड' नं शिपाई मरत. प्रथम तर त्यांना धड पलंगहि नसायचे ! अंथरण्यास अगदीं जाड चादरी असायच्या. जमिनीवरच त्यांना मामुली बिछान्यावर निजावें लागे. अशा शेंकडों गांजलेल्या

जिवांची एकदम व्यवस्था फ्लॉरेन्सला लावायची होती. सुरवातीला पुरेसें औषध, कपडे अगर ऑपरेशन करण्यास योग्य साहित्य नसायचं. त्या आजारी लोकांना खाण्यास देण्यास पुरेसा सांठा केलेला नव्हता. या सर्व बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष पुरवून स्वच्छता व व्यवस्था करण्याचं मोठं काम फ्लॉरेन्सवर सोंपविलं होतं. येवढंच नाहीं तर नर्सेसवर देखरेख व शिस्त राखायची होती. तिला योग्य नर्सेसची निवडहि करायची होती. आशू, हें काम कांहीं थोडं नव्हतं. त्यांतून उंदरांचा व अनेक जीवजंतूंचा त्रास असायचा. फ्लॉरेन्सला राहायला एक साधी खोली व खाण्यास साधं जेवण मिळे या सर्व गैरसोयींतून फ्लॉरेन्स मार्ग काढीत होती, कारण तिला ईश्वरानं नेमून दिलेलं काम करायचं होतं.

त्या हॉस्पिटलांत एकंदर दोन हजार चारशें चौतीस रोगी ठेवले होते. दुसऱ्या हॉस्पिटलमध्यें गेली असतां फ्लॉरेन्स अर्ध्या तासाच्या रस्त्यावर असलेल्या आपल्या खोलींत दिवा लावण्यासाठीं, अंधार पडल्यावर चालत एकटीच जाई.

सिडने हर्बर्टच्या हातांत त्या वेळीं मोठा अधिकार होता. फ्लॉरेन्सनं त्याला पत्र लिहून बऱ्याच वस्तू मागून घेतल्या. तिला आणखी नर्सेसची जरूरी वाटत होती, त्याहि पाठविण्यांत आल्या. जखम बांधण्याच्या पट्ट्या, औषधं, टॉवेल्स, साबण, जमीन घासण्याचे ब्रश, झाडू, चादरी, शर्ट्स्, साबुदाणा, आरारूट, ऑपरेशन करतांना लागणारा पडदा, अशा अनेक उपयुक्त वस्तूंचा सांठा, फ्लॉरेन्सनं तावडतोब केला.

फ्लॉरेन्सनं हॉस्पिटलांत बरीच सुव्यवस्था राखली. स्वयंपाक-घरांतहि नवीन सुधारणा तिनं केल्या. फ्लॉरेन्सची प्रत्यक्ष देखरेख

सर्व बारीक गोष्टींवरहि असे. तेथील एकही काम तिला विचारल्या-शिवाय होत नसे. तिचा पत्रव्यवहारहि वाढला. मिस्टर व मिसेस ब्रेसब्रिज, तिची पत्रं लिहिण्यांत मदत करूं लागले. तरीसुद्धां ती शांतपणानं सर्वांशीं बोले व प्रत्येक आजारी माणसाची प्रेमानं चौकशी करी. कधींहि ती मोठ्यानं चिडून बोलत नसे.

हळूं हळूं जखमी शिपायांची संख्या हजारांनीं वाढूं लागली. चार हजार लोकांची व्यवस्था चाळीस नर्सेस पाहूं शकतील, पंण आणखी जर ही संख्या वाढली तर काय करावं हा तिच्यापुढं प्रश्न उभा राहिला.

ऑपरेशनच्या वेळेला फ्लॉरेन्स स्वतः रोग्याजवळ उंभी राही. कुणाचा पाय तोडावा लागे तर कुणाचा हात काढून टाकावा लागे. रांगच्या रांग अशा लोकांची लागे. भेदरलेल्या मनानं ऑपरेशनच्या टेबलावर आलेल्या शिपायांना फ्लॉरेन्सला जवळ पाहून, एक प्रकारचा धीर येई.

बरं होण्यास अत्यंत कठिण असलेल्या रोगी लोकांजवळ फ्लॉरेन्स स्वतः बसे. जमिनीवर लांकडांच्या फळ्यांवर बिछाने टाकलेले असत. दोन बिछान्यांमध्यें अठरा इंचाची जागा रिकामी असे. एकंदर असे बिछाने चार मैल लांबपर्यंत पसरलेले होते.

फ्लॉरेन्स जेव्हा त्यांना पाहण्यास जाई तेव्हां एकहि उसासा अगर एखाद्याचांहि कण्हणं तिच्या कानावर येत नसे. इतकी शांतता व एवढी चांगली शिस्त तेथें राखली जात होती. कधीं तरी " मला माझ्या घरचं स्वप्न पडलं " असं कुणी सांगत. कित्येक शिपाई कसलीहि कुरकुर न करतां अगर कोणताहि शब्द न उच्चारतां

मृत्यूला कवटाळतांना पाहून फ्लॉरेन्स म्हणे, " हे खरे आमचे शूर शिपाई ! किती थोर अंतःकरण असलं पाहिजे ! "

फ्लॉरेन्सनं कित्येक तळमळणाऱ्या जीवांना पाहिलं होतं. त्यांना शक्यतों मदत करण्याचा ती प्रयत्न करी व त्यांचा रक्तस्राव बंद करण्याचा आटोकाट प्रयत्न करी. पण कित्येकांचा अंत होतांना, तिनं डोळ्यानं पाहिला होता. त्यांच्या भावना तिला बरोबर समजल्या होत्या. त्यांची पुरण्याची व्यवस्था तेथेंच समुद्रकांठावर केलेली होती.

फ्लॉरेन्सचं काम पाहून कोणालाहि तिच्याबद्दल आदर उत्पन्न होई. तिच्या तोंडांतून शब्द बाहेर पडण्याचा अवकाश कीं तें काम ताबडतोब अमलांत येई. तिची कीर्ति वाढत जात आहे असं पाहून तिच्या कांहीं अधिकारी लोकांना तिचा द्वेष वाटूं लागला. तिच्याहि कामांत व्यत्यय आणण्याचा कांहीं कमी प्रयत्न झाला नव्हता ! परंतु त्या सर्व अडचणी तिनं आपल्या कर्तबगारीनं दूर केल्या.

हॉस्पिटलमध्यें सुधारणा कोणत्या पाहिजेत व तेथें कोणते नियम अमलांत आणणं जरुरीचं आहे तें फ्लॉरेन्सनं हर्बर्टकडे लिहून पाठवलं. त्या सूचनांचा सरकारला फार उपयोग झाला. तिचं आणखी महत्त्व वाढलं. राणी व्हिटोरियालाहि फ्लॉरेन्सच्या कामगिरीबद्दल कौतुक वाटलं. लोकांचं मन तर तिनं केव्हांच जिंकलं होतं ! स्कुटरींतील शिपायांच्या बायका-मुलांना मदत करण्यासाठीं तिनं फंड उभारला व त्यांच्या शिक्षणासाठीं एका बाईची नेमणूक केली.

नुसतं चर्च बांधण्यापेक्षां व निर्जीव गोष्टींची व्यवस्था करण्यांत ईश्वराची सेवा नाहीं तर दुःखी माणसांचं दुःख हलकं करणं हीच

ईश्वराची खरी सेवा आहे. या एका उच्च भावनेनं ती काम करीत होती नी म्हणूनच ती तें काम मन लावून करी. दुसऱ्या नर्सेसना ती आदर्श वाटे.

फ्लॉरेन्सजवळ पन्नास हजार शर्टांची तरतूद केलेली होती. ऑफिसमधून जर कपडे त्यांना कधीं मिळाले नाहींत तर ती स्वतः शिपायांना पुरवी. काम करण्यास नोकर-माणसांचा तुटवडा असला तर ती स्वतः आपल्या खर्चानं लोक ठेवून आजारी लोकांची कोणत्याहि प्रकारें गैरसोय होऊं देत नसे. कधीं कधीं अधिकारी वर्गाकडून हेळसांड झालेली तिला आढळे. एकदां, थंडी खूप पडली होती. खोल्या थंड झाल्यामुळं आजारी लोकांना फार थंडी वाजूं लागली. त्या दिवशीं खोल्या गरम करण्यासाठीं लांकडाची जरूरी वाटली. पण ठराविक लांकडापेक्षां जास्त लांकूड वापरायचं नाहीं असं सभेंत ठरलं होतं. त्या सभेंत या थंडीचा विचार झालेला नव्हता. तेव्हां लांकूड मिळेना. आतां सभेची दुसरी बैठक थंडी संपल्यावर होणार होती. तेव्हां तोंपर्यंत आजारी लोकांना मरूं द्यायचं कीं काय ? फ्लॉरेन्सनं ताबडतोब आपल्या खर्चानं लांकूड आणून आजारी लोकांची सोय केली. कोणत्या वेळीं कशाची जरूरी आहे हें ती लगेच ठरवून त्याप्रमाणं वागे. सत्ता चालविण्याची कला व धोरण तिच्यांत मुबलक होतं. तिची लायकी पाहून प्रत्यक्ष राणी व्हिक्टोरियानं तिच्यावर पूर्ण विश्वास टाकला होता. शिवाय तिला आणखी वाटेल त्या वस्तू पुरविण्यांत येऊं लागल्या. मग सुधारणा होण्यास वेळ लागला नाहीं.

× × ×

# देवदूत

फ्लॉरेन्स सतत आठ तास उभं राहून काम करी. एकदां तर सतत वीस तास विश्रांती न घेतां तिनं काम केलं.

कॉलऱ्यानं मरणाऱ्या माणसांजवळ, फ्लॉरेन्स शेवटपर्यंत राही. त्यांना बरं वाटावं म्हणून या कुशीवरून त्या कुशीवर, अगदीं हलक्या हातानं त्यांना फिरवी. शेवटपर्यंत त्यांना जरा शक्ति वाटावी म्हणून कांहीं तरी आणून पाजी. अखेरच्या वेळेला ती त्यांच्याजवळ बसे. रात्रींहि अशा शिपायांजवळ बसून त्यांना उपचार करून वांचविण्याचा प्रयत्न करी.

कधीं कधीं जखम दाखविण्यास लाजत असणाऱ्या शिपायांना ती मोठ्या सहानुभूतीनं म्हणे, "जखमेची लाज वाटायला कशाला हवी आहे बाबा?" तिच्या मृदु भाषणानं व वागण्यानं आजारी माणसाच्या हृदयांत कृतज्ञता, आपुलकी, प्रेम इत्यादि भावनांची पकड चटकन बसे; नी मग तिचं हृदय कांहीं असामान्य स्वर्गीय गुणांनीं भरलं आहे अशी त्यांची तिच्याविषयीं खात्री होई.

रात्रीं हातांत कंदील घेऊन, त्या आजारी शिपायांच्या बिछान्याच्या रांगेमधून, सर्व कांहीं सुरळीत चाललं आहे कीं नाहीं तें पाही. हळूंच पाय न वाजवतां, कंदील खालीं ठेवून, कांहीं शिपायांना त्रास तर होत नाहीं ना हें पाहण्यासाठीं त्यांच्याकडे ती वांकून पाही. त्या वेळीं तिच्यांत आईची कर्तव्यदक्षता व कोमल भावना जागृत होत्या असं वाटे.

एका शिपायानं लिहिलेलं पत्र होतं, "फ्लॉरेन्स आम्हांला देवदूता-सारखी वाटते. तिच्याकडे नुसतं पाहिल्यानं आम्हांला निजल्या-

निजल्या, एका प्रकारचं समाधान वाटतं.....आमचं दुखणं आम्ही तात्पुरतं विसरतों नी जेव्हां ती बारीक शांतवृत्तीची मूर्ति आमच्या-मधून फिरते, तेव्हां आमच्यांत ती धैर्य देते. तिच्याकडे गांजलेले व दमलेले डोळे लागतात तेव्हां तर निराशेला मागं सारून त्यांचे चेहेरे कृतज्ञतेनं विरघळून गेलेले दिसतात. रात्रीं जिकडे तिकडे सामसूम होते व प्रत्येक अधिकारी व डॉक्टर जेव्हां आपल्या अंथरुणांत निर्धास्तपणें झोपा काढीत असतात त्या वेळीं हातांत कंदील घेऊन फ्लॉरेन्स मैलभर पसरलेल्या बिछान्यांच्या बाजूनं एकटी फिरत असते.

तिला त्या वेळीं पाहून आम्हांला किती बरं वाटतं म्हणून सांगूं! एखाद्याशीं एखादा शब्द, दुसऱ्याला हसत मान हालवून व कित्येकां-कडे नुसतं हासत पाहून आम्हांला ती आनंद देते. आम्ही शेंकडों शिपाई अंथरुणांवर पडलेले असतों. कुणाकुणाकडे ती लक्ष पुरवणार? मग आम्ही तिच्या पडणाऱ्या सांवलीचाच प्रेमानं निरोप घेऊन मोठ्या समाधानानं उशींत डोकं खुपसून झोंपीं जातों. ती येण्यापूर्वीं मन त्रासलेलं सांपडे, पण ती येऊन गेल्यावर आमच्या खोलींत एखाद्या चर्चेचं पवित्र वातावरण पसरल्यासारखं आम्हांला वाटे."

कांहीं शिपायांना वाटे कीं व्हिक्टोरिया राणीनंतर फ्लॉरेन्स-लाच आपल्या देशाची राणी करतील तर बरं होईल!

कित्येक मरणाऱ्या शिपायांजवळ बसून त्याचा शेवटचा निरोप घरीं काय पाठवायचा तो ती लिहून घेई, व त्याप्रमाणं ती त्यांच्या बायका-मुलांना पत्र पाठविण्यास मुळींच कुचराई करीत नसे.

## क्रिमियामधील भयंकर आजार

फ्लॉरेन्स एकदां क्रिमियामधील हॉस्पिटल कसं चाललं आहे तें पाहण्यास गेली. पण तेथें ती तेथील भयंकर आजारांनीं आजारी पडली. ती फारच अशक्त झाली होती. तिला पूर्ण विश्रांतीची अत्यंत जरुरी होती म्हणून तिला बोटीनं आणण्यांत आलं. तिला ' कासल ' हॉस्पिटलमध्यें ठेवण्यांत येणार होतं. तिला ' स्ट्रेचर '-वर घालून नेण्यांत आलं. तिनं ज्यांची तब्येत संभाळून बरं केलं होतं त्या शिपायांनीं स्वखुषीनं तिला उचलण्यास मिळेल तर फार बरं होईल, या आशेनं आपल्यालाहि तिची सेवा करतां आली तर पहावं याहि हेतूनं कित्येक शिपायांची गर्दी बंदरावर झाली होती.

फ्लॉरेन्स तिथं विश्रांती घेत असतां तिला भेटण्याची व तिची सेवा करण्याची धडपड करणारे शिपाई तिला पाहण्यास येत. परंतु त्यांना आंत जाण्याची परवानगी नव्हती. फ्लॉरेन्स या आजारांत मरतां मरतां वांचली. ही बातमी इंग्लंडला पोहोंचली. सर्वांनाच तिची काळजी वाटली. लॉर्ड रेगन, घोड्यावरून अनेक मैलांचा रस्ता काटीत तिला भेटण्यास आला, तेथील नर्स आंत जाऊं देईना तेव्हां तो तिला म्हणाला,"मी एक शिपाई आहे. पुष्कळ दूर घोड्यावरून मुद्दाम फ्लॉरेन्सला भेटण्यास आलों आहे. कृपा करून तिची तब्येत कशी आहे तेवढंच मला पाहूं द्या. शिवाय मला ती चांगली ओळखते." लॉर्ड रेगनला आंत जाण्यास मिळालं खरं, पण तो आजारच फार संसर्गजन्य होता. एका महिन्यानंतर त्याच आजारानं त्याचा अंत झाला.

फ्लॉरेन्सला पूर्ण बरं होण्यास वेळ लागला. नंतर बरी झाल्यावर

ती स्कुटरी हॉस्पिटलांत पुन: काम करूं लागली. ती तेथें शेवटपर्यंत राहिली. तेथलं सर्व काम संपल्यानंतर सर्वांत शेवटल्या बोटीनं इ. स. १८५६ च्या ८ जुलै रोजीं, ती घरीं जाण्यास निघाली. दु:ख व कष्ट उचलण्याचं सामर्थ्य पुरुषांप्रमाणं बायकांतही आहे हें तिनं सिद्ध केलं.

× × ×

## घर गांठलं

इंग्लंडमध्यें वर्तमानपत्रांत व कवितेंत तिचीच स्तुति होऊं लागली. तिला बरं करण्यासाठीं, खेडयाखेडयांतून शिपाई, विधवा स्त्रिया व पोरकीं मुलं प्रार्थना करीत असतां, देवाला आळवूं लागलीं.

फ्लॉरेन्स जेव्हां परत लंडनला आली तेव्हां तिचं स्वागत मोठया-थाटानं करण्यांत आलं. तिची तब्येत अजून पूर्ण बरी झाली नव्हती, तिला विश्रांती घ्यावी लागली. पण तिच्या मदतीनं सिडने हर्बर्टनं अत्यंत उपयुक्त असा अहवाल लिहून तयार केला. त्या दोघांच्या श्रमानं आज हॉस्पिटलांमध्यें एवढी सुधारणा झालेली दिसते. त्यांच्याच कामगिरीनं आज उत्तम नर्सेस तयार होऊं लागल्या व आरोग्याच्या कल्पना येवढया व्यवस्थित स्वरूपांत, अमलांत येऊं लागल्या. याचं सर्व श्रेय सिडने हर्बर्ट व फ्लॉरेन्स नायटिंगेलला आहे.

इ. स. १८५८ मध्यें अतिशय ताण पडून सिडने हर्बर्ट मृत्यु पावला. त्याचं राहिलेलं लेखनाचं कार्य फ्लॉरेन्सनं संपविलं.

इ. स. १८५८ ते ६१ पर्यंत तिनं अनेक सुधारणा व सूचना सुचविल्या. पुढचं तिचं बरंच आयुष्य खोलींत राहून वाचन व

लेखन करण्यांत गेलं. हिंदुस्थानांतही हॉस्पिटलं कशीं असावींत व येथेंहि चांगल्या नर्सेस तयार कशा कराव्यात यावर तिच्या सूचना घेतल्या गेल्या.

इ. स. १८०४ ते १९१० पर्यंत म्हातारपणानं तिचं लेखन, वाचन नी पत्रव्यवहार करणं मंदावलं. वरंच आयुष्य घालवलं! तिला पुढं दिसेनासं झालं. तिच्या नाजूक तब्येतीमुळं खोलींतच आपलं जवळजवळ ५३ वर्षं तिनं अशा तऱ्हेचं जीवन कंठलं. तिच्या खोलींत एक पलंग, आरामखुर्ची, दिवा, फूलदान व पुस्तकं असत. शेवटपर्यंत युद्धावर जाणाऱ्या शिपायांची व्यवस्था नीट व्हावी यासाठीं ती झटली. तिच्या नांवानं लंडनमध्यें हॉस्पिटल उघडण्यांत आलं व तिचा त्यासमोर पुतळा उभारण्यांत आला आहे.

इ. स. १९१० मध्यें ९० वर्षांची होऊन ती वारली. क्रिमियन युद्धांत बजावलेल्या तिच्या कामगिरीबद्दल इंग्लंडच्या लोकांनीं तिला आपल्या अंतःकरणांत स्थान दिलं आहे.

◆◆◆

## गोष्ट ४ थी

# मीना व जिम्या

"आश्लेषा, चल. आज आपण त्या पलीकडल्या शेतांत फिरायला जाऊं या."

"भो ! भो ! भो !"

अरे बापरे ! त्याच शेतांतून भुंकण्याचा आवाज येत आहे ! ती पहा, ती रोड कुत्री कशी भुंकत आपल्या शेताची राखण करीत आहे ! घाबरूं नकोस. ये अशी माझ्यापाठोपाठ. कांहीं करणार नाहीं ती ! राखण करायला फार चांगली दिसते. हीं पाहिलींस का तिचीं किती छान गोजिरवाणीं पिलं आहेत ! एक-दोन–तीन–चार–पांच–सहा–सात नी आठ ! हें पाहिलंस का त्यांचं घर ! कशी छान निवाऱ्याची जागा जमिनींतच शोधून काढली आहे ! अगदीं छोटासा बोगदाच तयार केला आहे !

या कुत्रीचं नांव मीना. ही लहान असतांना ती तिच्या पहिल्या मालकाकडे वाढली. तिचा जन्म त्या मालकाकडेच झाला होता. ती त्या वेळीं चांगली सशक्त व निरोगी दिसायची. तिला पिण्यास दूध, खाण्यास मटन-पाव व निजण्यास मऊशी गादी होती.

मीनाचे थोडे दिवस मजेंत गेले. कांहीं दिवसांनीं तिच्या मालकाला 'पेकिनीज्' कुत्र्याची आवड उत्पन्न झाली. या जातीचा कुत्रा चांगला केसाळ पण नकटा असतो. या नवीन कुत्र्याचं नांव 'जिम्या.'

सुभाषचंद्र बोस

पहिल्या मालकानं मीनाला सोडल्यावर ती शेतांत रहायला गेली. तिनं आपलं घर जमिनींतच तयार केलं. शेतकऱ्याची न्याहारी चाले तेव्हां तिला भाकरीचा तुकडा मिळे व ती आपल्या नव्या मालकाच्या शेताची राखण करून मर्जी संपादन करी. कांहीं दिवसांनीं तिला आठ पिलंहि झालीं. मीना आतां बारीक होऊं लागली. जिम्या मात्र चांगला दिसूं लागला. मीनाचा चांगला वांटा जिम्याला मिळायला लागला ना!

दिवसामागून दिवस गेले. मीनाचीं पिलं हळूंहळूं चालूं लागलीं. अंधारांत चुकून शेताजवळच्या विहिरींत पडून रोज एक एक कमी होऊं लागलं. त्यांच्यांतला 'टेडी' मात्र मोठा होऊं लागला. फार तिखट स्वभावाचा व अत्यंत वंडखोर वृत्तीचा होता तो!

एकदां फिरत फिरत जिम्याचा मालक, त्या शेतांत, जिम्याला घेऊन आला. टेडीनं त्याचा चांगला चावा घेतला. जिम्या नाजूक असल्यामुळें, तो त्यांतून वांचला नाहीं. मालकाला वाटलं आपली इमानी मीनाच बरी. गांवापासून दूर रहात असल्यामुळें, त्याला चोरांपासून संरक्षण करण्यास मीनाचाच अधिक उपयोग होता. तिलाहि तिच्या पहिल्या मालकाबद्दल आपलेपणा व जिव्हाळा होताच. तिचा जन्म त्याच्याकडे झाला होता. त्या मालकानंहि तिचा आपल्या मुलीप्रमाणं सांभाळ केला होता, पण तिच्या दुर्दैवानं त्या परदेशी जिम्यानं तिच्या तोंडचा घांस हिसकावून घेतला होता.

टेडीला सोडून मात्र मीनाला जावं लागलं. आपल्या आईला सोडून, टेडीला रहावं लागलं खरं, पण टेडीनं न्याय दिला!

× × ×

# सुभाषचंद्र बोस

आश्लेषा, तुला आज बारावं वर्ष लागलं. आज तुझा वाढदिवस, म्हणून तुझ्यासाठीं हीं फुलं मुद्दाम आणलीं आहेत. गोष्टींच्या रूपानं सात तऱ्हेचीं फुलं तुला दिलीं आहेत. प्रत्येक फुलांत कांहीं ना कांहीं आकर्षकता असतेच !

प्रथम हें 'एड्ल्वाईज' फूल घे. स्वित्झलँडमध्यें खडकाळ भागांत हीं फुलं सांपडतात. फारच प्रयास पडतो हीं हातीं यायला ! रंगानं पांढरीं असतात तीं ! सृष्टीला जसं फुलांनीं सौंदर्य येतं तसं वर्तनांतलं सौंदर्य थोर लोकांच्या गुणांनीं येतं.



सुभाषचंद्र बोस

आशू, आज तुला मी सुभाषचंद्र बोस यांची गोष्ट सांगतें. 'एड्ल्वाईज' फुलांप्रमाणें कठीण परिस्थितीच्या परतंत्र हिंदुस्थान देशांतच त्यांचा जन्म झाला होता. त्या वेळीं इंग्लिश लोकांची सत्ता येथें होती.

सुभाषबाबूंचा जन्म बंगालच्या कोडालिया गांवीं इ. स. १८९७त झाला. त्यांचे वडील रावबहादूर जानकीदास हे विद्याप्रेमी होते. त्यांची आई प्रभावतीदेवी या अत्यंत धर्मशील व परोपकारी होत्या.

## विद्यार्थीदशा

सुभाषबाबू लहानपणापासून बाणेदार, बुद्धिमान् व स्वाभिमानी होते. त्यांनीं येथील शिक्षण पुरं केल्यावर इंग्लंडला जाऊन आय्. सी. एस्. ची परीक्षा दिली. परीक्षेंत ते नेहमीं पहिल्या वर्गांत पास होत गेले.

कॉलेजमध्यें असतांना त्यांना एक युरोपियन प्रोफेसर शिकवीत असे. तो नेहमीं हिंदी विद्यार्थ्यांचा पाणउतारा करीत असे. स्वाभिमानी सुभाषबाबूंना तें सहन कसं होणार ? एकदां त्यांनीं प्रोफेसर-साहेबांच्या या वागण्याचा धडधडीत निषेध केला व त्यामुळें त्यांना कॉलेज सोडून जावं लागलं.

इंटरमध्यें असतांना त्यांनीं कॉलेज सोडलं. सद्गुरूचा शोध करीत ते पुष्कळ क्षेत्रं हिंडले. जिकडे तिकडे भोंदू लोकांचाच सुळसुळाट असल्यामुळें ते परत कलकत्त्यांत आले. आल्यावर त्यांनीं आपलं शिक्षण पुरं केलं. आय्. सी. एस्. सारखी सर्वांत मोठी पदवी मिळवूनहि त्यांनीं नोकरी केली नाहीं. त्यांनीं देशसेवाच करण्याचं ठरवलं. सुभाषबाबू किती निःस्वार्थी व बाणेदार वृत्तीचे असले पाहिजेत ! आपल्या देशाबद्दल खरी तळमळ होती त्यांना !

## त्यांचें कार्य

आश्लेषा, अशा थोर पुरुषांनीं पुढं काय केलं हें ऐकण्याची तुला उत्सुकता लागली असेल नाहीं ? खरंच, किती रोमांचकारक कथा आहे ही ! हिंदुस्थानला स्वतंत्र कसं करावं हा प्रश्न होता सुभाषबाबूंच्या पुढं. राजकारणांत पडल्यावर त्यांना गुरु भेटला. त्याचं नांव चित्तरंजन दास होतं.

तलवारीच्या जोरावरच स्वराज्य मिळेल असा त्यांना विश्वास होता. शिवाजी महाराजांची फौज होती म्हणूनच त्यांना स्वराज्य स्थापतां आलं असं त्यांना वाटे. पुढं त्यांनीं एक स्वतंत्र पक्ष तयार केला. त्यांना बरेच अनुयायी मिळाले. या त्यांच्या चळवळी स्वभावामुळें त्यांना इंग्रज सरकारनं अनेकदां कैदेंत टाकलं. कैदेंत त्यांची प्रकृति नीट राहीना, म्हणून त्यांना कलकत्त्याच्या त्यांच्या राहत्या घरींच नजरकैदेंत ठेवण्यांत आलं.

दुसऱ्या मजल्यावर त्यांची खोली होती. त्या खोलींत त्यांच्या आईवडिलांचे फोटो भिंतीवर टांगलेले होते. तिथं दोन पलंग असून एका बाजूला चौरंगावर भगवद्गीता ठेवलेली होती. जोंपर्यंत हिंदुस्थान स्वतंत्र झालेला नाहीं तोंपर्यंत कैदेंतील अगर कैदेबाहेरील जीवन त्यांना सारखंच वाटे. त्यांना स्वातंत्र्याची खरी तळमळ होती नी म्हणूनच त्या एकांतवासांत ते कधीं निराश झाले नाहींत. स्वतंत्र होण्याची धडपड मात्र त्यांची चालू होतीच !

शेवटीं शेवटीं तर दहा-बारा दिवस ते कुणासच भेटले नाहींत. त्यांच्याजवळ एक घंटा होती. ती मात्र पाहिजे तेव्हां ते वाजवीत. ती ऐकतांच दरवाजासमोर टाकलेली चिठ्ठी कुणीतरी घेऊन जात. शेवटल्या दोन दिवसांत जेव्हां घंटा वाजली नाहीं, तेव्हां मात्र लोकांना संशय आला. अखेरीस धाडस करून लोक खोलीच्या आंत शिरले. तों काय, सुभाषबाबू अदृश्य झालेले ! शिवाजीमहाराज असेच औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन, आग्र्याहून निसटून गेले होते.

नजरकैदेंत असतांना सुभाषबाबूंनीं दाढी वाढवली होती. त्यांच्या पलायनाची बातमी हां हां म्हणतां पसरली.

इ. स. १९४१ चा २७ जानेवारीचा तो दिवस होता. कुणी म्हणत ते हिमालयांत गेले असतील, परंतु खरी हकीगत वेगळीच होती.

इ. स. १९४१ मध्यें १५ जानेवारी रोजीं रात्रीं एक वाजतां, मौलवीसारखा वेष करून त्यांच्या राहत्या खोलींतून निसटून, पंजाब मेलनं ते पेशावरास पोहोंचले. हिंदुस्थानच्या बाहेर पडल्याशिवाय सुरक्षितता नाहीं असं वाटून त्यांनीं "मौलवी झियाउद्दीन" असं नांव घेऊन सरहद्द ओलांडून काबुलांत प्रवेश केला.



पठाणी वेषांत सुभाषचंद्र

रस्त्यांत त्यांना अनेक अडचणी आल्या. त्यांना कधीं कधीं मोटारींतून तर कधीं पायानं चालून प्रवास करावा लागला. या प्रसंगीं त्यांना रहमतखानानं पुष्कळ मदत केली. या अज्ञातवासांतले सुभाषबाबूंचे ते भाऊ होते. सुभाषबाबूंनीं मात्र आपण बहिरा व मुका असल्याची बेमालूम बतावणी केली. सुभाषबाबू एकदांचे काबुलांत जाऊन पोहोंचले. तिथं त्यांची कुणाशीच ओळख नसल्यामुळें एका मोटार ड्रायव्हरच्या गाडीखान्यांतील खाणावळींत ते राहिले.

तेथें असतांना अफगाण सरकारच्या पोलिसाला त्यांचा संशय आला. प्रत्येक वेळेस सुभाषबाबू त्याला पैसे देऊन गप्प बसवीत,

परंतु त्याचा ससेमिरा कायम होताच. किती धोक्यांत त्यांचा जीव असला पाहिजे? काबुलांतून एकदां आपण कसं बाहेर पडावं, हा त्यांच्यापुढं केवढा प्रश्न होता !

त्या वेळेस मोठमोठाल्या राष्ट्रांत युद्ध सुरूं होतं. इंग्रजाचे शत्रु जपान, जर्मनी, रशिया व इटली हीं राष्ट्रं होतीं. तेव्हां त्या देशांत गेल्याशिवाय सुभाषबाबूंना सुरक्षितता मिळणार नव्हती. काबुलांत तर पोलिसांचा फार त्रास होऊं लागला त्यांना. अखेरीस त्यांनीं आपला मुक्काम उत्तमचंद या गृहस्थाकडे हालविला. त्याचं तिथं रेडिओचं दुकान होतं. त्याच्याकडे एकंदर पंचेचाळीस दिवस अगदीं चोरूनच सुभाषबाबूंना रहावं लागलं. या संकटाच्या वेळेस उत्तमचंदानं केवढं धाडस दाखवलं ! सुभाषबाबूंचा धोक्यांतला जीव वांचविण्याच्या बाबतींत त्यानं केवढी कामगिरी बजावली !

येवढंच नव्हे तर काबुलांतल्या रशियन वकिलाच्या मदतीनं उत्तमचंदानं, सुभाषबाबूंना जर्मनींत व इटलींत जाण्यासाठीं पासपोर्ट मिळवून दिला. आशू, कोणत्याहि दुसऱ्या देशांत जाण्यापूर्वीं प्रत्येक प्रवाशाला सरकारी लेखी परवानगी मिळवून ठेवावी लागते. त्यालाच 'पासपोर्ट' म्हणतात.

इ. स. १९४१ च्या मार्च महिन्यांत सुभाषबाबू, इटालियन व जर्मन सरकारी अधिकाऱ्यांबरोबर विमानानं बर्लिनला पोहोंचले. ही बातमी रेडिओंतून हिंदुस्थानांतच काय पण जगभर पसरली. कारागृहवास, वनवास व अज्ञातवास भोगून अखेर हा सिंहाचा छावा इंग्लिशांच्या तावडींतून सुटला !

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं काय काय करावं हें जें त्यांनीं गेले कित्येक दिवस मनांत योजलें होतें, त्याच्या तयारीला ते लवकरच



२३७०५ दि: ..... ता: दि: ९.७/८/५८

लागले. बर्लिनला राहून त्यांनीं " आझाद हिंद " फौजेची स्थापना केली. मोठं सैन्य उभारलं ! त्यांना तेथील हिंदी जनतेचं पाठबळ हां हां म्हणतां मिळालं. हिंदुस्थानच्या पूर्वेकडून फौज घेऊन, हिंदुस्थानांतील इंग्रजांना हिंदुस्थानांतून घालवून द्यावें हा त्यांचा मुख्य प्रयत्न होता. त्यासाठींच ते पाणबुड्या बोटीनं जपानला आले. जपानची आपल्याला मदत मिळेल अशी सुभाषबाबूंना आशा होती. जपानच्या " सेनापती टोजोनं "ही त्यांना त्यांच्या कार्यासाठीं तलवार देऊन त्यांना त्यांनीं प्रोत्साहन दिलं.

सुभाषबाबूंनीं सिंगापूरलाहि " आझाद हिंद " फौजेची स्थापना केली. सुभाषबाबू ' नेताजी ' झाले. " चलो दिल्ली " अशी त्यांच्या हिंदी फौजेची घोषणा होती. " दिल्ली हस्तगत झाल्यावर स्वातंत्र्य मिळविलंच " असं त्यांचं सांगणं असे. " तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हांला स्वातंत्र्य देतों " असे उद्गार त्यांच्या जोरदार भाषणांत निघत. त्यांच्या फौजेंत हिंदु-मुसलमान तसंच स्त्रीपुरुष व बालसेना संघटित होऊन एका दिलानं कामं करीत. स्त्रियांच्या पथकाला " झांशीच्या राणीचं पथक " असं नांव देण्यांत आलं होतं.

या फौजेनं, अमेरिका व इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारलं. आपलं तिरंगी निशाणहि फडकावलं. अशा रीतीनं सुभाषबाबूंनीं अगदीं शिकस्त केली. याच सुमारास इ. स. १९४३ त त्यांच्या आई हिंदुस्थानांत निवर्तल्याची दु:खद वार्ता सुभाषबाबूंना मिळाली. मातेच्या वियोगाचं दु:ख त्यांनीं धैर्यानं सहन केलं.

ब्रह्मदेशांत आझाद हिंद फौज लढत असतांना जपानी लोकांनीं त्यांना कांहींच मदत दिली नाहीं. म्हणून या फौजेची हालचाल बंद पडली. इ. स. १९४५ च्या १६ ऑगस्ट रोजीं नेताजी रंगूनहून

बँकॉकला विमानानं जाण्यास निघाले. दुर्दैवानं त्या विमानास अपघात झाला. ही दु:खद वार्ता रेडिओवरून सर्वांना समजली.

सुभाषबाबूंच्या मृत्यूबद्दल अनेक गोष्टी येथें पसरल्या गेल्या. कोणी म्हणत, ते अद्याप जिवंत आहेत. पण त्याला कांहींच आधार नाहीं.

आश्लेषा, सुभाषबाबूंनीं 'एड्‌ल्‌वाईज' फुलांप्रमाणें कठीण खडकाळ भागांतून मार्ग काढून यशाची पांढरी ध्वजा हसत फडकावीत ठेवली नाहीं का ! त्यांच्या आयुष्यांत त्यांनीं अति कठीण कामगिरी केली व शेवटीं हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यास बरीच मदत केली. त्यांच्याच मोठ्या कार्याचं मधुर फल आपणांस चाखण्यास मिळत आहे. सुभाषबाबूंनाहि टेडीप्रमाणं मातेच्या—मातृभूमीच्या—वियोगांतच रहावं लागलं. पण त्या दोघांनींहि आपल्या आईच्या बाबतींत न्याय मिळवून दिला. केवढे थोर सुभाषबाबू नी केवढी थोर कामगिरी त्यांची !

## प्रतीक्षा

ये इथें आइ, तूं, स्वप्नीं म्यां देखिलें,
ते सुभाषबाबू येऊनची ठाकले।
" सांगतें नांव, बैसलात कीं लंघुनी;
शोधुनी काढिलें, बक्षीस द्या मज आधीं । " ॥ १ ॥
" तो खाउ नको मज, मीठाई ना बरी,
तलवार 'टोजो'ची टोंकदार साजिरी " ।
म्हणतांच आणाया गेले सिंगापुरीं
" पाहतें वाट मी येतिल केव्हां तरी ! " ॥ २ ॥

◆ ◆ ◆

## गोष्ट ५ वी


# पट्टयाचा वाघ

एकदां, आश्लेषा, बढवायच्या दाट जंगलांत एक भव्य पट्टयाचा वाघ रहात होता. चोरल नदीच्या कांठावर असलेल्या, एकांतांतील जयंतीमातेच्या देवळापर्यंत तो वाघ रोज रात्रीचा जाई. तेवढया टापूंत एखादं चुकलेलं जनावर आढळलंच, कीं त्यांनं त्याचा समाचार घेतलाच म्हणून समजावं !

तरुणपणीं त्या वाघानं किती तरी जीव घेतले. त्याला कुणाची म्हणून कुणाचीच भीति नव्हती ! आपल्या सामर्थ्याची बढाई मारावीशी अनेकदां त्याला वाटे. अभिमानाचा माज जरी त्याला चढला होता तरी तो मनानं समाधानी नव्हता, हें त्याला त्याच्या उतार वयांत कळूं लागलं.

असाच एकदां पहांटेचा तो वाघ जयंतीमातेच्या समोरील मोठ्या खडकावर त्या शांत नी गंभीर वातावणांत तल्लीन होऊन गेला होता. किती धीर व स्थिर वृत्ति होती त्याची ! मन हाहि एक आरसाच आहे. बाजूच्या वातावरणाचा परिणाम मनावर झाल्याशिवाय रहात नाहीं. अलीकडे कां कुणास ठाऊक, त्या जंगलांत, संध्याकाळच्या चुकून राहिलेल्या गायी अगर शेळ्या, पहांटेच्या आपल्या घरीं सुखरूपपणें परततांना आढळत.

आशू, जयंतीमातेनंच त्या वाघाला समाधान मिळविण्याचा मार्ग दाखविला होता. हाच देवीचा प्रसाद होता. एकदां ती त्याला म्हणाली, " तूं रोज हिंसा करतोस नी अनेक क्रूर कृत्यं करतोस. तुझ्या तांवडींतून एकहि जीव सुटत नाहीं. तसं सिंहाचं नसतं.



त्याचं पोट भरलं म्हणजे तो समाधानांत असतो. म्हणूनच त्याला जंगलाचा राजा म्हणतात. त्याच्यांत मनाचं औदार्य आहे. तुला मनाचं समाधान हवं असेल तर दुसऱ्याचं प्रेम संपादन कर. दुसऱ्यावर दया दाखवून व दुसऱ्याचा विश्वास संपादन करून प्रेम मिळतं. फुलांकडे पहा. त्यांच्यांत स्निग्धता आहे, मध आहे, प्रेम आहे म्हणून त्यांच्यावर समाधानाची टवटवी असते. फुलांच्यात केवढी प्रचंड शक्ति असते ! फूल पाहतांच माणसाच्या कोमल भावना उचंबळून येतात. त्यांतील ' माणूस ' जागा होतो. तुझ्यांतील प्रेमळ वृत्ति जागृत झाली तर तुला पाहूनहि माणसाच्या कोमल भावना जाग्या होतील. "

एकदां एक राजा बढवायच्या जंगलांत शिकारीस गेला. त्याला शिकारीचा फार नाद होता. बढवायच्या शिकारी लोकांनीं त्या राजाला त्या वाघाची माहिती पुरवली होती. त्या वाघाच्या वृत्तींत असा बदल कां झाला असावा याचं राजाला आश्चर्य वाटलं.

पहाटेचा वेळ होता. राजानं आपली बंदूक सज्ज करून दुरूनच जयंतीमातेच्या खडकावर बसलेल्या त्या साधुवृत्तीच्या वाघाला एकदां नीट पाहिलं. राजा मनांत म्हणाला, " अशा साधुवृत्तीच्या वाघाला मारण्यांत काय पुरुषार्थ आहे ? "

राजाच्या क्रूरवृत्तीला चालना देणारी क्रूरवृत्ति त्या वाघांत कुठं होती ? पुढं तो राजा तसाच परत निघून गेला नी एका घोर कृत्यापासून सर्वांचाच बचाव झाला.

× × ×

काऊंट लिओ टॉलस्टॉय

# • काऊंट लिओ टॉलस्टॉय


आश्लेषा, तुला एका रशियामधील साधुपुरुषाची ओळख करून देतें. त्याचं नांव " लिओ टॉलस्टॉय." दाढी वाढवून इतक्या म्हातारपणीं हातांत काठी घेऊन एकापुढें एक डोंगर पालथे घालून, तो पायींच यात्रेला निघालेला आहे. महात्मा गांधींच काय पण अनेक थोर पुरुषांना तो अत्यंत वंदनीय झाला.

त्याच्या कितीतरी गोष्टी तुला सांगण्यासारख्या आहेत. एक का दोन किती कितीतरी गोष्टी माझ्या डोळ्यांसमोर आहेत ! गारा वेंचतांनाची धांदल उडून गेली आहे माझी !

हा बकुळीच्या फुलांचा छोटासा हार गोष्टींच्या रूपानं तुझ्या वाढदिवसाच्या दिवशीं तुला देत आहें. बकुळीच्या सुकलेल्या फुलांनाहि कांहीं दिवस सुगंध असतोच ना !



काऊंट लिओ टॉलस्टॉय



लांकडे पहा. त्यांच्यांत स्निग्धता आहे, मध आहे, प्रेम आहे,
म्हणून त्यांच्यावर समाधानाची टवटवी असते.

काऊंट लिओ टॉलस्टॉय

अगदीं तशाच या अनेक वर्षांपूर्वी घडलेल्या गोष्टी असूनहि नवीन पिढीच्या मुलांच्याहि मनाला चटका लावणाऱ्या अशाच आहेत. लिओचं चरित्र म्हणजे आनंद लुटण्याचा खजिना आहे खजिना !

## बालपण

इ. स १८२८ त २८ ऑगस्ट रोजीं रशियांतील " यास्नाया पोल्याना " या गांवीं लिओचा जन्म झाला. तो नऊ वर्षांचाच असतांना पोरका झाला. मावशी ' टॅशियाना ' हिनं अगदीं आई-सारखा त्याचा प्रेमाने सांभाळ केला. तिच्यावर लिओचं अप्रतिम प्रेम होतं.

लहानपणापासूनच लिओला स्वतंत्रतेनं विचार करण्याची संवय होती; पण त्यामुळं लिओ हा एक विचित्र प्राणी आहे असं पुष्कळांना वाटे. लिओ हा अत्यंत धाडसी होता. सात-आठ वर्षांच्या लिओला एकदां वाटलं कीं पाय पोटाशीं घट्ट धरून उडण्याचा प्रयत्न केल्यास आपणांस सहज उडतां येईल. एकदां, लिओ, अठरा फूट उंचीवर जाऊन आपला प्रयोग यशस्वी होतो कीं नाहीं तें पाहूं लागला; परंतु तसाच तो बरोबर जमिनीवर येऊन पडला व त्यामुळें त्याच्या मेंदूला थोडा धक्का बसला. औषधोपचारानं पुढं तो बरा झाला.

स्वतःच्या प्रकृतीची पर्वा न करतां लिओनं धाडसाच्या अनेक गोष्टी केल्या. दुसऱ्यापेक्षां कांहींतरी वेगळं करून दाखविण्याकडे त्याची प्रवृत्ति होती. एकदां, आपल्या बहिणीबरोबर, तीन घोड्यांच्या गाडींतून जात असतां मधेंच उतरून त्यानं गाडीबरोबर दोन मैल धावून शर्यत लावली. शेवटीं तो इतका दमला कीं बेशुद्ध स्थितींत

तो जमिनीवर पडला. हें पाहून त्याच्या बहिणींना त्याला उचलून गाडींत घ्यावं लागलं.

## तरुणपण

लिओला शिकार करण्याचा फार शोक होता. घोड्यावरून रपेट करीत जंगलांतून फिरावं व जेव्हां आपल्या बंदुकीचा उपयोग करतां येईल तेव्हां शिकार करून आणावी हा त्याचा आवडीचा विषय होता. एकदां तर एका घोडयानं त्याला जंगलांत फेंकून दिलं होतं. तेथेंहि तशा बेशुद्ध स्थितींत कितीतरी वेळ त्याला एकटंच पडून रहावं लागलं. शुद्धीवर आल्यावर त्याच्या हाताचं हाड मोडलं होतं तरी तशा अवस्थेंत अर्धा मैल चालत जाऊन, बैलगाडींतून तो कसा तरी घरीं जाऊन पोहोंचला. रानडुकराची शिकार करीत असतांना तर त्याला एका रानडुकरानं इजाहि केलेली होती. अशा तऱ्हेनं अनेक धाडसाच्या गोष्टी लिओनं आपल्या आयुष्यांत केल्या.

लिओला सौंदर्याची विशेष आवड होती. त्यामुळें 'आपण दिसण्यास सुंदर नाहीं;' ही गोष्ट त्याला लहानपणीं फारच मनाला लागून राहिली होती. तो वृत्तीनं लाजाळू व विनयशील होता. स्वतःच्या असामान्य बुद्धिमत्तेचा अभिमान मात्र त्याला केव्हांहि वाटला नाहीं. उलट त्याला आपल्या दोषांची जाणीव होती. आपल्या वयाच्या अठ्ठ्याहत्तर वर्षापर्यंत त्यांनीं आपला फोटो काढला नव्हता आपण बरं दिसावं म्हणून एकदां लिओनं आपल्या भुंवया कांपून घेतल्या होत्या. ज्या वेळेस तो एक मोठा लेखक म्हणून प्रसिद्ध झाला, त्या वेळेस एक चित्रकार, त्याचं चित्र काढण्यासाठीं मुद्दाम, यास्नाया पोल्यानाला येऊन तो राहिला. ज्या रस्त्यानं लिओ,

सकाळचा घोड्यावर बसून जाई, त्या रस्त्यावर तो चित्रकार त्याला पाहण्यास येऊन बसे. ही गोष्ट लिओला कळल्यावर, त्यानं त्या चित्रकाराला घरीं बोलावलं व त्याला आपलं चित्र काढूं दिलं. लिओ जरी दिसायला देखणा नव्हता तरी त्याच्या डोळ्यांत असामान्य बुद्धीची चमक होती. त्या चित्रकारानं काढलेलं तें चित्र पुढं रशियांतील एका 'म्यूझियम' मध्यें ठेवण्यांत आलं.

लिओला संगीताची व चित्रकलेची अत्यंत आवड होती. कधीं कधीं एकान्त अशा ठिकाणीं जाऊन तो एकटाच विचार करीत बसे. आपल्या हातून घडलेल्या बऱ्या गोष्टींबद्दल तो विचार करी. त्याला रोजनिशी लिहिण्याची संवय होती. यामुळेंच आशू, त्याच्या हातून पुढं अनेक चांगल्या गोष्टी घडल्या आणि त्यासाठीं तो नेहमीं झटत असे. त्याची राहणी साधी पण विचारसरणी उच्च होती. लहानपणापासून तो मोठ्या लोकांप्रमाणें विचार करी. त्यानं खूप वाचन केलं नी म्हणूनच त्याच्या विचारांना चांगले पैलू चढत गेले, व त्याच्या आचरणाला उत्तम विचारांची बैठक बसली.

एकदां लहानपणीं त्याला त्याच्या मास्तरांनीं कोंडण्याची व मारण्याची भीति दाखविली. या गोष्टीची लिओला चीड होती. लिओ जेव्हां पुढं स्वतः शिक्षक झाला तेव्हां तो आपल्या विद्यार्थ्यांशीं प्रेमानं व खेळीमेळीनं वागे. त्याच्या विद्यार्थ्यांचं त्याच्यावर फार प्रेम होतं. अगदीं अंधार पडेपर्यंत मुलं लिओजवळ बसून गोष्टी ऐकण्यांत गुंग होऊन जात. कित्येकदां उघड्या मैदानांत लिओला खालीं पाडून बर्फाचे चेंडू एकमेकांच्या अंगावर फेंकण्याचा खेळ, मुलं लिओशीं खेळत. कडक शिक्षेपक्षां प्रेमानं शाळेंत शिस्त लावण्याची पद्धत लिओला अधिक पसंत होती.

संवयींनं माणसाला दु:खाची झळ विशेष लागत नाहीं असं त्याला वाटे. त्यासाठीं लिओ स्वत:ला खोलींत कोंडून घेई. नवीन प्रयोग करून आपले नवे विचार तो प्रत्यक्ष आचरणांत आणी. लोकांना विचित्र वाटणाऱ्या अशा विचारांमुळें लिओ प्रत्यक्ष मृत्यू-लाहि न भिणारा असा थोर पुरुष झाला.

## प्रेमाचे उत्तम मासले

यास्नाया पोल्याना या इस्टेटीचा लिओ मालक होता. त्याच्या शेतांत पुष्कळ मजूर काम करीत व कितीतरी घोडेहि शेतावर खपत. प्राणिमात्रांवर दया व प्रेम करण्याचा विशेष गुण लिओंत होता. घोडयांना मारलेलं त्याला मुळींच आवडत नसे. एकदां इ. स. १८४० त तेथें दुष्काळ पडला. आपल्या मजुरांना खाण्यास अन्न मिळावं म्हणून वयाच्या बाराव्या वर्षी त्यानं फंड उभारला व आपली कांहीं जमीन विकून त्या फंडासाठीं पैसे दिले.

आश्लेषा, लिओप्रमाणें रोजनिशी लिहून आपलं वर्तन सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यामुळें अशीं लोकोपयोगी कामं करण्याची चांगली बुद्धि होते.

## सॅडो

सैन्यांत भरती झाल्यावर लिओ एकदां ‘ स्टारी यूर्ट ’ला कांहीं दिवस रहात होता. फावल्या वेळीं तो पैसे लावून पत्ते खेळे. यांत तो पुष्कळ वेळां हरत असे. कित्येकदां त्याला पैशाची टंचाई भासे. तेथें असतांना ‘ सॅडो ’ नांवाचा एक श्रीमंताचा मुलगा खेळण्यास येई. तो अशिक्षित होता म्हणून पुष्कळ लोक त्याला फसवीत. हें

लिओला बिलकुल पसंत नव्हतें. त्याला अन्यायाची फार चीड असे. त्यामुळें कित्येकदां लिओ सॅडोच्या बाजूनं खेळून त्याचे पैसे वांचवी. याचे सॅडोला फार उपकार वाटले. सॅडो जरी श्रीमंत बापाचा मुलगा होता तरी त्याचे वडील पैसे जमिनींत पुरून ठेवीत. सॅडोनं दुसऱ्याचे घोडे चोरून आणावेत नी आपली नड भागवावी हा त्याचा नित्याचा कारभार चाले. लिओला मात्र त्यानं आपला मित्र समजून एक पिशवी बक्षिस दिली. लिओनंहि सॅडोला एक बंदूक दिली होती. अशा तऱ्हेनं एक अशिक्षित मनुष्य लिओचा मित्र झाला. म्हणजेच सॅडोच्या भाषेंत सांगावयाचं म्हणजे ते एकमेकांचे 'कुनॅक' झाले. मित्रानं मित्राला जेवण देऊन आपली मैत्री दृढ करायची असा त्यांचा रिवाज होता. त्या वेळेस आपल्या पाहुण्याला जें हवं तें देण्याची पद्धत असे. सॅडोनं अशा वेळीं लिओला तलवार दिली. त्या दोघांची मैत्री दृढ झाली. सॅडोला लिओशिवाय करमेनासं झालं. कित्येक वेळां लिओ पैशाच्या अडचणींत सांपडला कीं सॅडो कसंहि करून त्याची अडचण दूर करी.

## बुल्खा

लिओचं जसं घोडयावर प्रेम होतं तसंच आपल्या 'बुल्खा' नांवाच्या कुत्र्यावरहि होतं, बुल्खाहि फार इमानी होता. एकदां लिओ 'कॉकेशस' डोंगरावर जाण्यास निघाला. त्यानं बुल्खाला घरींच ठेवलं होतं. चौदा मैल गेल्यावर लिओ घोडयावरून उतरून जरा विश्रांति घेत होता. इकडे बुल्खानं खिडकीचं तावदान फोडून तेथून निसटून आपल्या मालकाला शोधीत तो पळत सुटला. दूरवर

जमिनीवरून कांहींतरी जोराची हालचाल करणाऱ्या गोष्टीकडे लिओचं लक्ष वेधलं. चारी पायांची शक्ति एकवटून धापा टाकीत, अखेरीस बुल्खानं मालकाला गांठलं व येतांच त्याला प्रेमानं थोपटणाऱ्या लिओला, बुल्खानं हात चाटून आपला आनंद व्यक्त केला.

एकदां बुल्खाच्या पोटांत रानडुकरानं आपले सुळे भोंसकले. त्या वेळेस लिओनं डॉक्टरकडे नेऊन बुल्खाचं पोट शिवून घेतलं. तें शिवत असतांना बुल्खा लिओचा हात चाटीत होता. त्यांतून बुल्खा बरा झाला.

लिओला कोंबड्या, डुकरं, मधमाशा वगैरे प्राणी पाळण्याचा फार नाद होता. या सर्व जनावरांची निगा चांगली ठेवण्यांत लिओ दक्ष असे. रोज सकाळीं सर्व जागा स्वच्छ ठेवतात कीं नाहीं, यावर प्रत्यक्ष लिओची देखरेख असे. यास्नाया पोल्याना म्हणजे एक प्रेमाचं माहेरघर होतं. गरीब, निराधारांना तेथें काम मिळे व अशा लोकांच्या मुलांना शिकविण्याचं काम लिओ, त्याची बायको नी मुलं करीत. या सर्व सजीव प्राण्यांचं रक्षण करण्याचं काम बुल्खाचं होतं.

एकदां रात्रीं एक लांडगा एका डुकराला मारीत होता हें पाहून बुल्खानं त्या लांडग्याचा पाठलाग केला. लिओनंहि त्याच्यावर बंदूक झाडली; पण ती चुकली. तेव्हां त्या लांडग्यानं बुल्खाच्या डोक्याचा चावा घेतला. तो लांडगा पिसाळलेला होता. बुल्खा धावतच येऊन मालकाच्या पलंगाखालीं घुसला. तशा स्थितींत बुल्खाच्या गळ्यांत पट्टा नव्हता म्हणून म्युनिसिपालिटीच्या बेवारसी जनावरांच्या गाडींत घालून त्याला नेलं. बुल्खा पिसाळलेला असं वाटून त्याच्या पोटांत एक



23004

शस्त्र अडकवून मारण्याच्या तयारींत तीं माणसं होतीं. पण बुल्खा तेथून निसटला व थेट मालकाच्या पलंगाखालीं येऊन बसला व अखेरीस तेथेंच त्यानं प्राण सोडला.

## लिओची कामगिरी

लिओला लहानपणापासून वाचनाची अत्यंत आवड होती. त्यानं आपली अभ्यासाची वृत्ति शेवटपर्यंत ठेवली होती. रशियन भाषेंत त्यानें अनेक पुस्तकं लिहिलीं. कांहीं गोष्टी, कांहीं नाटकं तर कांहीं निबंध, अशा अनेक स्वरूपांत त्यानं लेखन करून आपलं नांव अजरामर केलं. त्याला फ्रेंच, इंग्लिश, इटालियन, ग्रीक अशा अनेक भाषा अवगत होत्या.

लिओ चवदा वर्षांचा असतांनाच त्यानें मोठमोठाले ग्रंथ वाचण्यास सुरुवात केली. तो रूसोचा मोठा भक्त होता. लिओ वीस वर्षांचा होता तेव्हां गळ्यांत रूसोचा फोटो लॉकेटमध्यें घालून हिंडे. आयुष्यांतील मध्यंतरीच्या काळांत त्यानं सैन्यांत शिपायाचं काम करून युद्धांत मोठी कामगिरी बजावली. परंतु त्याला या आयुष्याचा मनापासून वीट आला होता. दुसऱ्यांना ठार मारून विजय मिळविण्याची कल्पना किती हानिकारक आहे याबद्दलचे त्याचे विचार जयंतीमातेच्या शिकवणीसारखेच होते. म्हणूनच लिओनं आपले अखेरचे दिवस लेखनांत व वाचनांत घालवले.

यास्नाया पोल्याना हें खेडं होतं, पण लिओनं तेथें बरीच सुधारणा केली. मजुरांचा प्रश्न लिओनं हातीं घेतला. त्यांच्यावरचा अन्याय दूर करण्यासाठीं लिओ झटला. त्यांच्या मुलांसाठीं शाळा काढल्या. दुष्काळांत त्यांना पैशाची व धान्य पुरविण्याची मोठीच कामगिरी

लिओनं बजावली. मुलांना शाळेंत स्वच्छता राखण्यास शिकविलं व त्यांना शाळेचं सामान नीट वापरण्याची संवय लावली. तसंच मुलांनीं नेहमीं खरं बोलावं ही शिकवण लिओनं मुलांना उत्तम प्रकारें दिली.

लिओचं लग्न बऱ्याच उशिरां झालं. त्याला एकंदर तेरा मुलं झालीं. माणुसकीचे धडे लिओनं त्याच्या घरादाराला दिले. त्याचा वडील भाऊ निकोलस यावर त्याचं अत्यंत प्रेम होतं. लिओला मावशी टॅशियानाबद्दल अढळ आदर होता. 'फेट' या विद्वान् गृहस्थाचा तो वारंवार सल्ला घेई. 'सेमका' व 'फेडका' या दोन विद्यार्थ्यांवर लिओचं निर्व्याज प्रेम होतं. इ. स. १९१० पर्यंत या साधु पुरुषाचा सहवास लाभला.

यास्नाया पोल्यानांतल्या मजुरांना विचारलं असतं तर ते असंच म्हणाले असते कीं, लिओसारखाच सहृदय मालक असावा. बुल्खाला विचारलं असतं, तर तो हेंच म्हणाला असता कीं, लिओसारखाच दयाळू धनी असावा. सेमका व फेडकांना विचारलं असतं तर तेही असंच म्हणतांना आढळले असते कीं, असावा तर लिओसारखा प्रेमळ शिक्षक असावा नी आपण सर्व त्याचं चरित्र वाचून असंच म्हणूं कीं, जन्माला यावं तर लिओसारखं बुद्धिमान् व्हावं व त्याचाच आदर्श ठेवावा. आशू, आतां तुला काय वाटतं सांग ?

◆ ◆ ◆

गोष्ट ६ वी

# कोकिळा

आश्लेषा, तूं कोकिळा पाहिली असशीलच ! दिसायला कावळ्यासारखी दिसते. पण तो मठ्ठ डोक्याचा कावळा कोणीकडे नी ही चलाख स्वरसुंदरी कोयल कुणीकडे ! काळ वेळ न पाहतां ओरडणाऱ्या कावळ्याची कर्कश ' काव-काव ' केव्हांहि ऐकण्यास मिळते नाहीं ? परंतु एरव्ही न ओरडणारी कोकिळा, सुंदर वसंतऋतूच्या सुखावह वातावरणांतच सुस्वर आलाप काढीत असते. मोठी धोरणी आहे !

एप्रिल महिना होता तो. सूर्योदयाबरोबर एका आंब्याच्या झाडावर, एक कोकिळेची जोडी कुहूऽऽऽ कुहूऽऽऽ करीत बसली होती. मोठी आनंदाची बातमी होती. पण दुसऱ्यांना ते कसं कळणार ? जवळच्याच झाडावर बसलेल्या कावळिणीला तर कांहींच उमजणं कठिण ! बोलून चालून मठ्ठच ती !

मग काय मुलगा झाल्याची बातमी होती ती ! अगदीं बरोबर. अशी बातमी सर्व जगाला नको का सांगायला ? नी म्हणूनच मोठमोठ्यानं त्यांचा स्वर उंचावत होता. मधूनच त्या नर-मादींत खलबत चाले नी मग खालच्या स्वरावर तीं येत.

शेजारच्या झाडावर किनई, कावळीण आपल्या काटक्यांच्या घरट्यांतील अंड्यांवर बसून राहिली होती. कावळिणीला मोजायला येत नव्हतं तें बरं होतं.

तो कोकीळ आपल्या मादीला म्हणाला, " त्या कावळिणीला

मी हुसकावून देतों नी दूरवर घेऊन जातों. तेवढयांत तूं आपलं अंडं तिच्या घरटयांत नीट सोडून ये बरं ?

खलबत झालं नी तो कोकिळ बाणासारखा त्या कावळिणीच्या पाठीशीं लागला. अगदीं दूर आकाशांत ती पकडापकडी चालली होती. कोकिळेनं आपलं अंडं कावळिणीच्या घरटयांत सुखरूप नेऊन ठेवलं. एकूण दहा अंडीं घरटयांत झालीं. कोकिळेचं अंडं इतर अंड्यांपेक्षां लहान होतं.

कोकिळेचं काम फत्ते झालं ! कोकिळा मात्र पुन्हां या झाडावरून त्या झाडावर उड्या मारण्यास व गाणं म्हणण्यास मोकळी झाली. मोठी धोरणी बाई ! आपल्या शेजारणीशीं गोड गोड बोलून काम तर करून घेतलं !

अंडीं उबवून झाल्यावर त्यांतून पिलं बाहेर पडलीं. ‘ चु–चू ’ आवाज करूं लागलीं. कावळिणीनं दाणा–चारां आणावा नी मायेची पांखर घालावी असं कांहीं दिवस चाललं. पिलांना पंख फुटले. नीट उडतां येऊं लागेपर्यंत कोकिळेचं पिलूं त्या तांडयांत राहिलं. इतर पिलांच्या व आपल्या बोलण्या-चालण्यांत फरक होऊं लागल्यावर तें पिलूं आपलं जग शोधण्यासाठीं भुर्र्कन उडून गेलं, तें पुन्हां त्या कळपांत आलं नाहीं.

× × ×

## भगवान् श्रीरमण महर्षि

आश्लेषा, कितीहि दूर जंगलांत एकांतवासांत केवडयाचं झाड असो, त्याच्यावर सुवासिक केवडा उमलूं दे, तो तोडण्याचा मोह झाल्याशिवाय रहात नाहीं.

भगवान् श्रीरमण महर्षि

आशू, तुला ज्या थोर विभूतीची गोष्ट सांगणार आहे त्यांचं असंच झालं. ते स्वत: लोकांपासून दूर राहण्याचा कितीहि प्रयत्न करूं लागले तरी त्यांचं दर्शन घेण्यासाठीं अगदीं दूरदूरचे लोक परदेशांतूनहि येऊं लागले व त्यांच्याभोंवतीं नवीन जग निर्माण झालं. तें कसं झालं तें तुला सांगतें.

दक्षिणेस अर्काट जिल्ह्यांत 'तिरुवन्नमलाय्' येथें कार्तिक महिन्यांत दहा दिवसांचा उत्सव असतो. अरुणाचल टेंकडीच्या पायथ्याशीं असलेलं शंकराचं देऊळ, विक्रीसाठीं ठेवलेली गुरांची जागा व पालतीर्थ तळ्याच्या जवळील बाग या तिन्ही ठिकाणीं लोकांची विशेष गर्दी आढळते. टेंकडीच्या पायथ्याशीं, बागेच्या-लगत असलेल्या आश्रमाकडे मात्र लोकांच्या झुंडीच्या झुंडी जातांना दिसतात. एऱ्हवी ही जागा किती शांत वाटते! पण उत्सवाच्या दिवशीं त्या आश्रमांत राहणाऱ्या अत्यंत तेजस्वी महात्म्याच्या दर्शनासाठीं लोक जात. शेंकडों लोक त्यांच्याभोंवतीं बसत, उठत नी न बोलतां निघून जात. पण त्या महात्म्याच्या डोळ्यांतील अजब तेज पाहून, भारून जात. किती शांत, स्थिर नी निश्चयी दृष्टि ती! त्या आश्रमांत श्रीमंत–गरीब, उच्च–नीच, वृद्ध–तरुण असा भेदभाव नाहीं.

## कृत्तिकादीपम्

उत्सवाचा दहावा दिवस पाहण्यासारखा असतो. त्या दिवसाला 'कृत्तिकादीपम्' असं म्हणतात. संध्याकाळीं सहा वाजतां अरुणाचल देवाची म्हणजेच अग्निदेवाची पालखी बाहेर पडते. हजारों लोक पालखीबरोबर बाहेर पडतात नी त्याच वेळेला अरुणा-

चल टेकडीच्या शिखरावर पुष्कळ तूप व कापूर घालून मोठा विस्तव तयार करतात. तो उजेड हजारों मैलांवरून दिसतो. येवढंच नव्हे तर बरेच दिवस तेथें तो जाळ राहतो. यामुळें लोकांच्या धार्मिक भावना जाग्या होऊन लोक अग्नि-देवाला मनोभावानं साष्टांग दंडवत घालतात.



भगवान् श्रीरमण महर्षि

अरुणाचल ह्या टेकडीवर अग्निदेवाचं वास्तव्य आहे असा विश्वास ठेवण्यास व अरुणाचलाचा आकार म्हणजेच प्रत्यक्ष तेजाचं लिंग आहे अशी भावना होण्यास मदत होते. साधुपुरुषांची तपश्चर्या सिद्धीस जाण्यास आजूबाजूचं वातावरण त्यांना स्फूर्ति देणारं असंच आहे नी म्हणूनच तिरुवन्नमलाय् व तेथें असलेली अरुणाचल ही टेकडी अत्यंत आकर्षक ठिकाणं झालीं आहेत.

उत्सवाला आलेले लोक परत जातांना मनांत म्हणत असतात, " हा कोण व्यक्ति आहे ? इतके लोक या व्यक्तीच्या भजनीं कां लागतात ? "

आशू, निश्चय व सतत परिश्रमावर मिळवलेलं सामर्थ्य, मग तें कोणत्याहि विषयांत असो, गुप्त रहाणं शक्य नाहीं. म्हणूनच दूरदूरचे लोक या व्यक्तीला हुडकीत आले.

## तिरुकुझी

तिरुकुझी हें खेडं मदुरेपासून तीस मैलांवर आहे. तेथें एक जुनें पण चांगलें बांधलेलें देऊळ आहे. इ. स. १८७९ सालीं सुंदरम् अय्यर हे या गांवीं वकिली करीत होते. त्यांच्या घरीं आदरातिथ्याचे नियम विशेषेंकरून पाळले जात. त्यावर ते बराच पैसा खर्च करीत. सुंदरम् व त्यांच्या पत्नि ' अलगम्मल ' हीं दोघंहि सुस्वभावी होतीं. " आपलं घर तें सर्वांचंच आहे " असं समजून तीं दोघं वागत. हेच ते सुस्वभावी आई-वडील रमण महर्षींना लाभले.

सुंदरम अय्यरच्या घराण्यांत, प्रत्येक पिढींतील एकादा मनुष्य घर सोडून संन्यासी होई, असं आतांपर्यंत घडत गेलं; परंतु सुंदरमच्या हयातींत तसा कोणी त्यांच्या मुलांत निघेल असं वाटलं नव्हतं. इ. स. १८९२ त सुंदरम् वारले. त्यावेळीं त्यांचा मोठा मुलगा नागस्वामी कॉलेजमध्यें जात होता, दुसरा मुलगा व्यंकटरमण हा शाळेंत जाणारा होता व धाकटा नागसुंदरम् हा तर अवघा सहा वर्षांचाच होता.

## बालपण

इ. स. १८७९ च्या ३० डिसेंबरला रात्रीं १ वाजतां व्यंकटरमणाचा जन्म झाला. त्यावेळीं नटराजाची मिरवणूक संपून देवळांत नुकतीच मंडळी परतली होती.

रमण मोठा होऊन शाळेंत जाऊं लागला. त्याचं लक्ष अभ्यासाकडे विशेष नव्हतं. दुसऱ्या मुलांनीं वाचत असतांना यानं ऐकावं व तात्पुरतं तसंच म्हणून दाखवावं नी लवकरच विसरून जावं अशी याची अभ्यास करण्याची पद्धत होती. कुस्ती खेळणं, पोहणं व फूटबॉल खेळणं याचा त्याला नाद होता.

रमणचं पुढील हायस्कूलचं शिक्षण मदुरेला झालं. तो इंग्लिश सहावींत होता. तेथें असतांना एकदां, त्याचा एक नातेवाईक त्याला भेटण्यास आला. रमणनं विचारलं, "तुम्ही कुठून आलांत? "

" मी अरुणाचलाहून आलों " तो गृहस्थ म्हणाला.

तें नांव ऐकतांच रमणच्या मनांत खोल दडलेल्या पूर्वीच्या आठवणी झाल्याचा त्याला भास झाला व त्याच्या कांहीं विशेष भावना उचंबळून आल्या.

रमणनं विचारलं, " अरुणाचल कुठं आहे ? "

हंसतच तो गृहस्थ म्हणाला, " काय, तुला तिरुवन्नमलाय माहीत नाहीं ? त्यालाच अरुणाचल म्हणतात."

कांहीं दिवसांनीं रमणच्या मनांतून अरुणाचलाची स्मृति पुसट होऊं लागली. या मुदतींत रमणनं तामीळ भाषेंतील एक धर्मपुस्तक वाचलं. त्यामुळें रमणच्या ईश्वरविषयक भावना बळावूं लागल्या. त्या पुस्तकांत त्रेसष्ट साधूंचीं चरित्रं आहेत.

वयाच्या १७ व्या वर्षीं रमणच्या स्वभावांत एकदम फरक झालेला आढळला. त्याचा मनावर ताबा व निश्चय विशेष दिसून येई. तें पाहून त्याच्या मित्रांना व भावालाहि आश्चर्य वाटलं.

## घर सोडलं

मदुरा कायमचं सोडण्यापूर्वीं सहा आठवडे एकाएकी रमणच्या वृत्तींत बदल झाला. रमणची प्रकृती चांगली होती म्हणून त्याला अगदीं गाढ झोंप लागे. कित्येकदां तो झोंपेंत चालून आला तरी त्याला त्याचा पत्ता नसे. या संवयीचा रमणला पुढें फायदा झाला.

अलिकडे रमण मदुरेला असलेल्या मीनाक्षीच्या देवळांत, तो रोज संध्याकाळीं जाई. डोळे मिटून प्रार्थना करीत असतांना त्याच्या भावना उचंबळून येऊन अनेक वेळां त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे रहात.

रमणचा वडील भाऊ नागस्वामी, त्याच्या प्रत्येक हालचालीकडे बारकाईनं लक्ष देऊं लागला. कित्येक वेळां तो अभ्यास तसाच टाकून डोळे मिटून चिंतन करीत बसलेला, नागस्वामीला आढळे. तो दिवस इ. स. १८९६ चा २९ ऑगस्टचा शनिवार होता.

नागस्वामी म्हणाला, " असं वागणाऱ्याला ही शाळा, हा अभ्यास कशाला हवा ? "

व्यंकटरमणला आपल्या भावाचं म्हणणं रुचलं. ताबडतोब, एका वर्षापूर्वीं ऐकलेलं " अरुणाचल " हें नांव त्याच्या मनापुढं उभं राहिलं. जणुं कांहीं तो आपल्याला बोलावीत आहे असं त्याला वाटलं. त्या जगत् पित्याची हांक त्याला ऐकूं आली. रमणलाहि त्याची ओढ लागली. लगेच अरुणाचलाला जाण्याची तयारी रमणनं केली. ही गोष्ट कोणालाहि कळतां कामा नये व एकदां गेल्यावर परत मागं येतां कामा नये, असा त्यानं पक्का निश्चय केला. ज्यानं

आपल्याला बोलावलं आहे तोच आपली काळजी घेणार यावर त्याचा पूर्ण भरंवसा होता.

रमण एकदम उठला व नागस्वामीला म्हणाला, " आज दुपारीं बारा वाजतां मला शाळेंत जायचं आहे. शाळेंत आज आम्हांला विजेवर माहिती पुरवणार आहेत. "

नागस्वामी " बरं " म्हणाला. " पण जातांना पेटींतून पांच रुपये घेऊन जा व माझी कॉलेजची फी दे. " असं म्हणून नागस्वामी बाहेर गेला.

रमणच्या प्रवासखर्चाची तरतूद ईश्वरानंच केली असं त्या वेळीं रमणला वाटलं रमणनं कांकीकडून पांच रुपये घेतले. त्यांतील तिकिटाला लागणारे तीन रुपये त्यानं घेतले. राहिलेले दोन रुपये व पत्र टेबलावर त्यानं ठेवलं. पत्रांत पुढील मजकूर होता.

" माझ्या पित्याच्या शोधासाठीं..........

" त्याचेच बोलावण्यावरून निघत आहे. चांगल्याच कामासाठीं जात आहे तेव्हां दुःख करण्याचें कारण नाहीं. शोधून काढण्याची जरुरी नाहीं व त्यासाठीं वायफळ पैसा खर्च करूं नये.

ता. क. — तुझी कॉलेज फी दिली नाहीं. राहिलेले हे दोन रुपये आहेत. "

दुपारचे बारा वाजले होते. हा सतरा वर्षांचा मुलगा, हातांत कांहींहि न घेतां, निश्चयानं घर सोडून निघाला. त्यानं पाठीमागं वळून एकदांहि पाहिलं नाहीं. त्याच्या प्रत्येक गोष्टींत ईश्वराची सहाय्यता असलेली त्याला दिसून आली व म्हणूनच त्यानं योजलेलं काम तडीस गेलं. त्या दिवशीं गाडीला उशीर होता म्हणूनच रमणला गाडी मिळाली. स्टेशनावर जाऊन दोन रुपये नी तेरा आण्याचं

तिकीट त्यानं काढलं. उरलेले तीन आणे घेऊन व त्याची पुरचुंडी बांधून, रमण एकदांचा गाडींत बसला.

गेला, रमण तर घर सोडून गेला नी पुन्हां मदुरेला अगर घरीं तो परत आला नाहीं. आश्लेषा, कोकिळेप्रमाणंच तो आपलं जग शोधण्यासाठीं निघून गेला.

## प्रवासमार्ग

गाडी सुरू झाल्यावर रमणनं डोळे मिटून प्रार्थना करण्यास सुरवात केली. अशा ध्यानस्थ स्थितींत बसलेल्या या तरुण मुलाला पाहून, डब्यांतील इतर उतारकरूंना मोठं कुतूहल वाटलं. त्याच्या-जवळ एक मौलवी बसला होता, त्यानं त्याची विचारपूस केली व रमणला योग्य ती माहिती दिली. रमण स्वभावानं लाजाळू असल्यामुळें तो आपण होऊन माहीत नसलेल्या प्रवास-मार्गाची माहिती कुणालाहि विचारीत नसे. सुदैवानं त्या मौलवीकडून पुढील स्टेशनांची माहिती मिळाली व ती त्याला उपयोगी पडली.

वाटेंत रमणला भूक लागली तेव्हां त्यानं दोन पैशांचे पेरू घेऊन आपली भूक भागवली. पहांटे तीन वाजतां " विलुपुरम् " जंक्शन आलं नी रमण स्टेशनवर उतरला. बाहेर आल्यावर एक रस्ता " मांबलपतु "ला जाणारा होता, त्याच रस्त्यानं तो चालूं लागला. तोच रस्ता तिरुवन्नमलायूला जाणारा होता.

पहांटेच्या चालीनंतर रमणला भूक लागली. तो एका खाणावळी-जवळ आला व जेवण मागूं लागला. त्या मालकानं, " दुपारीं जेवण तयार होईल, " म्हणून सांगितलं. बराच वेळ होता म्हणून

तेथेंच बसून रमण पुन्हां ध्यान करूं लागला. हें पाहून मालकाला आश्चर्य वाटलं. जेवण झाल्यावर मालकाला अडीच आणे रमणनं दिले.

मालकानं विचारलं, "तुझ्याजवळ किती पैसे आहेत?"

" रमण म्हणाला, " तेवढेच."

" बरं तर, ते तुलाच ठेव." असं मालकानं म्हटलं.

नंतर स्टेशनावर जाऊन रमणनं अडीच आणे देऊन " मामबलपतु"चं तिकिट काढलं. नंतर तेथून तिरुवन्नमलायपर्यंत चालत जायचं त्यानं ठरवलं.

" मामबलपतु "हून दहा मैल चालल्यावर रमणला एक टेकडी व एक देऊळ दिसलं. तिन्ही सांज झाली होती. रमण थकला होता. त्या देवळांत जाऊन तो पुन्हां ध्यान करूं लागला. त्याला तेथें डोळ्यापुढं प्रकाश दिसल्याचा भास झाला. तो त्या तंद्रींत असतांना, " कोण आहे ! बाहेर ये. दरवाजा बंद करावयाचा आहे." हे पुजाऱ्याचे शब्द त्याच्या कानीं पडले.

रमण बाहेर येऊन पुन्हां चालूं लागला. दहा फर्लांगांवर असलेल्या ' किलूर ' गांवच्या देवळांत येऊन पुन्हां तो डोळे मिटून चिंतन करूं लागला. तेथल्या पुजाऱ्यांना त्यानं जेवण मागितलं असतां नगारा वाजविणाऱ्या मनुष्यानं त्याला आपल्या वाटचं जेवण दिलं.

त्या देवळाजवळ एक शास्त्री रहात होता. भाताची थाळी हातांत घेऊन पाण्यासाठीं रमण तेथें गेला असतां, दरवाजांतच, अतिशय थकल्यानं व पोटांत अन्न नसल्यानं तो घेरी येऊन पडला. हातांतील थाळी निसटून, जिकडेतिकडे भात जमिनीवर पसरला. थोडया वेळानं शुद्धीवर आल्यावर पहातो तों आजूबाजूला लोकांची

गर्दी ! जमिनीवरील भात तसाच गोळा करून रमणनं तो खाल्ला व पाणी पिऊन तो झोंपला.

दुसऱ्या दिवशीं गोकुळाष्टमी होती. अद्याप तिरुवन्नमलाय् वीस मैलांवर होतें. रमण थकलेला होता. जवळ एक दिडकीहि नव्हती. शेवटीं आपल्या कानांत सोन्याची वस्तू आहे हें त्याच्या ध्यानांत आलं. एका गृहस्थाला, त्यानं ती वस्तू दिली व पुढील प्रवासखर्चासाठीं लागणारे चार रुपये त्याच्याकडून घेतले. तिकीट काढून तो सकाळीं गाडींत बसला व एका तासानंतर तिरुवन्नमलाय्ला पोहोंचला.

## तिरुवन्नमलाय्

इ. स. १८९६ च्या सप्टेंबर एक तारखेला रमण तिरुवन्नमलाय्ला पोहोंचला. अरुणाचलाचीं उंच उंच शिखरं पाहून, आनंदानं भराभर पाउलं टाकीत, उल्हसित अंत:करणानं, रमणनं थेट देवळाचा रस्ता धरला. किती ओढ लागलेली दिसली त्याच्या चालींत ! त्याचं अंत:करण थय्थय् नाचत होतं. त्या वेळीं देवळांत कोणीहि नव्हतं. प्रत्यक्ष जगत्पिता आपल्या लाडक्या रमणचं स्वागत करण्यास सज्ज होता जणुं कांहीं ! देवळांत शिरतांच रमणला समाधान वाटलं नी त्याची तळमळ शांत झाल्यासारखी दिसली.

"देवा, सर्व कांहीं सोडून, मी तुझ्या हांकेला धांवून आलों. मी तुझा आहे व तूं माझा आहेस. तूं मला ओढून घेतलंस व मी तुझ्या पाठोपाठ कोंकरासारखा चालत आलों." अशा भावनेनं ईश्वराच्या कुशींत शिरून तो त्याची तहान भागवून घेत होता असं दिसलं.

यापुढील रमणचं घर आकुंचित व मर्यादित नव्हतं. आकाश हें त्याच्या घराचें छत कीं जेथें सूर्य व चंद्र हे दिवे तळपत आहेत नी

त्याच्या घराच्या जमिनीवर हिरवळ पसरलेली सुंदर बिछाईत अंथरलेली आहे. देऊळ, टेंकडी, गुहा व झऱ्याकांठीं वाढलेल्या वृक्षाखालीं राहून रमणनं यापुढील आपले दिवस काढले तें ठिकाणच तसं रम्य व पवित्र आहे !

जवळ असलेल्या तळ्यावर रमण गेला असतां रमणनं हातांतील खाऊची पुडी फेंकून दिली. या शरिराला मिठाई कशाला ?" असं वाटून पुडीची त्यानं वाट लावली. डोक्याचे केंस कापून घेतले व कपडे नी पैसे टाकून दिले. तेव्हांपासून रमणनं पैशाला कधींच हात लावला नाहीं. परमेश्वराच्या शोधास हा छोटा स्वामी लागला. जो परमेश्वर पक्ष्यांना चारा देतो त्यालाच भक्तांची काळजी असते, या श्रद्धेवर तो पुढील कठिण दिवस काढूं शकला.

## खडतर तपश्चर्या

स्वामी देवळांत गेले. तेथें आजूबाजूला खांब होते व बसायला एक दगड पाहून स्वामी ध्यानस्थ बसले. सबंध दिवस व रात्र ते तशाच स्थितींत होते.

तशा स्थितींत त्यांना पाहून, मुलं त्यांना दगडं मारूं लागलीं. त्यावेळीं ते सतरा वर्षांचे होते. कोणी त्यांना वेडाच समजून त्रास देत. त्या देवळांत शेशाद्री स्वामी रहात असत. त्यांचं लक्ष त्या छोटया स्वामीकडं वेधलं गेलं.

## पाताललिंग

मुलांचा त्रास स्वामींना फार होऊं लागला म्हणून तेथून तपश्चर्या करण्यास ते उठून पाताललिंगाच्या जवळ अगदीं अंधाऱ्या ठिकाणीं जाऊन बसले. ती गुहेसारखीच जागा होती. पण तेथें तरी कांहीं थोडा

त्रास होता ! ती जागा कुणी स्वच्छ करीत नसत कीं, कधीं तेथें दिवाहि लागत नसे सूर्यप्रकाशाचं तर नांव नव्हतं ! तें देऊळहि फार जुनं होतं. जागेला भरपूर ओल होती. तेथें वाळवी, डांस, मुंग्या, मधमाशा, तसंच अनेक प्राण्यांचं तें घर बनलं होतं. पण अशा ठिकाणीहि हा छोटा स्वामी मनांत आपल्या आनंदाचा वांटा लुटत होता. पण बाहेर ....... ? किडे व मुंग्या त्याला चावून चावून त्याचं रक्त पीत होत्या. बसण्याची जागा, मांडया व पाय रक्त व पू यांनीं भरलेले होते. आपल्याला किती जखमा झाल्या आहेत याचा त्या स्वामींना पत्ताहि नव्हता. तेथें असतांना 'रत्नमल' नांवाची बाई त्यांना जेवण नेऊन देई. पण ते कोणाशीच बोलत नसत.

एकदां व्यंकटाचल मुदाली नांवाचा गृहस्थ त्यांना पाहण्यासाठीं तेथें आला. स्वामींची खडतर तपश्चर्या पाहून त्यांनीं त्यांना उचलून बाहेर आणलं. स्वामींना त्याचा पत्ताच नव्हता. "अशा स्थितींत मनुष्य जगतो तरी कसा ?" असं वाटल्याशिवाय राहिलं नाहीं. त्यावेळीं झालेल्या जखमांच्या खुणा चाळीस वर्षांनंतरहि स्वामींच्या अंगावर स्पष्ट दिसत होत्या.

स्वामींनीं मुक्याचं व्रत स्वीकारलं होतं. लोक त्यांना बळजवरीनं खाऊ घालीत. लगेच पुन्हां ते ध्यानस्थ स्थितींत रहात. तशी कडक-तपश्चर्या पाहून लोक त्यांना ब्रह्मस्वामी म्हणूं लागले. कधीं कधीं रमण महर्षी एखाद्या झाडाखालीं तपश्चर्या करीत बसलेले लोकांना दिसत. त्यांना पाहण्यास कार्तिक महिन्यांत वरेच लोक येऊं लागले. न बोलतां महर्षींना नमस्कार करून लोक निघून जात.

हळूं हळूं महर्षींचा भक्तगण वाढूं लागला. कित्येक लोक येतांना

त्यांना जेवण घेऊन येत. त्यांना देऊन राहिलेलं अन्न सर्वांना सारखं वांटीत.

## गुरुमूर्तम्

इ. स. १८९७ त तंबिरन् नांवाच्या महर्षींच्या शिष्यानं त्यांना गुरुमूर्तम्ला नेलं. स्वामींनीं एकंदर सहा महिने ध्यानस्थ स्थितींत काढले. अद्याप ते कुणाशींच बोलत नव्हते. शरिराकडे त्यांनीं पूर्ण दुर्लक्ष केलं होतं. शरीर कधीं धुतलं नव्हतं. केंसांचं जाळं झालेलं व नखं इतकीं लांब वाढलीं होतीं कीं, हातांचा त्यांना उपयोगहि करतां येईना.

गुरुमूर्तम्ला असतांना भिंतीला टेकून ते बसले असतां तेथें मुंग्यांनीं भिंतीवरून रांगची रांग धरून त्याच्या अंगावर हल्ला चढवला. अजून त्या ठिकाणीं जाऊन पाहशील तर आशू, मुंग्यांच्या जाण्या येण्यानं भिंतीवर उमटलेली खूण पाहण्यास सांपडते.

या छोटया नवीन स्वामींबद्दल सर्वांच्या मनांत कुतूहल उत्पन्न होऊन हे कोण आहेत व त्यांचं नांव काय आहे तें ऐकण्याची लोकांना उत्सुकता होतीच ! एकदां व्यंकट अय्यर नांवाचा एक सरकारी अधिकारी स्वामींच्या दर्शनासाठीं तेथें आला. त्यानं एक पेन्सिल व कागद त्यांच्यापुढं ठेवला. "आपलं नांव व गांव लिहावं" अशी त्यानं इच्छा व्यक्त केली. "स्वामींनीं उत्तर दिल्याशिवाय आपण येथून हालणार नाहीं." असं म्हटलं, तेव्हां कुठं स्वामींनीं इंग्लिशमध्यें "व्यंकटरमण, तिरुकुशी" असं त्या कागदावर लिहिलं.

स्वामींचं शरीर अशक्त झालं होतं. सतत अठरा महिने रात्र नी दिवस एकाच बसण्याच्या स्थितींत त्यांनीं दिवस काढले होते.

आपल्या शिष्यांच्या मदतीनं ते चालण्याचा प्रयत्न करूं लागले. कित्येकदां आंब्याच्या झाडाखालीं ध्यानस्थ बसलेले स्वामी लोकांच्या दृष्टीस पडत. कित्येक शिष्य त्यांना प्रश्न विचारूं लागले. त्याचं उत्तर त्यांना ते लिहून दाखवीत. त्यावरून स्वामींना संस्कृत, तेलगू, मल्याळम् व इंग्लिश चांगलं येतं हें लोकांना कळून आलं.

## आईची भेट

रमणच्या काकाला एकदां एका गृहस्थानं येऊन सांगितलं, "तुमचा व्यंकटरमण तिरुवन्नमलायला एक मोठा साधु झालेला आहे."

ही बातमी आईला समजली. नागस्वामी आपल्या आईला घेऊन रमणला भेटण्यासाठीं आला. टेकडी चढून गेल्यावर एका दगडावर स्वामी पडलेले आहेत असं त्या दोघांना दिसलं. आईचं अंत:करण आनंदानं भरून आलं. तिनं आपल्या रमणला ओळखलं. त्याचें वाढलेले केंसांचें जाळें, अत्यंत मळलेलें कौपीन * व मलीन झालेलं शरीर, नी फार लांब वाढलेलीं नखं पाहून तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ती क्षणभर रमणला पाहून थबकली. तिनं त्यांना रमण म्हणून ओळखलं खरं, परंतु एका स्वामीपुढं आपण उभें आहों याचीहि जाणीव झाल्यानं ती प्रेमभरानं त्यांना त्या वेळीं कवटाळूं शकली नाहीं. अलगम्मलनं त्यांना घरीं येण्यास कितीतरी विनवलं परंतु स्वामी एक शब्दहि तिच्याशीं बोलले नाहींत कीं तिला त्यांनीं कांहींच सुचवलं नाहीं. मातेचं झिरपणारं हृदय पाहूनहि मन स्थिर ठेवून ते तसेच निघून गेले.

---

*लंगोटी

" पहा हो, हा माझा पोटचा मुलगा असूनहि माझ्या दु:खाची त्याला पर्वा नाहीं ! " असं काकुळतीनं ती सर्वांना सांगून आक्रोश करूं लागली.

पण छे ! कितीहि अंत:करण फाडून तिनं विनविलं तरी कशा-कशाचाच स्वामींवर परिणाम झाला नाहीं ! शेवटीं एक गृहस्थ स्वामींना म्हणाला, " तुम्ही हवं तर बोलूं नका परंतु ' हो ' कीं ' नाहीं ' तें लिहून सांगा. आईला तेवढंच समाधान होईल. "

शेवटीं स्वामींनीं तामीळमध्यें लिहिलं, " नशिबांत जें लिहिलं आहे, त्याप्रमाणं ईश्वर घडवून आणतो. ज्या गोष्टी घडणार नाहींत, त्या घडवून आणण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी त्या घडून येणार नाहींत. तेव्हां गप्प बसणं हा एकच सोइस्कर मार्ग आहे. "

मोठ्या मुलाची रजाहि संपली म्हणून आई मोठ्या जड अंत:-करणानं तशीच घरीं परतली.

## विरूपाक्ष गुहा

इ. स. १८९९ त स्वामी विरूपाक्ष गुहेंत येऊन राहिले. कार्तिक महिन्यांत त्या गुहेकडे लोकांच्या झुंडीच्या झुंडी दर्शनासाठीं जाऊं लागल्या. त्यांचं वय तेव्हां एकोणीस वर्षांचं होतं. ते आतां बोलूं लागले. त्यांच्याकडे गरीब, भुकेलेले, विद्वान् लोक, विद्यार्थी सर्वच वेगवेगळ्या हेतूनं तेथें जमूं लागले. टेकडीवर ज्ञानरूपी सूर्य उगवला आहे, असं लोकांना कळलं. तेथें त्यांना अन्न, प्रेम, दया व ज्ञान मिळे.

धर्मविषयक गोष्टींची ओढ लागून राहणारे लोक सर्व देशांत असतात. मि. हम्फ्रे हे इंग्लिश होते. ते पोलीस सुपरिंटेंडंट होते.

ते तिरुवन्नमलायला कसे आले हीहि कथा मोठी चटकदार आहे. जगप्रसिद्ध 'पॉल ब्रंटन' हा लेखकहि महर्षींकडे कसा आला हेंहि, आशू, तुला त्यांचीं पुस्तकं वाचून कळेल.

नागस्वामी वारल्यावर अलगम्मल रमण महर्षींच्याच आश्रमांत राहण्यास आली. ती स्वयंपाक करून सर्वांना जेवायला वाढी. ती तेथेंच असतांना आजारी पडली. तेव्हां रमण महर्षींनीं तिची चांगली सेवा केली. इ. स. १९२२ मध्यें तेथेंच आईला शांत स्थितींत मृत्यु आला.


आईच्या स्मरणार्थ रमणनं "मातृभूतेश्वर" ही जागा बांधली. त्याच्या समोरच महर्षींची बसण्याची जागा असे. पालितीर्थम्च्या कांठावर हा आश्रम टेकडीच्या पायथ्याशीं उभारला आहे. टेकडी-वरील दगड आणून महर्षींच्या शिष्यांनीं तो आश्रम बांधला. त्याच्या-भोंवतीं सुंदर फुलबाग आहे.

कुत्रीं, गाई, माकडं, खारी यांनींहि हें आपलं राहण्याचं ठिकाण म्हणून पसंत केलं आहे. महर्षींची आज्ञा तीं मुकीं जनावरं पाळीत. त्यांच्या हातांतील घांस खाण्यासाठीं तीं विश्वासानं महर्षींच्याजवळ जात. त्यांच्या आश्रमांत एक काळीं 'लक्ष्मी' नांवाची गाय होती. एकदां ती कळपांतून पळून येऊन आश्रमांत येऊन उभी राहिली. तेव्हांपासून ती तेथेंच राही. तिला महर्षींच्या जयंतीला नेहमीं वांसरं होतं. तोच रमणचा जन्मदिवस असायचा.

महर्षि सांगत, "इ. स. १९०० मध्यें जेव्हां मी अरुणाचलास आलों तेव्हां एक म्हातारी, भाजीपाला तोडून आणून, देवळांत शिजवून, मला खायला घाली. तीच या जन्मीं गाय होऊन माझ्या जवळ रहात आहे." महर्षींना ही आपली लक्ष्मी गाय फार आवडे.

## गिरि-प्रदक्षिणा

इ. स. १९१६ मध्यें महर्षि कधीं कधीं या अरुणाचल टेकडीला प्रदक्षिणा घालीत. रस्ता आठ मैलांचा असून, रस्त्याच्या दुतर्फा झाडी व मधून मधून देवळंहि आहेत. लोकांची ये-जा तेथें सारखी चालूं असतेच. विशेषत: मंगळवारीं लोकांची गर्दी अधिक असते.



अरुणाचल – ज्योतिगिरी

कार्तिकी पौर्णिमेला पहांटेपासून ते सूर्यास्तानंतरहि कांहीं वेळ भक्तगणांची गर्दी सतत चालूं असते. त्या वेळीं टेकडीच्या शिखरा-वरून दृष्टि टाकतांच दृश्य फार सुंदर दिसतं. या टेकडीभोंवतीं लोकांचा पूर लोटतो. जणूं कांहीं रंगीबेरंगी फुलांची फिरती माळच त्या " ज्योतिगिरी "ला वाहिली आहे असं वाटतं. कित्येक लोक

जवळील तळ्यांत स्नान करून ओल्यानंच प्रदक्षिणा घालण्यास सुरवात करतात व तोंडांनीं हरिनामाचा घोष चाललेला ऐकून कोणाचंहि मन प्रसन्न होईल.

अरुणाचलाचं वैभव वाढण्यास भगवान् रमण महर्षींचं चरित्रहि किती स्फूर्तिदायक आहे हें, आशू, तुला समजलं. त्यांच्या धार्मिक भावनांचं चांगलं स्वरूप त्यांच्या कथेंत दृष्टीस पडतं. शिवाय तुला अलीकडे अद्भुतरम्य कथा नी प्रवासवर्णनंहि आवडूं लागलेलीं दिसतात. म्हणून मुद्दाम हें चरित्र मीं लिहिलं आहे. त्यांच्यांत देवासारखे गुण दिसले म्हणूनच त्यांना भगवान् श्रीरमण महर्षि म्हणूं लागले.

इ. स. १९५० मध्यें श्रीरमण महर्षींनीं समाधि घेतली खरी, पण त्या क्षेत्राचं वैभव तसंच कायम राहील. आशू, तूं मोठी झालीस म्हणजे तें क्षेत्र पाहण्यास जा.

◆ ◆ ◆

23605 ... 9/8/68



# स्वातंत्र्यदिन

आश्लेषा, डेहराडूनचं जंगल चांगलं दाट आहे. सर्व तऱ्हेचीं जनावरं तेथें राहतात. वाघ, हत्ती, सांबर, हरीण, कोल्हा, माकड इत्यादि जनावर गुण्यागोविंदानं एके ठिकाणीं राहतात. तेथून मसुरी लांब नाहीं. एकदां, बर्फाचे डोंगर पालथे घालून पांढरीं अस्वलंहि तेथें हजर होतीं. मानस सरोवरांतले पांढरे बगळे व भुरक्या रंगाचे कावळे जवळपासच्या प्रदेशांतून गोळा झाले. येवढंच नाहीं तर पांढरे उंदीर व पांढरीं डुकरंहि जमा झालीं. काळ्या जनावरांच्या राज्यांत पांढऱ्या जनावरांनीं शिरकाव करून घेतला.

स्वातंत्र्यदिन साजरा करायचा होता नी म्हणूनच, आशू, या सर्व रंगांचे प्राणी एकत्र आले होते; पण त्यांनीं रहायचं कुठं? त्यांच्या राहण्याची व जेवणाची सोय वेगळी केली होती. त्या ठिकाणीं एक पाटी लावली होती, "कुत्र्यांची व पांढऱ्या जनावरांची व्यवस्था येथें केली आहे." त्यांच्यासाठीं कोणत्याहि काळ्या रंगाचं अन्न द्यायचं नाहीं व कितीहि थंडी पडो, काळी घोंगडी म्हणून त्यांना पांघरायला द्यायची नाहीं असं बंधन त्यांच्यावर घातलं होतं.

याच पांढऱ्या जनावरांकडून काम करून घ्यायचं होतं. त्यांना चांगलं राबवून घेऊन आपली व्यवस्था करून घेण्यांत त्या काळ्या जनावरांनीं आपली अक्कलहुशारी वापरली. राज्य काळ्यांचं होतं; संख्या त्यांचीच जास्त मग स्वाभाविकच सत्ता त्यांची!

स्वातंत्र्यदिन साजरा व्हायचा होता. जंगलांत आणखी झाडं लावायचीं होतीं. पताका लावायच्या होत्या. मंडप तयार करायचा

होता. रोशणाई व बँडची व्यवस्था करायची होती. तसंच टेबल-खुर्च्या वाहून न्यायच्या होत्या नी अध्यक्षासाठीं तयार केलेली गाडी वाहून न्यायची होती. हीं सर्व कामं पांढऱ्या जनावरांच्या वांटयाला आलीं.

सर्व व्यवस्था पूर्ण झाल्यावर सभेस जानावरं येऊं लागलीं. मंडपाच्या बाहेर राहून काम करावं नी फार तर अध्यक्षाला चौऱ्या फिरवीत बाजूस नम्रतेनं उभं रहावं येवढीच पांढऱ्या जनावरांना सवलत देण्यांत आली होती. त्यांना मत देण्याचाहि हक्क नव्हता.

दुपारचे चार वाजले. जनावरांनीं आपापली जागा मंडपांत अडवली. इतक्यांत अध्यक्षमहाशय 'काळवीट' आपल्या दोन पांढऱ्या अस्वलांच्या गाडींतून सभामंडपांत उपस्थित झाले. स्वागताध्यक्ष वाघोबानं त्यांचं स्वागत केलं. कोल्हेकुईचा बँड सुरू झाला. अध्यक्षमहाराज खुर्चीवर जाऊन बसले. त्यांच्याजवळच मान्यवर हत्ती, सिंह, वाघ इत्यादि भारदस्त मंडळी बसली.

सभेला सुरवात झाली. सेक्रेटरी कोल्होबानं अध्यक्षस्थान स्वीकारण्यास काळवीट महाशयांचं नांव सुचविलं. लांडग्यानं त्याला दुजोरा दिला व अध्यक्षांनीं आपली खुर्ची पटकावली.

त्यानंतर अनेक वक्त्यांचीं भाषणं झालीं. सिंहाचं भाषण भारदस्त भाषेंत झालं. हत्तीचं भाषण गंभीर स्वरूपाचं वाटलं. बिचाऱ्या सशानं घाबरत घाबरत भाषण केलं. उसन्या थाटानं, हातवारे करीत माकडानं ठराव मांडला. आपलं उत्पन्न कसं वाढेल याचा कुणी विचार केला, तर कुणी आणखी कोणत्या सुधारणा करणं आपल्याला आवश्यक आहे, याचा विचार केला. कुणी नवीन कायदे सुचविले

तर कुणी इतर राज्यांशीं तुलना करून आपला मान कशानं वाढेल याचा विचार केला.

वक्त्यांचीं भाषणं आटोपलीं. कांहींच्या अंगांवर अंडीं फेंकण्यांत आलीं तर कांहींना टाळ्या मिळाल्या.

अध्यक्षमहाशय उठले. शरिरानं जरी पातळ असले तरी बुद्धीनं चलाख व तरतरीत वाटले. त्यांचा चेहेरा मात्र उदास वाटत होता. कोमल अंत:करणाचं ते मोठं चिन्ह असतं आशू ! मंडपांतील सर्व प्राणी कान टवकारून भाषण ऐकण्यास उत्सुक दिसले. अध्यक्ष म्हणाले, " बांधव हो, आज आपण स्वातंत्र्यदिन साजरा करण्यास प्रथमच एकत्र जमलों हें आपलं सुदैवच समजलं पाहिजे. आपण आपलं राज्य आदर्श बनवलं पाहिजे. डेहराडूनचं जंगल सर्वांच्या तोंडीं बसलं पाहिजे नी त्यासाठीं आपण सर्वांनीं झटलं पाहिजे.

मिळालेल्या सत्तेचा वाजवीपेक्षां अधिक उपयोग करून घेतां कामा नये. ईश्वराला आवडणाऱ्या गोष्टी ध्यानांत धरून त्याप्रमाणं राज्य चालवूं या. ईश्वराला काय आवडतं ? सर्व प्राण्यांशीं सारख्याच प्रेमानं वागलेलं आवडतं. त्यांनींच सर्वांना निर्माण केलेलं आहे. मग त्यानंच उत्पन्न केलेल्या एखाद्या मुलाला दु:ख देणं म्हणजे त्याच्या करामतीची चेष्टा करण्यासारखं नाहीं का ? आपण सर्व प्राणी सारखे आहों. एका रंगाच्या प्राण्यानीं अधिकारी व्हायचं व दुसऱ्यानं सेवक बनून एकमेकांना उच्च व नीच मानणं हें देवाला आवडत नाहीं. एकानं हमाली करायची नी जन्मभर कष्ट करायचे नी दुसऱ्यानं त्याच्या जिवावर सर्व सुख मिळवायचं हें देवाला रुचत नाहीं. मग आपण असं वागणं सोडून देऊं म्हणजेच आपलं राज्य आदर्श होईल; आपलं राज्य सामर्थ्यवान् होईल व टिकाऊ होईल.

**अब्राहम लिंकन**

आजपासून आपण शपथ घेऊं या कीं या जंगलांत पांढऱ्या जनावरांना क्रूरतेनं आम्ही राबवून घेणार नाहीं. त्यांना चाबकांच्या तडाख्यांतून मुक्त करूं या. त्यांना विकत घेण्याचीं ठिकाणं बंद पाडून त्यांना आपल्यांत घेऊं या नी आपल्यायेवढेच हक्क त्यांना देऊं या.

आपण सर्व एक होऊं म्हणजे बुद्धीच्या जोरावर चालणाऱ्या मानवांचा पराभव करण्यायेवढं सामर्थ्य आपणांस येईल. अंतः-करणांतील सहानुभूतीच्या जोरावर जोरदार झालेलं आपलं राज्य मानवांनाहि लाजवेल!

आहे तयारी सर्वांची? मग तर हात वर करा. (सर्वांनीं हात वर केले) शाबास! तुम्हांला पूर्ण यश येवो!"

अध्यक्षांचं भाषण संपतांच टाळ्यांचा कडकडाट झाला. भावनेच्या भरांत पांढऱ्या जरावरांच्या हाताला हात मिळविण्यांत आले. प्रेक्षकवर्गांत भेटाभेटीचा प्रकार सुरूं झाला. सेक्रेटरीनं अध्यक्षाला हार–तुरा दिला.

अध्यक्ष जाऊं लागले. वाटेंत एक पांढरी अस्वल पुढं झाली व तिनं अध्यक्षांपुढं लोटांगण घातलं. तिचा पति या जुलमानंच कांहीं वर्षांपूर्वीं मेला होता. पोरांच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी पडून अगदीं खंगून गेली होती ती! डोळ्यांत अश्रु आणून ती म्हणाली, "मी स्वर्गांत तुमची वाट पहात राहीन." तिचा 'दुवा' घेऊन अध्यक्ष पुढं गेले.

दारांत गाढवांचा बॅंड सुरू झाला नी अशा प्रकारानं, आबू, डेहराडूनच्या जंगलांत स्वातंत्र्यदिन साजरा करण्यांत आला.

# अब्राहम लिंकन

आश्लेषा, तुला देण्यासाठीं हीं सुंदर फुलं आणलीं आहेत. या फुलांना ‘ ट्यूलिप्स ’ म्हणतात. आपल्या येथें हीं पाहण्यास सांपडत नाहींत. हीं फुलं मूळचीं तुर्कस्तानांतील आहेत. तिथं तीं रानांत उगवतात. त्यांच्याहि निरनिराळ्या जाती असतात. किती नामी फुलं आहेत ! अनेकरंगी फुलं असतात हीं. त्यांचं सौंदर्य पाहून, यूरोप व अमेरिकेंत, हीं फुलं मोठ मोठया बागेंत मुद्दाम लावलीं गेलीं. रानांतलं फूल असलं तरी बागेला शोभा देण्याचे गुण त्या फुलांत आहेत ! आशू, अब्राहम लिंकनची गोष्टहि तुला याच तऱ्हेची वाटेल. त्याचा जन्म कुठं झाला नी ती पुढं केवढी थोर व्यक्ति झाली तें पहा !

अमेरिकेंत अब्राहम लिंकनचं नांव शाळेंत जाणाऱ्या मुलां-पासून सर्वांना माहीत असतं. शाळेंत जाणारीं मुलं लिंकनचीं नाणीं अगर तिकिटं जमविण्यास धडपडत असतात.

लिंकनचं चित्र असलेली डॉलरची नोट पाहण्यास कधींतरी मिळते. एका डॉलरचे चार रुपये येतात.

लिंकनचं नांव जसं सर्वांना माहीत असतं तसाच त्याचा पोशाखहि त्या लोकांच्या परिचयाचा आहे. पोषाखाचा शोकिन नव्हता तो ! इस्त्री न केलेले ढिले कपडेहि तो वापरी. हातांत मोठी छत्री व गळ्याभोंवतीं काळा लहान ‘ टॉय ’ ! त्याचा पोशाख जसा माहितीचा तसाच त्याचा प्रामाणिकपणा, न्यायीपणा व दयाळूवृत्ति याबद्दल त्याची ख्याति आहे.

इतिहासांत अनेक राजांची माहिती दिली जाते नी पुष्कळ लढायांची माहिती सांगितली जाते. लिंकनच्या चरित्रांत काय

आढळतं ? खालच्या परिस्थितींतून वर येण्यास कोणत्या कठीण प्रसंगांतून त्याला जावं लागलं व किती प्रामाणिकपणानं त्यानं मार्ग



अब्राहम लिंकन

काढला हेंच त्याच्या चरित्राचं वैशिष्ट्य आहे. अद्याप लिंकनचं नांव कां घेतलं जातं तर आपल्या गांवचा तो एक मित्र व उत्तम शेजारी म्हणून तो प्रसिद्ध आहे.


लिंकनचे वाडवडील इ. स. १६३७ त अमेरिकेंत कायमचे राहण्यासाठीं आले. आशू, त्या वेळची परिस्थिति आतांपेक्षां अगदीं वेगळी होती. अमेरिकेंत त्या वेळीं फारशी वस्ती नव्हती. युरोपमधून बरेच लोक या नवीन सांपडलेल्या ठिकाणीं येऊन राहूं लागले. त्या वेळीं चांगले रस्ते केलेले नव्हते; कांहीं ठिकाणीं तर दाट जंगल होतं. राहण्यास घरं बांधावीं लागत व सर्व सुखसोयी करून घ्याव्या लागत.

आश्लेषा, येथें मूळच्या राहणाऱ्या लोकांना रेड इंडियन्स म्हणतात. त्यांच्या कातडीचा रंग पिंगट असतो. पुढं युरोपमधील गोरे लोकहि येथें येऊन राहूं लागले. झाडी तोडून त्यांनीं लांकडाचीं घरं बांधावीं व उद्योग शोधावा असं त्या वेळीं चाले. कांहीं दिवसांनीं तेथील जमीन कापसाला चांगली आहे असं आढळल्यावर कापसाचीं शेतं

माठ्या प्रमाणांत सुरूं झाली. शेतावर राबण्यासाठीं आफ्रिकेंतून काळे ' निग्रो ' लोक आणून त्यांच्याकडून काम करून घेण्यांत येऊं लागलं. यामुळें अमेरिकेंत या तिन्ही वर्णांचे लोक दिसतात.

लिंकनचे आजोबा मॅसॅच्युसेट्समध्यें राहत होते. तेहि झाडं तोडून, स्वत:चं घर बांधून तेथें राहिले. जवळपासची जमीन घेऊन ते शेती करूं लागले. तेथें नीट शेती चालली नाहीं म्हणून पुढं पश्चिमेस अगर दक्षिणेस आपला सर्व संसार घेऊन फिरत रहायचं व योग्य वाटेल तिथं थांबायचं, असे कांहीं दिवस त्यांचे गेले. त्यांना पुढं थॉमस नांवाचा मुलगा झाला. तो लहान असतांनाच लिंकनच्या आजोबाचा खून, एका रेड इंडियनकडून झाला.

थॉमस मोठा झाल्यावर सुताराचा धंदा करी. परंतु दोन्ही धंद्यांत त्याला म्हणण्यासारखं यश मिळालं नाहीं. तोहि या गांवांतून त्या गांवांत फिरत राही.



लिंकनची झोपडी

इ. स. १८०६ मध्यें थॉमसचं लग्न नॅन्सीबरोबर झालं. ती शिकलेली नव्हती. सहीच्या ऐवजीं ती अधिक चिन्ह (+)

काढी. नॅन्सीला "सारा" नांवाची मुलगी झाली. त्यानंतर 'केंटकींत' तीनशें एकरांची जमीन घेतली. तेथें जवळच एक झरा होता. त्यामुळं पाणी मुबलक होतं. लगेच तेथें लांकडं तोडून झोपडी बांधण्यांत आली. ऐन थंडीचे दिवस होते. इ. स. १८०९ च्या १२ फेब्रुवारीला अब्राहम लिंकनचा त्या झोपडींत जन्म झाला.

अब्राहम लिंकनचा ज्या ठिकाणीं जन्म झाला होता तिथं आतां मोठी बाग तयार केली आहे. हीच जमीन एके काळीं थॉमसची होती. लिंकनचा ज्या झोपडींत जन्म झाला होता, ती अद्याप तिथं लोकांना पाहण्यास सांपडते.

## इंडियानांतील बालपण

इ. स. १८१६ त थॉमस आपल्या बायको–मुलांसह एका जंगलांत राहण्यास गेला. इंडियानांतील दाट जंगल होतं तें! घर तयार झालं. त्या वेळीं तेथें थंडी कडाक्याची पडूं लागली. त्या वेळीं लोक थंडींत शिकार करून त्यावरच रहात व घराबाहेरील बर्फ आणून व तो वितळवून पाणी पीत. बाकीचा वेळ ते झोपेंत काढीत. थंडींत त्या वेळीं ते दुसरं काय करणार? निदान झोपेंत भूक लागलेली तरी समजून येत नसे!

पुढं उन्हाळा आला व नॅन्सी बरीच आजारी पडली. त्यांतच ती वारली. त्या वेळीं अब्राहम नऊ वर्षांचा होता. थॉमसवर हीं दोन मुलं संभाळण्याची सर्व जबाबदारी पडली. हळूं हळूं इंडियानांत लोक राहण्यास येऊं लागले. आतां कुठं एक लहान शाळा बांधण्यांत आली. सारा व अब्राहम त्या शाळेंत जाऊं लागलीं.

इ. स. १८१९ त थॉमसचं लग्न "सारा बुश" या विधवे-

बरोबर झालं. ती बाई फार प्रेमळ होती. अब्राहम तर तिचा विशेष आवडता होता. अब्राहमचांहि तिच्यावर फार प्रेम होतं.

## शिक्षण

थॉमसला शिक्षणाचं महत्त्व पटत नव्हतं. मुलगा मोठा झाल्यावर मजुरी करणार, मग त्याला शिक्षणाची काय जरुरी आहे, अशा मताचा थॉमस होता नी म्हणूनच अब्राहमनं एखाद्या-दुसऱ्या वर्षाचंच शाळेचं शिक्षण घेतलं असेल.

शाळेंत जाण्याचं जरी अब्राहमनं सोडलं तरी दुसऱ्यांची पुस्तकं आणून तो वाचून काढी. त्याला वाचनाची फार आवड होती. लांकडी पाटीवर तो उदाहरणं सोडवी. ती वरचेवर तासून तो ती पाटी वापरी. सर्व घरांतील मंडळी झोपल्यावर स्वयंपाकाच्या खोलींत विस्तवाच्या बाजूस बसून, तो रात्रीचा कित्येकदां, तेवढ्याच उजेडांत पुस्तकं वाची. दिवसा तो बापाबरोबर शेतावर काम करण्यास जाऊं लागला. तो कुऱ्हाड चालविण्यांत हुशार होता. अब्राहम धान्य घेऊन जाई व त्याचं पीठ करून आणी. दुसऱ्यांच्या शेतावर जाऊन तो मजुरीहि करी. थॉमसच्या कल्पनेप्रमाणं अब्राहमला वाढविण्यांत येत होतं.

या दिवसांत अब्राहम एक साधा आनंदी मुलगा होता. हात-कामापेक्षां शब्दयोजनेकडे व कल्पनाशक्ति वाढविण्याकडे अब्राहमचा स्वाभाविकच ओढा होता. दुसऱ्यांच्या तोंडून गोष्टी ऐकण्याचा व सांगण्याचा त्याला नाद लागूं लागला. त्या वेळीं तो गंभीर नव्हता.

इंडियानांत लिंकननं बरींच वर्षं काढलीं. तिथं असतांनाच त्याची बहीण सारा ही वारली. इ. स. १८२८ त अब्राहम प्रथमच घर

सोडून बाहेरील जग पाहण्यास एकदां निघाला. आपली छोटी होडी घेऊन तो मिसिसिपी नदीवरून कांहीं नवीन भाग पाहण्यास निघाला.

## इलिनॉइज

इंडियानांत थॉमसचा धंदा नीट चालेना, म्हणून तो इलिनॉइजला आला. बर्फाच्छादित झरे तुडवीत तो नवीन जागेंत राहण्यास आला. तिथं माळरान होतं. हा भाग जंगलमय नव्हता.

अब्राहमनं नदींतून चालणाऱ्या एका बोटीवर नोकरी धरली. त्या वेळेस अब्राहमनं 'स्प्रिंगफील्ड' व 'न्यू सॅलेम' हीं दोन्हीं गांवं पाहिलीं. एकदां त्यानं एका नीग्रो मुलीचा लिलांव चाललेला प्रथमच पाहिला ज्याप्रमाणं, आशू, जनावरं विकण्यास घेऊन बाजारांत येतात त्याप्रमाणं या नीग्रो लोकांनाहि बाजारांत विकत घेत. त्यांच्याकडून विशेषत: शेतावर काम करून घेत. अब्राहमनं जेव्हां त्या मुलीला पाहिलं त्या वेळीं तो आपल्या भावाला म्हणाला, "जर मला कधीं संधि मिळाली तर गुलाम विकण्याच्या या क्रूर पद्धतीवर मी जोराचा हल्ला चढवीन."

अब्राहम बावीस वर्षांचा झाला तेव्हां तो आपल्या आईवडिलांना सोडून 'न्यू सॅलेमला' दुकान चालविण्यासाठीं गेला. तिथं तो नोकरीला राहिला.

## न्यू सॅलेम

इंडियनाप्रमाणं हें खेडं होतं. टेकडीवर वसवलेलं तें गांव होतं. तिथं पंधरावीसच घरं असतील. त्याच्या पायथ्याशीं एक नदी वहात असल्यामुळं, तें मोठं रम्य ठिकाण दिसे. लिंकन लवकरच त्या

नव्या वातावरणांत रुळून गेला. दुसऱ्यांना मदत करण्यास तो सदैव तयार असल्यामुळं, व त्याला गोष्टी सांगण्याची कला अवगत असल्यामुळं तो लवकरच सर्वांच्या माहितीचा झाला. तो कुस्त्यांतहि भाग घेत असे. फुरसतीच्या वेळांत त्यानं कायद्याचा व वाङ्मयाचा अभ्यास केला. त्याच्या धंद्यांत मात्र प्रगति झाली नाहीं व त्यामुळं त्याला नोकरी सोडावी लागली. येथपासून त्याची कामाची दिशा बदलली.

प्रत्येक देशाची, प्रांताची अगर संस्थानाची व्यवस्था नीट चालावी म्हणून, आशू, कांहीं विशिष्ट कायदे अगर नियम घातलेले असतात. जे लोक कायदा जाणतात, ते एकत्र बसून सर्व नियम ठरवून टाकतात. कायदे जाणणाऱ्या व करणाऱ्या लोकांचं मंडळ असतं, त्याला "कायदेमंडळ" म्हणतात. या कायदेमंडळाचे सभासद कोणी व्हावं हें लोकांनीं ठरवायचं असतं. त्यामुळं दरवर्षी अगर कांहीं गांवांत दर तीन वर्षांनीं निवडणूक होते. लिंकननं आतां नोकरी करायची नाहीं असं मनाशीं ठरवलं व अशाच निवडणुकीस उभं राहण्याचं ठरवलं. येथपासूनच राजकारणांत लिंकनचा शिरकाव झाला. या वेळीं त्याचं वय फार तर तेवीस वर्षांचं होतं.

लोकांचा पाठिंबा मिळाल्याशिवाय तो निवडून कसा येणार? न्यूसॅलेममध्यें तो सर्वांच्या माहितीचा झाला होता नी त्याच्या गोष्टी ऐकण्यास लोकांना आवडे. त्याचं जरी फार शिक्षण झालं नव्हतं तरी तेथल्या आजूबाजूच्या लोकांपेक्षां त्याला बरीच माहिती होती. तो लोकांना नवीन नवीन कल्पना देई. लोकांपुढं तो भाषणं करूं लागला. शिक्षणाची किती जरुरी आहे नी कायद्यांत कोणत्या

सुधारणा करणं जरुरीचं आहे हें तो लोकांना सांगे. येवढंच नाहीं तर आपली सुधारणा होण्यास रस्ते, कालवे व रेल्वेरस्ते बांधून दळणवळण वाढविण्याची किती आवश्यकता आहे हें तो लोकांना सोप्या भाषेंत समजावून सांगे. त्यानं आतांपर्यंत तर कधीं शहर किंवा कारखानाहि प्रत्यक्ष पाहिला नव्हता, पण त्याला इतर लोकांपेक्षां माहिती पुष्कळ होती. हळूंहळूं तो आजूबाजूच्याहि गांवांत दौरे काढून भाषणं करी. अशा रीतीनं तो सर्वांना माहितीचा होऊं लागला. कायदेमंडळांत निवडून येण्यास याची फार जरुरी लागते. निवडणुकींत त्याला अद्याप म्हणावं तसं यश आलं नाहीं.

वुल्यम बेरी नांवाच्या गृहस्थाच्या भागींत राहून त्यानं पुन्हां दुकान उघडलं. वुल्यम फार दारू पीत असे व पुढं त्यांतच त्याचा अंत झाला, म्हणून लिंकनच्या डोक्यावर फार कर्ज झालं. हे दिवस त्याचे फार वाईट गेले. पण तशा स्थितींत लिंकन कर्ज फेडण्याचा निर्धार केला. त्यासाठीं आपल्या वांट्याला येईल तें तो काम करी. त्या वेळांत त्यानं शेतावर काम केलं; रेल्वेच्या रुळाचे तुकडे करण्याचं काम केलं, जमीन-मोजणीचं काम केलं व मित्रांच्या मदतीनं पोस्टमास्तरची पहिली सरकारी नोकरी मिळवली. तीहि त्यानं केली. येवढंच नाहीं तर फावल्या वेळीं इतिहासाचा व कायद्याचा अभ्यासहि त्यानं केला.

इ. स. १८३४ त लिंकन, त्याच्या मित्राच्या सांगण्यावरून, इलिनॉइजच्या सार्वजनिक सभेचा सभासद होण्यास उभा राहिला व तो या वेळीं निवडून आला. आशू, राजकारणांत भाग घेणारे लोकहि निरनिराळ्या मतांचे असतात. त्यांतहि निरनिराळ्या पक्षांचे लोक असतात. लिंकन हा 'व्हिग' पक्षाचा होता.

न्यूसॅलेमला घालवलेले दिवस त्याचे फार आनंदांत गेले. तेथली हवा, आजूबाजूचं सृष्टिसौंदर्य व स्नेह्यांशीं आलेले संबंध सर्वच कांहीं त्याला स्फूर्तिदायक वाटलं. तिथं असतांना, खाणावळ चालवणाऱ्या गृहस्थाच्या ॲन नांवाच्या एका मुलीशीं त्याची ओळख झाली. तिच्याबरोबर घालवलेले दिवस त्याला अत्यंत सुखाचे लाभले. तिला एकाएकी टायफॉईड झाला व ती त्यांतच वारली. हें दु:ख विसरण्यास लिंकनला कांहीं काल लागला. तेव्हांपासून जी उदासीनता त्याच्या तोंडावर आली ती मात्र कायमची राहिली.

## स्प्रिंगफील्ड

लिंकननं न्यूसॅलेम सोडलं व तो स्प्रिंगफील्डला राहण्यास आला. आपलं सामान घोड्यावर टाकून लिंकन स्प्रिंगफील्डला आला. तेथें राहणाऱ्या जोन स्टुअर्ट नांवाच्या वकिलाबरोबर तो वकिली करणार होता. या वेळीं लिंकनजवळ फारसे पैसे नव्हते; परंतु तेथील कांहीं लोकांनीं त्याचं नांव ऐकलं होतं. लिंकनचे मित्र त्याला मदत करणारे होते. कोणी त्याला रहायला जागा दिली, तर कांहींनीं त्याची जेवणाची सोय केली. "जोशुआ स्पीड" नांवाचा त्याचा मित्र होता. त्याच्याकडे तो चार वर्षें राहिला. लिंकनची परिस्थिति सुधारावी व त्याची वकिली चांगली चालावी म्हणून त्याच्या मित्रांनीं त्याला बरीच मदत केली. जोशुआच्या घरीं असतांना, संध्याकाळचे विस्तवाभोंवतीं बसून गप्पा मारण्यास बरेच मित्र जमत. त्या वेळीं राजकारणावर चर्चा चाले. या अड्ड्यांत स्टीफन डाडग्लसहि बसे. हाहि पुढे लिंकनसारखाच राष्ट्रपति झाला. तो लिंकनचा प्रतिस्पर्धी होता. जोशुआ स्पीडचा



23604 ... 673 ... 9/01/68

कारकून ‘ हर्नडन ’ होता. पुढं लिंकन त्याच्यावरोबर वकिली करूं लागला.

या वेळीं लिंकनचं वय अठ्ठावीस वर्षांचं होतं. त्याच्या वकिलीच्या धंद्यांत व राजकारणांत त्याला यश येऊं लागलं. इ. स. १८४२ त मेरी टॉड्शीं त्याचं लग्न झालं. ती फार हेकेखोर स्वभावाची होती. या स्वभावाचा अतिरेक होऊन ती पुढें वेडी झाली. लिंकनच्या मृत्यूनंतर तर तिला कांहीं दिवस वेड्याच्या हॉस्पिटलमध्यें ठेवण्यांत आलं होतं. लिंकनला पुढें चार मुलगे झाले.

हर्नडनबरोबर तो वकिली करूं लागला मित्रांच्या प्रोत्साहनानं तो राजकारणांत पुढं येऊं लागला. इलिनॉइजच्या सार्वजनिक सभेचा, लिंकन चार वर्षें सभासद होता. लोकांनाहि त्याच्या विद्वत्तेची खात्री होती व त्यामुळं तो इतका वर चढला.

इ. स. १८४६ त लोकांनीं लिंकनला कॉंग्रेसमध्यें निवडून दिलं. सभेस हजर राहण्यासाठीं प्रथमच तो शिकागोला गेला. मोठमोठ्या लोकांच्या गांठी पडूं लागल्या. राष्ट्रापुढं कोणते महत्त्वाचे प्रश्न येतात हें त्याला कळूं लागलं. राजकारणांत कोणते भानगडीचे प्रश्न उभे राहातात तें आतां समजूं लागलं. इकडे गुलाम-प्रकरण हातीं घेतलं तर उत्तर व दक्षिण असे अमेरिकेचे मुख्य दोन पक्ष पडून राज्यकारभारांत एकोपा राहणार नाहीं असं दिसून येत होतं. अशा वेळेस लिंकनचं वागणं धोरणाचं होतं.

या वेळीं लिंकननं ‘वुल्यम सीवर्ड’ची भाषणाची पद्धति उचलली. त्याची पद्धत मुद्देसूद, शांतस्वरूपाची व मोठी परिणामकारक होती.

वयाच्या चाळिसाव्या वर्षीं लिंकनचं कॉंग्रेसमधील काम संपलं. फावल्या वेळीं लिंकन वकिली करी. या वेळीं त्याचा दुसरा मुलगा

वारला. तो निवडून आला नाहीं. म्हणून मेरीहि त्याच्याशीं नीट वागेना. लिंकन शक्यतों बाहेरच वेळ काढी. 'वकिली सोडली तरी चालेल पण प्रमाणिकपणा सोडतां कामा नये,' अशा मताचा तो होता. खटला चालवण्याबद्दल आलेले पैसे तो कधींहि लिहून ठेवीत नसे. पण हर्नडनला त्यांतील अर्धा हिस्सा बरोबर मिळे.

## लोकप्रियता

अब्राहमचं रहाणं साधं व वागणं सरळ असे. आपल्या ज्ञानाचं प्रदर्शन तो करीत नसे लोकसभेंत निवडून येण्यास सर्व प्रकारानं लायक असणारी व्यक्ति म्हणूनच त्याच्याकडे लोक पहात. लोकांना त्याच्याबद्दल आदर व प्रेम होतें. तो उदास दिसे पण त्यामुळंच तो मित्रांना फार प्रिय होता.

तो कोणालाही मदत करण्यास सदैव तयार असे नी म्हणूनच स्प्रिंगफील्डमधील लोकांना तो फार फार आवडे. नेहमीं गरीबांची बाजू घेऊन तो कोर्टांत लढे. त्याची फी इतरांपेक्षां कमी होती. पुष्कळ वेळां त्यांच्याकडून फी वसूल केली जाताहि नसे. आशू, अशा वेळेस गरीब कुळांना त्याचे केवढे उपकार वाटत असतील! या त्याच्या वागण्यानं गरीब लोकांमध्यें त्याच्याबद्दल वाटणाऱ्या चांगल्या भावनांचं जाळं पसरत चाललं होतं.

या वेळीं लिंकन जरी प्रत्यक्ष राजकारणांत भाग घेत नव्हता तरी आजूबाजूची परिस्थिति कशी खळबळजनक होत चालली आहे याकडे त्याचें पूर्ण लक्ष होतं. त्या वेळचा राष्ट्रपति 'डाडग्लस' जिथं भाषण करी तिथं हजर राहून लिंकन दुसऱ्या दिवशीं त्याला उत्तर देई. गुलामांच्या प्रश्नांवर उघड चर्चा होऊं लागली. युद्ध सुरू

होण्याची भीति उत्पन्न झाली. इ. स. १८५६ मध्ये राजकारणांत हजारों माणसं भाग घेऊं लागलीं.

लिंकन नव्या 'रिपब्लिकन' पक्षाचा पुढारी झाला. राज्य-कारभाराचा विचका होतां कामा नये असं या लोकांना वाटूं लागलं. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होतां कामा नये असं या पक्षांतील लोकांचं मत होत. गुलामांचा प्रश्न चटकन सुटणारा नाहीं. मालकांचं व सरकारचं नुकसान न करतां तो प्रश्न सोडवविण्याचा शहाणपणाचा मार्ग लिंकन दाखविणार होता. त्याला पुढारी बनवून त्याच्या सल्ल्यानं वागण्याची जरुरी, त्या वेळीं राष्ट्रांतील कांहीं सुज्ञ लोकांना वाटली. हा पक्ष हळूं हळूं जोरदार होत होता. लिंकनला निवडून येण्यास अद्याप अवकाश होता. त्या मुदतींत तो वकिली करी.

लोकांत अद्याप खळबळ चालूंच होती. युद्ध होण्याची भीति होतीच. प्रत्येक पक्षांत दुफळी होऊं लागली. राज्यकारभार चाल-विणारे लोकहि आपल्या जबाबदारीच्या जागा सोडूं लागले. राष्ट्रपतीला लोकांना आवरणं कठीण झालं.

अशा बिकट स्थितींत इ. स. १८६० त लिंकन बहुमतानं राष्ट्रपति म्हणून निवडून आला. अमेरिकेच्या इतिहासांत, इतकीं मतं मिळवून, राष्ट्रपति म्हणून निवडून आलेला असा एकहि माणूस झाला नव्हता. राष्ट्रपति अब्राहम लिंकनला तोफांची सलामी मिळाली. त्या वेळीं लिंकनचं वय ५१ होतं. स्प्रिंगफील्डमधील लोकांनीं मिरवणूक काढून आपला आनंद व्यक्त केला. परंतु अब्राहम मात्र काळजींत दिसला.

ऑक्टोबरमध्यें त्याला मिस् ग्रेस बेडेल नांवाच्या मुलीकडून तार आली, " तुम्ही दाढी वाढवा म्हणजे या मोठ्या हृदयाच्या जागेवर शोभून दिसाल. " त्याप्रमाणं लिंकननं दाढी वाढविण्यास सुरुवात केली.

## स्प्रिंगफील्डचा निरोप

अब्राहम वॉशिंग्टनला जाण्याची तयारी करूं लागला. त्याची बायको कपडे विकत घेण्यांत व शिवण्यांत गुंतून गेली. तिला, एका मोठ्या माणसाची बायको म्हणून, समाजांत मिरवायला हवं होतं तें तिला आतां मिळेल या आशेंत ती अगदीं आनंदांत दिसली.

वॉशिंग्टनला जाण्यापूर्वीं अब्राहम आपल्या आईस भेटण्यास गेला होता. या प्रसंगाचं वर्णन हर्नडनकडे करीत असतां, सारा म्हणाली, " राष्ट्रपति झाल्यावर माझा ' एब्‌ ' मला भेटण्यास आला होता." डोळे पुसून ती पुढं म्हणाली, " माझ्या पतीबरोबरच मला मरण आलं असतं तर बरं झालं असतं. एब्‌नं राष्ट्रपति होणं हें मला नको होतं. कां कुणास ठाऊक, मला एकसारखी भीति वाटत होती. तो जेव्हां मला भेटण्यास आला तेव्हां त्याच्या जिवाला कांहींतरी घात होणार आहे असंच मला सारखं वाटे. आतां पुन्हां मला माझा एब्‌ दिसणार नाहीं असंच मला कांहींतरी सुचवीत होतं. "

वॉशिंग्टनला जाण्यापूर्वीं एकदां अब्राहमला आरशांत आपलेच दोन चेहेरे दिसले. एक चेहरा स्पष्ट व दुसरा अंधुक दिसला. त्यावर अब्राहम स्वतः विचार करूं लागला. त्यानं आपल्या मेरीला

ही गोष्ट कळवली. ती म्हणाली, " तूं दोनदां राष्ट्रपति म्हणून निवडून येणार असशील. दुसऱ्यांदा आल्यावर कदाचित् तुझं काम अपुरं राहील असं वाटतं. "

तो निवडून येतांच त्याला पुष्कळ धमकी दिलेलीं पत्रं येऊं लागलीं. त्याचा खून केला जाईल असाहि उल्लेख होता.

लिंकन दुसऱ्या दिवशीं गाडींत बसणार होता. आदल्या दिवशीं संध्याकाळीं तो हर्नडनच्या व आपल्या ऑफिसांत गेला. सोफ्यावर पडल्या पडल्या, तो हर्नडनशीं बऱ्याच गप्पा मारीत होता. पूर्वींच्या गमतीदार गोष्टी आठवून कांहीं वेळ त्यानं तिथं घालविला. जातां जातां त्यानं दोघांच्या नांवाची पाटी पाहिली. तो हर्नडनला म्हणाला, " आपल्या कुळांना सांग कीं मी जरी राष्ट्रपति झालों तरी आमच्या कामांत कांहींहि फरक होणार नाहीं. मी जगलों वांचलों तर परत येथें काम करण्यास येणार आहे. मग जसं कांहीं विशेष घडलं नाहीं असंच पूर्वींसारखं काम पुन्हां चालू होईल. "

फेब्रुवारीची अकरा तारीख उजाडली. बाहेर पाऊस पडत होता. लिंकन गाडींत बसला. रस्त्याच्या दोन्हीं बाजूला, तशा पावसांत, लोकांची गर्दी झाली होती. स्टेशनवर त्याचे सर्व मित्र हजर होते. स्टेशनच्या दरवाजांत शिपाई दुतर्फा उभे होते. गाडींतून उतरल्यावर लोकांशीं हस्तांदोलन करीत करीत तो डब्यापर्यंत येऊन पोहोंचला. पुन: एकवार आपल्या लोकांकडे पाहून भरलेल्या अंत:करणानं तो म्हणाला, "तुम्हां सर्वांना सोडून जातांना मला किती दु:ख होत आहे याची कुणालाहि बरोबर कल्पना येणार नाहीं. या गांवचे व येथील लोकांचे माझ्यावर फार उपकार आहेत. मी येथें पंचवीस

वर्षं घालवलीं. तारुण्यांतला महत्त्वाचा काल मी येथें घालविला. मला येथेंच मुलं झालीं व एकाचा तर याच गांवीं शेवट झाला. मी हा महत्त्वाचा काल कसा विसरेन ? आतां मी सोडून चाललों आहे खरा, पण परत केंव्हां येईन कोण जाणे ! त्या परमात्म्याच्या मदती-शिवाय मला माझ्या कामांत यश येणार नाहीं किंवा त्याची मदत असली तर मला अपयश येण्याची भीति नाहीं. आपण त्याच्यावर भरंवसा ठेवूं या म्हणजे सर्व कांहीं ठीक होईल. तो तुमची सर्वांची काळजी घेणारा आहे. त्याच्याकडे माझी प्रार्थना पोहोंचत जाईल. तुम्हीहि माझ्या सुरक्षिततेसाठीं प्रार्थना करीत रहा. मी तुमचा सर्वांचा प्रेमानं निरोप घेतों.''

त्याच्या डोक्यावर पाऊस पडत होता. भाषण करीत असतां त्याच्या गालांवरील पावसाचे थेंब चमकत होते. एकदां पुन: एकवार पाठीमागें वळून पाहून जड पावलांनीं लिंकन डब्यांत चढला. गाडी हालली. ती गाडी वॉशिंग्टनला–युद्धाच्या धुमश्चक्रीकडे–मृत्यूकडे घेऊन चालली. सकाळीं सहा वाजतां लिंकनची गाडी वॉशिंग्टनला एकदांची सुखरूप येऊन पोहोंचली !

## वॉशिंग्टन

लिंकनच्या कर्तृत्वशक्तीची, समंजसपणाची व न्यायी वृत्तीची परीक्षाच होती ! हें मोठेंपण लाभलं खरं, परंतु लिंकनच्या डोक्यावर जबाबदारीची रास येऊन पडली. मग आशू, लिंकनच्या वांटयाला तेव्हांपासून सुखाचा अगर मनाच्या शांतीचा एक कणहि येऊं शकला नाहीं.

लिंकन वॉशिंग्टनला आला व प्रथम एका हॉटेलांत उतरला. चार मार्चला जुना राष्ट्रपति बुचॅनन हां लिंकनला नेण्यासाठीं त्या हॉटेलांत आला. लिंकनला त्या दिवशीं अधिकार घ्यायचा होता. रस्त्यांत शिपाई—प्यादे खडे होते. लिंकनला गाडींतून "कॅपिटॉल" या मुख्य घराकडे नेण्यांत आलं. तिथंच लिंकनचं पहिलं भाषण राष्ट्रपति या नात्यानं होणार होतं. सुमारें तीस हजार लोक जमले होते. लिंकनचं धोरण शांतता राखण्याचं होतं. भाषण संपल्यावर जोराच्या टाळ्या पडल्या.

कॅपिटॉलमधील एका खोलींत ठेवलेल्या ज्या टेबलावर, राष्ट्रपति या नात्यानं लिंकननं आपली पहिली सही केली ती खोली पाहण्यास लोक मुद्दाम जातात. कल्पना कर, लांकडी झोंपडींत जन्मलेला लिंकन त्या नामी खोलींत बसून सही करणार होता! शेतावर मजुरी करणारा लिंकन आपल्या अंगच्या गुणांनीं त्या मोठ्या खोलींत बसण्यास लायक झाला होता नी रेल्वेच्या रुळाचं काम करणारा कामगार त्या भव्य इमारतींत, मानानं प्रवेश करण्यास योग्य झाला होता!

मुख्य समारंभ संपल्यावर तोफा झाल्या व नंतर लोक जाऊं लागले. लिंकन व्हाइट हाऊसमध्यें राहण्यास गेला. तेव्हांपासून तो मोठमोठ्या लोकांत वावरूं-फिरूं लागला. आजूबाजूचा थाट पाहून 'आपण कोणी दुसरेच आहोंत' असा त्याला क्षणभर भास होई. वॉशिंग्टन हें स्प्रिंगफील्डपेक्षां मोठं शहर होतं. तो सुधारलेला भाग होता.

लिंकननं अधिकार हातीं घेतल्यावर प्रथम आपल्याबरोबर काम करणाऱ्या लोकांकडे एक एक काम सोंपविलं व तो आपल्या

कामाला लागला. त्याच्या कारकीर्दींत युद्ध सुरू झालं. अनेक भानगडी उपस्थित झाल्या. राष्ट्रहिताची जी गोष्ट आहे ती करण्यास त्यानं कधींहि मागेंपुढं पाहिलं नाहीं. नीग्रोंचा प्रश्न होताच ! आशू, लिंकननंहि राष्ट्रपति झाल्यावर त्या काळविटाप्रमाणं न्याय दिला व आपला राज्यकारभार जगांतील इतर देशांत आदर्श करून दाखवण्याचं ठरवलं. तेथील निराश्रित नीग्रो लोकांना आपण पोरके आहों, अशी जी आतापर्यंत भावना होती ती जाऊन, त्यांना लिंकनसारखा दयाळू पिता सुदैवानं लाभल्याची जाणीव झाली. याच त्याच्या करामतीसाठीं त्याच्याबद्दलचं प्रेम अद्याप कायम आहे. वॉशिंग्टनमधील दगडी पुतळा पाहण्यासाठीं अत्यंत प्रेमानं लोक जात असतात. ती भावना लोकांच्या अंत:करणांत अद्याप जिवंत आहे.

व्हाइट हाऊसमध्यें असतांना, लिंकनला भेटण्यासाठीं सर्व प्रकारचे लोक येत. त्यांना तो भेट देई. त्यांत रेड इंडियन्स, नीग्रो, नवीन वसाहत करण्यास आलेले लोक, डोंगरांवर राहणारे लोक, त्याचे जुने मित्र, त्याचे शेजारी, युद्धावर गेलेल्या शिपायांच्या बायका, विधवा स्त्रिया अशा अनेक लोकांशीं बोलून, लोकांच्या मनांची माहिती तो मिळवी. कुणालाहि फांशी दिलेली त्याला पसंत नसे. अशा वेळेस त्यांना सोडविण्यास एखादा योग्य मुद्दा सांपडतो कीं नाहीं तें पाहण्यासाठीं तो वेळ काढी. अशा त्याच्या वागणुकीनं त्याचे शत्रु त्याच्याविरुद्ध कांहीं जरी बरळूं लागले, तरी अब्राहम हा प्रामाणिक व शुद्ध मनाचा आहे अशी सर्वसाधारण लोकांची खात्री होती.

लिंकनची भेट घेऊन जाणारा मनुष्य आपल्या गांवीं गेला म्हणजे



23604
२८३ 9/6/1958

तो किती चांगला आहे याचीच कल्पना इतरांना देई. जखमी झालेले शिपाई, त्यांच्या बायका अगर युद्धांत गेलेल्या शिपायांच्या बायका, आपल्या गांवीं जाऊन लिंकनची थोरवी गात. दूरदूरच्या गांवांत हेंच ऐकूं आलं असतं. पण त्या वेळीं या युद्धाच्या गडबडींत राज्यकारभार चालविणाऱ्या लोकांना इतर लाखों लोकांच्या अंतः-करणांतून निघणारी लिंकनची भलाई ऐकण्यास फुरसत कुठं होती ! फक्त त्यांचीं मतं दुसऱ्या निवडणुकीच्या वेळीं मोजण्यांत आलीं.

इ. स. १८६४ ची निवडणूक आली. येवढ्या वेळांत मेरीनं सत्तावीस हजार डॉलरचं कर्ज करून ठेवलं होतं. लिंकनला त्याचा पत्ताच नव्हता. सुदैवानं लिंकन पुन्हां निवडून आला. पूर्वीचा वैरभाव विसरून एकमेकांच्या मदतीनं राज्यकारभार चालवूं या असं त्याच्या बांधवांना त्याचं सांगणं असे. त्याचं पुन्हां भाषण झालं. भाषण संपतांच ढगांतून सूर्य बाहेर आला. लोकांना तें सुचिन्ह वाटलं नी त्यांनीं टाळ्या वाजवल्या. लिंकन गाडींत बसून व्हाइट हाऊसला गेला. त्या वेळीं लिंकनचं वय ५६ वर्षांचं होतं. आतां लिंकनला सहाच आठवडे राहिले होते.

एप्रिल एक तारखेच्या रात्रीं तो जरा काळजींतच होता. झोंप लवकर लागेना. बऱ्याच वेळानं त्याला झोंप लागली. त्याला स्वप्न पडलं. व्हाइट हाऊसच्या एका खोलींतून रडण्याचा आवाज आला. म्हणून त्या खोलींत जाऊन लिंकननं स्वप्नांत पाहिलं. पांढऱ्या चादरीखालीं झांकलेला एक मनुष्य होता. बाजूला जमलेल्या लोकांना लिंकननं विचारलं, "व्हाइट हाऊसमध्यें कोण मेलं ?"

"राष्ट्रपति. त्याचा खून झाला" असं एका शिपायानं

सांगितलं. बाहेर जमलेल्या घोळक्यांतून रडणं ऐकूं येऊन लिंकन जागा झाला. त्या दिवशीं नंतर तो झोंपला नाहीं.

युद्धांत जय मिळाला. लोक आनंदांत होते. इ. स. १८६५ च्या चौदा एप्रिलला संध्याकाळीं मेरीबरोबर लिंकन नाटक पाहण्यास गेला. त्या वेळीं तो फार आनंदांत दिसला. मेरीला मात्र या गोष्टी-मुळं भीति उत्पन्न झाली. लिंकनचा दुसरा मुलगा ज्या दिवशीं मरणार होता त्या दिवशींहि नेहमीं उदास दिसणारा लिंकन मेरीला आनंदी वाटला. अगदीं तसंच आजहि तिला वाटलं. दुसरा प्रवेश संपला. पडदा पडला. लिंकन उठून, थंडी वाजूं लागली म्हणून कोट घालूं लागला. तिसऱ्या प्रवेशास सुरवात झाली. बाहेरचे दिवे विझले. लिंकनच्या पाठीमागचा दरवाजा हळूंच उघडला गेला. लिंकनलाहि कळलं नाहीं. पिस्तुलाचा आवाज झाला. लिंकन बेशुद्ध झाला. "राष्ट्रपतीला मारलं; राष्ट्रपतीला मारलं!" असं मेरी ओरडली. लोकांत खळबळ उडाली.

बूथ नांवाच्या गृहस्थानं लिंकनवर गोळी झाडली व तो पळून गेला. जवळच एक "बोर्डिंग हाऊस" होतं, तिथं लिंकनला नेण्यांत आलं. डॉक्टर्सना बोलवण्यांत आलं. सबंध रात्रभर लिंकनला वांचविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पहाटे पाऊस पडूं लागला. सकाळीं साडेसातला लिंकनचा अंत झाला.

लिंकनच्या मृत्यूची बातमी ऐकून लोकांना धक्का बसला. व्हाइट हाऊसकडे लोकांची गर्दी जमूं लागली. एकोणीस एप्रिलला वॉशिंग्टन-मध्यें लिंकनची प्रेतयात्रा निघाली. ही यात्रा पुरी होण्यास दोन आठवड्यांचा अवकाश लागणार होता. लिंकनला यश मिळालं व

त्याच्या मरणानंतर तें सिद्ध झालं. लोकांचं प्रेम त्याच्यावर किती होतं हें त्या वेळीं स्पष्ट दिसून आलं.

## लिंकन स्प्रिंगफील्डला गेला

लिंकनला लाकडी पेटींत घातलं व पेटीवरून पांढरीं फुलं घालून ती पेटी गाडींत घालून स्टेशनावर नेण्यांत आली. मे महिन्याच्या तीन तारखेला ती पेटी सकाळीं नऊ वाजतां स्प्रिंगफील्डला पोहोंचली. चर्चमधील घंटा वाजल्या. लोकांची गर्दी इतकी झाली कीं घराच्या छपरांवरहि लोक उभे होते. दूरदूरच्या खेडयांतून लोक लिंकनला पहायला चालत आले होते. त्यांत न्यूसॅलेमला त्याच्याबरोबर दिवस घालविलेले परिचित लोक होते. थॉमसबरोबर नवीन जागेंत राहण्यास आलेले लोकही त्यांत होते. तसंच इलिनॉइजला बैलगाडींतून आलेल्या लिंकनला पाहिलेले लोकही होते.

पेटी गाडींतून उतरली व बाहेर बँडवर शोकगीत वाजविण्यांत आलं. लोक दुःखीकष्टी चेहेरे करून स्तब्ध उभे होते. त्यांच्या गांवचा आवडता लिंकन आज घरीं आला

REFBK-0009827

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23.1002.4... वि: ...
क्रमांक ...... नों: दि: ...
दा. क. ८८२६

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ........
ग्रंथ शाखा